# वार्षिक अहवाल

## २०१९-२०२०


















अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

www.mpkv.ac.in

महात्मा फुले कृषि विद्यापीठ

अन्नं बहु कुर्वीत
तद् व्रतम्


## संपादकीय मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | **डॉ. शरद गडाख**<br>संचालक, विस्तार शिक्षण,<br>महात्मा फुले कृषि विद्यापीठ,<br>राहुरी – ४१३ ७२२, जि. अहमदनगर (महाराष्ट्र) |
| सदस्य | : | **डॉ. अशोक फरांदे**<br>अधिष्ठाता (कृषि)<br>**डॉ. शरद गडाख**<br>संचालक, संशोधन<br>**इंजि. विजय कोते**<br>नियंत्रक<br>**इंजि. मिलिंद ढोके**<br>विद्यापीठ अभियंता |
| संकलन | : | **डॉ. पंडित खर्डे,** प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र<br>**डॉ. सचिन सदाफळ,** सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र<br>**डॉ. संग्राम काळे,** सहाय्यक प्राध्यापक, संशोधन संचालनालय<br>**श्री. अदिनाथ आंधळे,** व.सं.स., शिक्षण संचालनालय<br>**श्री. सुनिल राजमाने,** कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र |


| | | |
|---|---|---|
| प्रकाशक | : | **श्री. मोहन वाघ**<br>कुलसचिव,<br>महात्मा फुले कृषि विद्यापीठ,<br>राहुरी – ४१३ ७२२, जि. अहमदनगर (महाराष्ट्र) |

मफुकृवि / विप्र / क्र. २३६२ / २०२०

# वार्षिक अहवाल

## २०१९ – २०२०

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**
राहुरी – ४१३ ७२२, जिल्हा – अहमदनगर (महाराष्ट्र)
www.mpkv.ac.in

**डॉ. के.पी. विश्वनाथा**
**कुलगुरू**
**महात्मा फुले कृषि विद्यापीठ**
**राहुरी – ४१३ ७२२, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)**



## प्रस्तावना

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा सन २०१९–२० चा वार्षिक अहवाल मी सादर करत आहे. सदरचा वार्षिक अहवाल म्हणजे एकुण कार्याचे केवळ एकत्रीकरण नसून एकुणच विद्यापीठाने केलेला विकास व त्यामध्ये विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचे योगदान आहे. विद्यापीठाच्या ५१ वर्षाच्या वाटचालीमध्ये विद्यापीठाने कृषि शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षणात अभुतपुर्व असे योगदान दिलेले आहे. महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांनी वेळोवेळी केलेल्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. विद्यापीठाचे सन्माननीय प्रतिकुलपती तथा कृषिमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे वारंवार मिळणारे प्रोत्साहन व सहाय्य याबाबतही मी त्यांचा शतशः आभारी आहे. तसेच महासंचालक, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष, महासंचालक आणि अधिकारी, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सन्माननीय सदस्य, विद्यापरिषदेचे सदस्य आणि विद्यापीठाच्या इतर वैधानिक संस्थांचे सदस्य यांनी वेळोवेळी केलेल्या अनमोल सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो.

सन २०१९–२० या वर्षात एकुण ५०६७ विद्यार्थ्यांनी पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी संपादन केली आहे. तसेच २५ विद्यार्थी आय.सी.ए.आर.–नेट परिक्षा उतीर्ण झाले असून २९ विद्यार्थी कनिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती व ४ विद्यार्थ्यांनी वरिष्ठ संशोधन शिष्यवृत्ती मिळवली आहे. याच बरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या प्रशासकीय सेवेमध्ये विविध विभागात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अनेक विद्यार्थ्यांची विविध पदांवर निवड झाली. तसेच खाजगी क्षेत्रातही अनेक विद्यार्थी विविध पदांवर नियुक्त झाले आहेत. काही विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगाराची निर्मिती केली आहे.

विद्यापीठाच्या संशोधन कार्यामध्ये यावर्षी विविध विभाग, संशोधन प्रकल्प, योजना यांचे मार्फत एकुण नऊ नवीन वाण, तीन नवीन अवजार तसेच ५९ तांत्रिक शिफारशी शेतकरी बांधवांसाठी प्रसारित केल्या गेल्या. त्याचबरोबर एकुण २५,८११ क्विंटल बियाण्याचे उत्पादन करण्यात आले. याचबरोबर विविध फळझाडांची कलमे, औषधी व सुगंधी वनस्पतींचे रोपे, जैविक खते आणि जैविक किडनाशकांची निर्मिती करुन शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले आहे.

विद्यापीठाच्या विस्तार कार्यामध्ये यावर्षी शेतकऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, चर्चासत्रे, कृती, परिणाम आणि आद्यरेखा प्रात्यक्षिके, प्रक्षेत्र भेटी, शेतीदिन, गटचर्चाचे शेतकरी, तरुण, महिला शेतकरी व कर्मचारी यांचेसाठी आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर शेतकरी कर्मचारी यांच्यांसाठी विविध प्रकाशने त्यामध्ये कृषिदर्शनी, श्रीसुगी, मफुकृवि कॅलेंडर तसेच विविध प्रकारच्या घडीपत्रिका प्रकाशित करण्यात आल्या.

कृषि विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रांवर अनेक शेतकऱ्यांनी भेटी दिल्या. भेटी दरम्यान शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. विद्यापीठ तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार करण्यासाठी विद्यापीठ नविण्यपूर्ण उपक्रम राबवित आहे यामध्ये भारतीय कृषि अनुसंधान परिषद व राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत शेतकरी प्रथम प्रकल्प, किसान आधार संमेलन, तंत्रज्ञान सप्ताह, इ. विद्यापीठ शेतकरीभिमूख संशोधन करीत आहे. या व्यतिरीक्त स्वच्छ आणि हरित विद्यापीठ या संकल्पनेतंर्गत २ जुलै रोजी वनमहोत्सव–२०१९ आणि कृषि दिन विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १० जिल्ह्यांमध्ये ५० हजार झाडांचे वृक्षारोपन करण्यात आले. विद्यापीठाचा हा अहवाल सर्व शेतकरी आणि ग्रामिण समाजासाठी समर्पित करण्यात येत आहे.

K.P. Vishwa

**(के. पी. विश्वनाथा)**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | | विद्यापीठ उपलब्धी | १ |
| | १.१ | शिक्षण | १ |
| | १.२ | संशोधन | ४ |
| | १.३ | विस्तार शिक्षण | ५ |
| २. | | शिक्षण | ६ |
| ३. | | संशोधन | २७ |
| ४. | | विस्तार शिक्षण | ३९ |
| ५. | | प्रमुख घडामोडी | ४९ |
| ६. | | पारितोषिके/पुरस्कार | ९४ |
| ७. | | मनुष्यबळ | ९८ |
| | ७.१ | कार्यकारी अधिकारी | ९८ |
| | ७.२ | कार्यकारी परिषद सदस्य | ९८ |
| | ७.३ | विद्या परिषद सदस्य | १०० |
| | ७.४ | विद्याविषयक अधिकारी | १०३ |
| | ७.५ | विभाग प्रमुख | १०४ |
| | ७.६ | इतर अधिकारी | १०५ |
| | ७.७ | विद्यापीठ मनुष्यबळ | १०६ |
| ८. | | पायाभुत सुविधा निर्मिती | ११२ |
| ९. | | विद्यापीठाच्या आर्थिक बाबी | १२१ |

## १. विद्यापीठ उपलब्धी

महात्मा फुले कृषि विद्यापीठाची स्थापना २९ मार्च, १९६८ मध्ये झालेली असुन राज्य तसेच देशाकरीता कृषि क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळ सातत्याने निर्माण करण्याचे हे एक प्रमुख केंद्र आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या कार्यक्षेत्रामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापुर, नाशिक, धुळे, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, अहमदनगर, जळगाव व नंदुरबार या दहा जिल्ह्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील नऊ कृषि हवामान विभागापैकी चार कृषि हवामान विभाग विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतात. महाराष्ट्र राज्याच्या एकुण जमीन क्षेत्रापैकी ३७.५ टक्के जमीन क्षेत्र विद्यापीठाच्या अखत्यारितील दहा जिल्ह्यांमध्ये (११६.१२ लाख हेक्टर) आहे. यापैकी ७२.४५ लाख हेक्टर जमीन लागवडीयोग्य असून बागायती क्षेत्र १३.१७ लाख हेक्टर (८०%) आहे.

कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण या तिनही क्षेत्रातील अहवाल वर्षातील ठळक वैशिष्ट्ये.

## १.१ शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये पदविकेपासून आचार्य पदवीपर्यंतचे शिक्षण कृषि आणि संलग्न विषयांमध्ये अनुदानित व विनाअनुदानित शाळा आणि महाविद्यालयांच्या माध्यमातुन प्रदान करण्यात येते.

### सन २०१९-२० च्या शैक्षणिक वर्षातील काही ठळक शैक्षणिक घडामोडी खालीलप्रमाणे

### आयोजित केलले कार्यक्रम

१. मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दि. ११ एप्रिल, २०२० रोजी मा. कुलगुरू, डॉ. के. पी. विश्वनाथा यांचे अध्यक्षतेखाली डॉ. नानासाहेब पवार सभागृहात महात्मा ज्योतीबा फुले जयंती साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रम ासाठी प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणुन महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जीवनचरीत्राचे गाढे अभ्यासक मा. श्री. प्रा. देवीदास फुलारी, नांदेड यांनी मार्गदर्शन केले.

२. मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दि. १४ एप्रिल, २०२० रोजी मा. कुलगुरू, डॉ. के. पी. विश्वनाथा यांचे अध्यक्षतेखाली डॉ. नानासाहेब पवार सभागृहात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली, सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणुन मा. प्रा. प्रकाश पवार, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे यांनी मार्गदर्शन केले.

३. आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जुन, २०१९ हा विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन विद्यापीठांतर्गत विविध घटक व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यात आला. मध्यवर्ती परिसर, म.फु.कृ.वि. राहुरीत मा. डॉ. प्रविण राजाराम देशपांडे, संचालक, आरोग्यधाम निसर्ग उपचार केंद्र, नाशिक यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच विद्यापीठ मैदानावर योग प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम सकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत घेतला गेला सुमारे २५०० विद्यार्थी, कर्मचारी व रासेयो स्वयंसेवक या योग दिनाच्या कार्यक्रमास सहभाग घेतला.

४. मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दि. ०८ जुलै, २०१९ रोजी मा. कुलगुरू, डॉ. के. पी. विश्वनाथा यांचे अध्यक्षतेखाली कृषि दिन, वनमहोत्सव दिवस व वृक्षारोपन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच, घटक व विनाअनुदानित कृषि व सलंग्न महाविद्यालयांमध्ये दि. ०१ जुलै, २०२० रोजी कृषि दिना निमित्त वृक्षारोपन कार्यक्रम आयोजित करणेत आला.

५. मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दि. १५ ऑगस्ट, २०१९ रोजी स्वातंत्र्य दिनाचे अवचित्य साधुन मा. कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा यांचे अध्यक्षतेखाली भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन डॉ. अ. शिं. कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी तसेच जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने करणेत आला. यामध्ये एकुण १२० बाटल्या रक्तदान झाले.

६. मफुकृवि, राहुरी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व घटक व संलग्न महाविद्यालयांमध्ये ०५ सप्टेंबर, २०१९ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. सर्जेराव निमसे, माजी कुलगुरु, लखनऊ विद्यापीठ, लखनऊ व स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड यांनी प्रमुख पाहुणे म्हणून संबोधित केले.

७. मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी तसेच सर्व घटक महाविद्यालयांमध्ये दि. २६ नोव्हेंबर, २०१९ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.

८. मध्यवर्ती परिसर महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी तसेच सर्व घटक महाविद्यालयांमध्ये दि. २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी महात्मा ज्योतीबा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली. मध्यवर्ती परिसर म.फु.कृ.वि. राहुरी येथे कुलगुरू मा.डॉ.के. पी. विश्वनाथा सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणुन महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जीवनचरीत्राचे गाढे अभ्यासक डॉ.प्रल्हाद लुलेकर,

विभाग प्रमुख, मराठी भाषा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी मार्गदर्शन केले.

९. १९ फेब्रुवारी, २०२० रोजी विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी इतिहास संशोधक तथा पिंपरी चिंचवड कॉन्क्रेस्ट महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रदीप कदम यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर व्याख्यान केले. माननीय कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

१०. इतर कार्यक्रम जसे प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, आंतरराष्ट्रीय कामगार दिन व स्वातंत्र्य दिन इ. साजरे करण्यात आले.

## आयोजित केलेले मुख्य कार्यक्रम

१. कृषि महाविद्यालय, पुणे येथील कृषि पदवीच्या शेवटच्या सत्रातील माती व पाणी चिकित्सालय अनुभवात्मक शिक्षण मॉड्यूलच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले मृदा आरोग्य पत्रिका दि. ०७ एप्रिल, २०१९ रोजी मा. कुलगुरू, डॉ. के. पी. विश्वनाथा यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

२. २९ सप्टेंबर, २०१९ रोजी कृषि महाविद्यालय, पुणे येथे 'कृषि उद्योग मेळावा–२०१९' आयोजित करण्यात आला. याप्रसंगी सुमारे १५० कृषि–उद्योजक, व्यापारी आणि सेवा क्षेत्रातील उमेदवार सहभागी झाले.

३. कृषि महाविद्यालय, पुणे येथे दि. १५ ऑक्टोबर, २०१९ रोजी खरीप तंत्रज्ञान दिन आयोजित करण्यात आला होता. नालंदा विद्यापीठाचे माननीय कुलपती आणि परम संगणकचे शोधक डॉ. विजय भाटकर यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा हे होते.

४. कृषि महाविद्यालय, प्रादेशिक विस्तार केंद्र आणि कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच कृषि विभाग आणि आत्मा धुळे यांच्या सह समन्वयाने दि. ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजी कृषि तंत्रज्ञान दिन आयोजित करण्यात आला.

५. मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी येथे दि. ०५ डिसेंबर, २०१९ रोजी विद्यापीठाचा ३४ वा दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती, मफुकृवि, राहुरी महामहिम श्री. भगतसिंग कोश्यारी, हे होते. एकूण ५०६७ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. आचार्य आणि १० पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विविध विभागात सुवर्ण पदक दिले. सन २०१९ पर्यंत, स्थापनेपासून विद्यापीठाने १, १५,३४९ कुशल पदवीधर तयार केली आहेत.

६. कृषि महाविद्यालय, धुळे येथून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा दि. ०८ डिसेंबर, २०१९ रोजी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. मा. कुलगुरू, डॉ. के. पी. विश्वनाथा यांनी या मेळाव्याचे उद्घाटन केले.

७. आंतर कृषि शाळा क्रीडा स्पर्धा दि. १७–१८ जानेवारी, २०२० रोजी मफुकृवि, राहुरी येथे आयोजित करण्यात आली होती.

८. सन २०१९–२० ची आंतरमहाविद्यालयीन अविष्कार स्पर्धा दि. १९ जानेवारी, २०२० रोजी मफुकृवि, राहुरी येथे आयोजित करण्यात आली होती.

९. राछशाम कृषि महाविद्यालय, कोल्हापूरच्या माजी विद्यार्थी संघटनेने, राछशाम कृषि महाविद्यालय कोल्हापूर येथे दि. २४–२५ फेब्रुवारी, २०२० रोजी कृषि संगम–२०२० आयोजित केले.

## क्षमता विकास

१. शिक्षक क्षमता विकास होण्यासाठी ३६२ शिक्षक वर्गीय कर्मचा–यांना व २२ विद्यार्थ्यांना निरनिराळ्या हिवाळी/ उन्हाळी कार्यशाळांसाठी तसेच राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदेंसाठी देशातील वेगवेगळ्या ठिकाणी पाठविण्यात आले.

२. कृषि व कृषि अभियांत्रिकीच्या पदव्युत्तर आणि आचार्य पदवीच्या २० विद्यार्थानी दि. १४ ऑक्टोबर ते दि. १३ नोव्हेंबर, २०१९ दरम्यान थायलंडच्या एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे ड्रोन, एआय आणि जिओ–इन्फॉरमॅटिक्स फॉर क्लायमेट स्मार्ट एग्रीकल्चर अँड वॉटर मॅनेजमेंट या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणात भाग घेतला.

## आयोजित केलेल्या कार्यशाळा / सेमिनार / प्रशिक्षण

१. ''हवामान अद्यावत शेती व जल व्यवस्थापनाचे'' आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, मफुकृवि, राहुरीच्या वतीने दि. २३–२५ जुलै, २०१९ दरम्यान रोबोटिक्स, ड्रोन आणि क्लायमेट स्मार्ट एग्रीकल्चर मधील आयओटीज मधील रणनीतीत्मक शिक्षण आणि नवकल्पना या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आले होते. डॉ. गजेंद्र सिंह, माजी उपमहासंचालक (अभियांत्रिकी), भाकृअप, नवी दिल्ली यांच्या हस्ते या परिसंवादाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू, डॉ. के. पी. विश्वनाथा होते.

२. कृषि हवामान विभाग, कृषि हवामानशास्त्रातील प्रगत शिक्षक प्रशिक्षण केंद्र , कृषि महाविद्यालय, पुणे येथे दि. १७ सप्टेंबर ते दि. ७ ऑक्टोबर, २०१९ दरम्यान भाकृसंप, नवी दिल्ली यांनी प्रायोजित केलेल्या पीकाच्या सूक्ष्म हवामानशास्त्रात अलिकडील प्रगतींवर राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

३. राष्ट्रीय कृषि संशोधन व्यवस्थापन अकादमी, हैदराबादच्या

सहकार्याने मफुकृवि, राहुरी येथे दि. २३ ते २४ सप्टेंबर, २०१९ दरम्यान गुणवत्ता कृषि उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक–उद्योग–शासकीय संबंधांवरील सल्लागार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

४. उद्यानविद्या विभागाने दि. १४ नोव्हेंबर, ते दि. ०४ डिसेंबर, २०१९ या कालावधीत मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी येथे फळ पिकांमधील राष्ट्रीय समस्या व संभावना या विषयावर प्रगत शिक्षक प्रशिक्षण आयोजित केले. एकूण २३ सहभागी (१९ पुरुष ४ महिला) उपस्थित होते.

५. अन्न विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या वतीने मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी येथे दि. १८–२५ नोव्हेंबर, २०१९ दरम्यान फळे आणि भाजीपाल्यांमध्ये प्रक्रिया व मूल्य वर्धन तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणात एकूण २२ प्रशिक्षणार्थी (१४ पुरुष व ०८ महिला) सहभागी झाले होते.

६. मफुकृवि, राहुरी आणि महाराष्ट्र सोसायटी ऑफ विस्तार शिक्षण, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी येथे दि. ०६–०७ डिसेंबर २०१९ दरम्यान न पोहोचलेल्यापर्यंत पोहोचण्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी बहुलवादी विस्तार या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले.या कार्यक्रमास डॉ. अशोक दलवाई, संचालक, शेतकरी उत्पन्न दुप्पट करणे, नवी दिल्ली प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. राष्ट्रीय सेमिनारमध्ये एकूण २१४ प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

७. कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित भविष्य तंत्रज्ञानावरील आंतरराष्ट्रीय परिसंवाद आणि भारतीय कृषि अभियांत्रिकी संस्थेचे (आयएसएई) ५४ व्या वार्षिक अधिवेशनाचे आयोजन डॉ. अ. शिं. कृ. अ. व तं महाविद्यालय, हवामान अद्यावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि भाकृअप, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०७–०९ जानेवारी, २०२० दरम्यान पुणे येथील हयात रीजेंसी हॉटेल येथे करण्यात आले.

## परदेश दौरा

१. पदव्युत्तर महाविद्यालय राहुरीच्या कृषि वनस्पतीशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी श्री. वानखडे अंकुश पुरुषोत्तम (अनुवंशिक व वनस्पती प्रजनन) यांनी इक्रीसॅट, हैदराबाद यांच्या सहकार्याने जॉर्जिया विद्यापीठ, यूएसए येथे दि. २४ ऑगस्ट ते दि. १५ नोव्हेंबर,२०१९ दरम्यान संशोधन कार्य पुर्ण केले.

२. मा. कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा आणि डॉ. ए. एल. फरांदे, अधिष्ठाता (कृषि) यांनी मार्च ०६–१४, २०२० दरम्यान वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी (डब्ल्यूएसयू), पुलमन, यूएसए येथे वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी (डब्ल्यूएसयू) आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्यातील सामंजस्य करार (एमओयू) स्वाक्षरी करणे आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीच्या प्राध्यापकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या एक्सचेंज प्रोग्रामविषयी चर्चा करण्यासाठी तसेच हवामान अद्यावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, या प्रकल्पांतर्गत डब्ल्यूएसयू, यूएसए सह सहयोगात्मक आणि सँडविच प्रोग्रामच्या संधींचा शोध घेण्यासाठी भेट दिली.

## जेआरएफ / एसआरएफ / नेट / स्पर्धात्मक परीक्षा मधील विद्यार्थ्यांची उपलब्धी

१. २९ आणि ४ विद्यार्थ्यांनी अनुक्रमे जेआरएफ आणि एसआरएफ म्हणून आयसीएआर पीजीएस –२०१९ ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

२. कृषि महाविद्यालय, पुणे येथील श्री. महेश जाधव व श्री. सिद्धार्थ काळे, विद्यार्थ्यांनी आय.सी.ए.आर. पीजीएस एसआरएफ –२०१९ परीक्षेत अनुक्रमे कीटकशास्त्र आणि मृदा विज्ञान व कृषि रसायनशास्त्र या विषयात अखिल भारतीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला.

३. पंचवीस विद्यार्थ्यांनी कृषि व त्यासंबंधित विज्ञान शाखांमध्ये आयसीएआर–नेट पात्र केली.

४. महाराष्ट्र लोकसेवा आयोग कृषि परीक्षेत दीडशेहून अधिक विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

**सामंजस्य करार**

| अ क्र | संस्थेचे नांव | वर्ष | उद्देश |
|---|---|---|---|
| १ | केंद्रीय पशु संशोधन संस्था, मेरठ | दि. १५ एप्रिल, २०१९ | शिक्षण, संशोधन आणि विस्तारासाठी सहयोग |
| २ | नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई | दि. १६ एप्रिल, २०१९ | कृषि महाविद्यालय, पुणे या ऐतिहासिक इमारतीमध्ये कृषि विज्ञान संग्रहालय उभारणी करणेकरीता |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | मुकुल–माधव फाऊंडेशन सीएसआर पार्टनर ऑफ फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि., पुणे | दि. २२ एप्रिल, २०१९ | विद्यापीठाच्या घटक महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पुरस्कृत करणेसाठी |
| ४ | बायर क्रॉप सायन्स लि., मुंबई | दि. १४ डिसेंबर, २०१९ | पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि., राहुरी येथील पदव्युत्तर व आचार्य पदवीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पुरस्कृत करणेसाठी |

**पुरस्कार आणि मान्यता**

**अ) प्राध्यापक**

१. डॉ. ए. ए. अत्रे, प्राध्यापक, मृद व जल संधारण अभियांत्रिकी, डॉ. अ . शिं. कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी यांची मुंबई विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या अविष्कार–२०१९ च्या देखरेखीसाठी आणि अभ्यास करण्यासाठी उपसमितीच्या सदस्यपदी निवड झाली आहे.

२. डॉ.बापूसाहेब भाकरे, विभाग प्रमुख, मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी यांची नोव्हेंबर, २०१९ मध्ये रसायनशास्त्र सदस्यांची सर्वाधिक मते मिळवून इंडियन सोसायटी ऑफ सॉईल सायन्स मध्ये समुपदेशक म्हणून निवड झाली आहे.

३. डॉ. मिलिंद अहिरे, प्रमुख, कृषि विस्तार विभाग, मफुकृवि, राहुरी यांना दि. ०६–०७ डिसेंबर, २०१९ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या न पोहोचलेल्यापर्यंत पोहोचण्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी बहुलवादी विस्तार या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात सर्वोत्कृष्ट विस्तार वैज्ञानिक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

४. डॉ. पंडित खर्डे, प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र, मफुकृवि, राहुरी यांना दि. ०६–०७ डिसेंबर, २०१९ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या न पोहोचलेल्यापर्यंत पोहोचण्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी बहुलवादी विस्तार या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात उत्कृष्ट संशोधनपर लेख सादरीकरणात प्रथम पारितोषीक देऊन गौरविण्यात आले.

**ब) संस्था**

१. कृषि महाविद्यालय, पुणे येथील एमबीए (कृषि.) अभ्यासक्रमला गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीसाठी तीन वर्षांच्या (दि. १३ सप्टेंबर २०१९ ते दि. २ सप्टेंबर २०२२) कालावधीसाठी आयएसओ: ९००१:२०१५ गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीचे प्रमाणपत्र प्राप्त झाले.

२. कृषि तंत्रज्ञान शाळा, सोलापूरने आयएसओ ९००१:२०१५ गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीचे प्रमाणपत्र तीन वर्षांच्या कालावधीसाठी (२०१९ ते २०२२) प्राप्त केले.

३. कृषि महाविद्यालय, पुणे येथील दवाखान्याला तीन वर्षांच्या (०१ नोव्हेंबर, २०१९ ते ३१ ऑक्टोबर, २०२२) कालावधीसाठी आयएसओ: ९००१: २०१५ च्या चांगल्या आरोग्य पद्धतींचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**मंजूर नवीन प्रकल्प / प्रस्ताव**

१. जैव तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी कृषि महाविद्यालय, पुणे येथे जैव कीटकनाशकांच्या गुणवत्तेच्या मापदंडांच्या चाचणीसाठी संदर्भ प्रयोगशाळा मंजूर केली.

२. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली ने कृषि महाविद्यालय, पुणे येथे शैक्षणिक संग्रहालय स्थापनेचा रू ४०. लक्ष चा प्रकल्प प्रस्ताव मंजूर केला आहे.

३. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीने अनुभवात्मक शिक्षण मॉड्यूलअंतर्गत एकूण १११.५१ लक्ष रुपये खर्चाचे तीन प्रस्ताव मंजूर केले आहेत.

४. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीने कृषि महाविद्यालय, पुणे व मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी येथे मुलांच्या व मुलींच्या प्रत्येकी रू. ९०.०० लाख रुपयांच्या वसतिगृहाच्या बांधकामाचा प्रकल्प मंजूर केला आहे.

**नवीन शैक्षणिक कार्यक्रम**

राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत हवामान अद्यावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तत्रंज्ञान केंद्राने पोस्ट डॉक्टरेट हा अभ्यासक्रम सुरु केला आहे.

## १.२. संशोधन

१. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने अहवाल वर्षात विविध पिकांचे ७ सुधारित वाण प्रसारित केले. प्रसारित हरभरा : फुले विश्वराज (फुले जी १५१०९) ,गहू : फुले सात्विक (एन आय ए डब्ल्यु ३१७०), मटकी : फुले सरिता ( एम बी एस ८०३), चवळी : फुले सोनाली, मुग – फुले चेतक (पी.एम.–७०७–०५), करडई : फुले भिवरा आणि करडई : फुले निरा.

२. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने अहवाल वर्षात तीन कृषि अवजारे व यंत्रे – ट्रॅक्टरचलित फुले कुट्टी यंत्र, ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो– मेकॅनिक नियंत्रित ऑफसेट फळबागा व्यवस्थापन यंत्र आणि ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे अवजार विकसीत केले आहे.

३. पीक उत्पादनामध्ये पीक पद्धती, पीक संरक्षण या बाबींना अनन्यसाधारण महत्व आहे. याबाबत विद्यापीठाने ५९ शिफारशी अहवाल वर्षात शेतकरी बांधवांसाठी प्रसारित केल्या आहेत.

४. शेतकऱ्यांना सुधारित बियाणाचा सुरळीत पुरवठा होण्याकरिता विद्यापीठात मोठ्या प्रमाणावर बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला. अहवाल वर्षात २५८११ क्विंटल बियाण्यांचे उत्पादन करण्यात आले.

५. फळबागांची महाराष्ट्रात जास्त प्रमाणात लागवड होत आहे. याकरिता विद्यापीठातर्फे एकूण ९.३८ लाख फळझाडे,शोभिवंत झाडे यांची रोपे व कलमे पुरविण्यात आली.

६. अहवाल वर्षात एकुण ३०० लिटर व ४५ मे. टन जैविक किटकनाशके, ४४.६ मे. टन आणि ७०० लिटर जैविक खते आणि ५४०० लिटर द्रवरुप सुक्ष्म अन्नद्रव्य उत्पादित करण्यात आली.

## १.३. विस्तार शिक्षण

१. कृषि विद्यापीठाकडे विस्तार शिक्षण कार्यक्रमाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. विस्तार कार्यक्रम सरकारी संस्था, बिगर शासकीय संस्था, सहकारी स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था इत्यादीच्या मदतीने राबविण्यात येतात.

२. विद्यापीठांतर्गत असलेली कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे, कृषि विज्ञान केंद्रे, विभागीय आणि जिल्हा विस्तार केंद्रे येथे ६३३ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

३. अहवाल वर्षात ६१ जिल्हा मासिक कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या व त्याचा १७५८ लाभार्थींना फायदा झाला.

४. अहवाल वर्षात २३८ कृती प्रात्याक्षिके, २८५ परिणाम प्रात्याक्षिके व शेतकऱ्यांच्या शेतावर १३७१ आद्यरेखा प्रात्याक्षिके व ६० निदान चाचण्या घेण्यात आलेल्या होत्या, याचा ६२२२ शेतकऱ्यांना लाभ झाला.

५. विस्तार शिक्षणाचे १८८८ कार्यक्रमामध्ये उदा. गटचर्चा, शिवारफेरी, शेतीदिन, शेत आणि गृह भेटी, शेतकरी मेळावे, शेतीविषयक प्रदर्शन, शेतकऱ्यांची अभ्यास सहल, निदान चमुच्या भेटी, विद्यापीठ शास्त्रज्ञांचे विस्तार शिक्षण कार्यक्रमातून मार्गदर्शनाचा लाभ शेतकऱ्यांना, शेती खात्यातील कर्मचाऱ्यांना, बिगर सरकारी संस्थांना व कर्मचाऱ्यांना झालेला आहे.

६. विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या निदान चमूने ३३६ ठिकाणी शेतात शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन मार्गदर्शन केले.

७. विद्यापीठामार्फत कृषिदर्शनीच्या १३,००० प्रति, श्रीसुगीच्या ३,००० प्रति, घडीपत्रिका १५,००० प्रति व शेतीविषयावरील वेगवेगळी पुस्तके, मफुकृवि घडामोडी शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे.

८. अहवाल वर्षात १,२०,६७४ प्रतिष्ठित, विद्यार्थी, शेतकरी, अधिकारी यांनी विद्यापीठास भेट दिली तर ५०,००० शेतकऱ्यांनी कृषि संशोधन केंद्र व कृषि महाविद्यालयास भेटी देऊन अहवाल वर्षात शेतीविषयक माहिती मिळवली.

९. एकूण १८,२६० शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण हेल्पलाईन दूरध्वनीमार्फत करण्यात आले.

१०. फिरते पीक चिकित्सालयाद्वारे शेतकऱ्यांच्या शेतावर ३५९९ मातीचे नमुने, ३१९ पाण्याचे नमुने, ४०४ रोगांचे तर २०५ किडींचे नमुने तपासून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## २. शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी हे महाराष्ट्रातील पहिले कृषि विद्यापीठ आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाची स्थापना २९ मार्च, १९६८ मध्ये झाली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रातील १० जिल्ह्यांमध्ये आहे. विद्यापीठातील कृषि शिक्षणाचे प्रमुख संचालक शिक्षण हे आहेत. संचालक शिक्षण हे विविध विषय, अभ्यासक्रम राबविणेचे अनुषंगाने विद्याविषयक अभ्यासक्रम तयार करणेकामी उत्तरदायी असून विद्याशाखांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख आणि इतर अधिकारी यांचे सहकार्याने सर्व घटक व संलग्न महाविद्यालये, तंत्र विद्यालयांतील शैक्षणिक विषयक समन्वय आणि मार्गदर्शनाची जबाबदारी सांभाळत आहेत.

कौशल्य विकास आणि सक्षम मानवी संसाधनाची निर्मिती यासाठी कृषि आणि संलग्न क्षेत्रात पदविका, पदवीधर, पदव्युत्तर आणि आचार्य स्तरावरील दर्जेदार शिक्षण प्रदान करणे हा उद्धेश आहे.

### सक्षम पदवीधरांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण

विद्यापीठ विविध शैक्षणिक कार्यक्रम जसे की कृषि तंत्रज्ञान पदविका, कृषि, फलोत्पादन, कृषि अभियांत्रिकी, अन्न तंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, जैव तंत्रज्ञान या विषयांचे पदवी, तसेच कृषिच्या २१ व कृषि अभियांत्रिकीच्या ०४ विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी आणि कृषि विभागातील १८ व कृषि अभियांत्रिकीच्या ०४ विभागांमध्ये आचार्य पदवीचे शिक्षण प्रदान करते.

विद्यापीठांतर्गत मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी येथे पदव्युत्तर व आचार्य पदवीसाठी पदव्युत्तर महाविद्यालय, बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि साठी पुणे, कोल्हापूर, धुळे, नंदुरबार, कराड, मुक्ताईनगर आणि हाळगांव अशी सात कृषि महाविद्यालये, पुणे येथे बी.एस.सी. (ऑनर्स) उद्यानविद्या या विषयासाठी एक उद्यानविद्या महाविद्यालय आहेत तसेच राहुरी येथील कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात बी.टेक. (कृषि अभियांत्रिकी), एम. टेक. (कृषि अभियांत्रिकी) आणि आचार्य पदवी अभ्यासक्रम राबवले जातात. कृषि महाविद्यालय, पुणे, धुळे व कोल्हापूर येथे एम.एस.सी. (कृषि) पदवी तसेच कृषि हवामानशास्त्र या विषयात आचार्य पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. कृषि व्यवसाय व्यवस्थापन अर्थात एम.बी.ए. (कृषि) मधील नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम कृषि महाविद्यालये, पुणे येथे सुरू झाला आहे.

## २.१ शैक्षणिक कार्यक्रम

### २.१.१ पदवी अभ्यासक्रम

या विद्यापीठांतर्गत ८४४ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह ९ घटक कृषि व संलग्न पदवी महाविद्यालयात आहेत. तसेच ४७०० विद्यार्थी क्षमता असलेली ६२ विना अनुदानित कृषि व संलग्न पदवी महाविद्यालये आहेत.

### बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि

बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि हा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. ज्यामध्ये १८३ श्रेयांक भार ८ सत्रामध्ये विभागलेले आहे. बी.एस. सी. (ऑनर्स) कृषि चे एकूण १४३ श्रेयांक भार प्रथम सहा सत्रांपर्यंत पूर्ण केली जातात. सातव्या सत्रात ग्रामीण कृषि कार्यअनुभव आणि २० श्रेयांक भारचा कार्यानुभवाधिष्ठित शिक्षण कार्यक्रम राबविला जातो ज्यामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन आणि शेतीची परिस्थिती तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यातील शेतकऱ्यांना उद्धवणाऱ्या अडचणी समजतात. आठव्या सत्रामध्ये अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रम राबविला जातो ज्या अंतर्गत १० (० + १०) श्रेयांक भाराचे कोणत्याही दोन मॉड्यूलमध्ये विद्यार्थी हँड–ऑन–ट्रेनिंग (एचओटी) घेतात. या विद्यापीठाअंतर्गत सात घटक महाविद्यालये व सत्तावीस संलग्न कृषि महाविद्यालये बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि पदवी अभ्यासक्रम राबवतात.

### बी.एस्सी. (ऑनर्स) उद्यानविद्या

बी.एस.सी. (ऑनर्स) उद्यानविद्या चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असून ८ सत्रामध्ये विभागलेला आहे. बी.एस.सी. (ऑनर्स) उद्यानविद्या पदवी अभ्यासक्रमासाठी एकूण १८२ श्रेयांक भाराची आवश्यकता आहे. सातव्या व आठव्या सत्रात उद्योगात प्लेसमेंट व्यतिरिक्त विद्यार्थ्यांकरिता ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रम राबविला जातो. विद्यापीठाचे एक घटक महाविद्यालय आणि पाच संलग्न उद्यानविद्या महाविद्यालये या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करतात.

### बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी)

बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी) हा ४ वर्षाचा अभ्यासक्रम असून यामध्ये १८३ श्रेयांक भार ८ सत्रामध्ये विभागलेले आहेत. विद्यार्थ्यांसाठी स्टुंडट रेडी कार्यक्रम इन–प्लांट ट्रेनिंग (० + १० श्रेयांक), इंडस्ट्रियल अटॅचमेंट (० + १० श्रेयांक), अनुभवात्मक शिक्षण (० + १० श्रेयांक), प्रकल्प नियोजन व अहवाल लेखन (० + १० श्रेयांक) आणि सेमिनार (० + १ श्रेयांक) या घटकांसह राबविला जातो. हा अभ्यासक्रम विद्यापीठातील एक घटक आणि आठ संलग्न महाविद्यालयात राबविणयात येत आहे.

### बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन

बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन हा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम ८ सत्रामध्ये विभागलेले आहे. विविध संस्थांच्या सर्व उत्तम अभ्यासक्रमांना अनुसरून व सर्वसाधारणपणे कृषि क्षेत्राच्या आवश्यकतांचा आणि विशेषतः व्यवस्थापनाच्या पैलूंचा समावेश करुन हा अभ्यासक्रम बनविला गेला आहे. अशी अपेक्षा आहे की उत्तीर्ण विद्यार्थी आर्थिक विपणन आणि व्यवस्थापन कौशल्यांमध्ये त्यांचे कौशल्य प्रदान करण्यास सक्षम होतील. एकूण १८० श्रेयांकापैकी १४० कोर्स श्रेयांक सहाव्या सत्रापर्यंत पूर्ण होतात. सातव्या सत्रामध्ये १० (०+१०) श्रेयांकाचे कोणत्याही दोन

मॉड्यूलसाठी २० श्रेयांकभाराच्या अनुभवात्मक शिक्षणाची शिफारस केली जाते. आठव्या सेमेस्टरमध्ये विद्यार्थ्यांना इन–प्लांट ट्रेनिंगसाठी २० श्रेयांक दिले जातात. विद्यापीठातील संलग्न नऊ महाविद्यालयांमध्ये हा अभ्यासक्रम राबविला जात आहे.

### बी. टेक. (अन्न तंत्रज्ञान)

बी. टेक. (अन्न तंत्रज्ञान) हा चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम आहे जो आठ सत्रामध्ये विभागलेला आहे. एकूण १८३ श्रेयांकापैकी १४५ श्रेयांक सहाव्या सत्रापर्यंत पूर्ण केले जातात. सातव्या सत्रामध्ये विध्यार्थ्यांसाठी स्टुडंट रेडी कार्यक्रमांतर्गत १८ (३ + १५) श्रेयांकाची तरतूद केलेली आहे ज्यात ७ (० + ७) श्रेयांक चे अनुभवात्मक शिक्षण मॉड्यूल १ व २ तसेच ४ (० + ४) श्रेयांक चे संशोधन प्रकल्प व सेमिनारसाठी आहेत. आठव्या सत्रामध्ये, विद्यार्थ्यांना तयार (० + २०) श्रेयांकासाठी अन्न उद्योगात / संस्थांमध्ये २० आठवड्यांसाठी प्रशिक्षण दिले जाते.

वाणिज्यिक खाद्य प्रक्रिया करणारी युनिट, संशोधन व शिक्षण संस्था व गुणवत्ता नियंत्रण विभाग यासाठी कुशल मनुष्यबळ पुरविणे आणि अन्न प्रक्रिया घटक स्थापन करण्यामध्ये तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे हे मूळ उद्दीष्ट आहे. विद्यापीठांतर्गत सात संलग्न महाविद्यालयांमध्ये हा अभ्यासक्रम राबविला जात आहे.

### बी. टेक. (जैवतंत्रज्ञान)

बी टेक. (जैवतंत्रज्ञान) हा चार वर्षाचा १८६ श्रेयांकभार असलेला पदवी अभ्यासक्रम आहे जो आठ सत्रामध्ये विभागलेला आहे. जैवतंत्रज्ञान विविध विषयांचे एकात्मिक विज्ञान असल्याने या पदवी कार्यक्रमात प्राणी जैवतंत्रज्ञान, वनस्पती जैवतंत्रज्ञान, सूक्ष्मजीव आणि पर्यावरणीय जीवरसायनशास्त्र आणि बायोइन्फॉरमॅटिक्स या चार विभागांचा समावेश आहे. सातव्या सत्रात विद्यार्थ्यांना स्टुडंट रेडी कार्यक्रमांतर्गत कौशल्य विकासासाठी २० (० + २०) श्रेयांकाचे अनुभवात्मक शिक्षण दिले जाते. आठव्या सत्रात २० (० + २०) श्रेयांकाचे प्रकल्प तयार करणे आणि उद्योजकीय विकास स्टुडंट रेडी कार्यक्रमांतर्गत राबविले जातात. मनुष्यबळ विकसित करण्यासाठी मफुकृवि, राहुरी अंतर्गत सहा संलग्न जैवतंत्रज्ञान महाविद्यालये आहेत.

## २.१.२. पदव्युत्तर अभ्यासक्रम

पदव्युत्तर महाविद्यालय व डॉ. अ. शि. कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी, कृषि महाविद्यालय, पुणे, कोल्हापूर आणि धुळे येथे पदव्युत्तर पदवी प्रदान करतात. प्रतिवर्षी ३७२ विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे.

### एम.एस.सी. (कृषि) / एम.एस.सी. (उद्यानविद्या) / एम.एस. सी. (कृषि जैव तंत्रज्ञान) / एम.बी.ए. (कृषि.) / एम. टेक. (कृषि अभि.)

एम.एस.सी. (कृषि) पदवी अभ्यासक्रम हा दोन वर्षांचा निवासी अभ्यासक्रम आहे जो चार सत्रात विभागलेला आहे. अभ्यासक्रमाचे श्रेयांक भार ५५ आहे. त्यापैकी ३५ श्रेयांक कोर्ससाठी दिले जातात, ज्यात एका विद्यार्थ्याला त्याच्या विशिष्टतेसाठी योग्य विविध अभ्यासक्रम शिकणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाचे श्रेयांक मुख्य विषयांमध्ये (२० श्रेयांक), गौण विषय (०९ श्रेयांक), सपोर्टिंग विषय (०५ श्रेयांक), सेमिनार (०१ श्रेयांक) असे विभागले गेले आहेत ज्यामुळे ३५ श्रेयांक बनतात. याव्यतिरिक्त, नॉन–क्रेडिट अनिवार्य कोर्स सहा दिले आहेत. शोध प्रबंधासाठी २० श्रेयांक आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांची एक सल्लागार समिती असते जी विद्यार्थ्यांना विषयांची निवड व संशोधनास मदत करते. विद्यार्थ्याला संशोधन प्रयोग करावा लागतो आणि पदव्युत्तर पदवी पुरस्कारासाठी अंशत: आवश्यक म्हणून शोध प्रबंध सादर करावा लागतो. एम.एस.सी. (कृषि) पदवी साठी पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी, येथे १८८, कृषि महाविद्यालय, पुणे येथे, ९० कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे ५४ आणि कृषि महाविद्यालय, धुळे येथे २८ अशी विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. एम. टेक. (कृषि अभियांत्रिकी) साठी डॉ. अ. शि. कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय मफुकृवि, राहुरी येथे १६ विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे.

## २.१.३. आचार्य पदवी अभ्यासक्रम

पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी आणि डॉ. अ.शिं. कृ.अ.व तं.म., मफुकृवि, राहुरी हे अनुक्रमे कृषि विज्ञान आणि कृषि अभियांत्रिकी या विषयातील आचार्य स्तराचे शिक्षण दिले जाते, ज्यात दरवर्षी ८४ विद्यार्थ्यांची प्रवेक्ष क्षमता असते.

### आचार्य (कृषि आणि कृषि अभियांत्रिकी)

आचार्य पदवी कार्यक्रम निवासी आवश्यकता असलेला तीन वर्षांचा आहे आणि सहा सत्रामध्ये विभागलेला आहे. कोर्ससाठी श्रेयांकाची आवश्यकता ७५ आहे; त्यापैकी ३० श्रेयांक कोर्स वर्क आणि ४५ श्रेयांक संशोधन कामासाठी आहेत. कोर्सचे श्रेयांक मुख्य विषयांमध्ये (१५ श्रेयांक), गौण विषय (०८ श्रेयांक ), सहाय्यक विषय (०५ श्रेयांक), सेमिनार (०२ श्रेयांक) अशा प्रकारे विभागले गेले आहे. याव्यतिरिक्त, नॉन–क्रेडिट अनिवार्य कोर्स सहा दिले आहेत. आचार्य पदवीचे मुख्य घटक संशोधन आहे ज्यात विद्यार्थ्यांनी त्याचे संशोधन उद्दीष्टे पूर्ण करण्यासाठी प्रक्षेत्र प्रयोग किंवा डेटा संग्रह किंवा दोन्ही एकत्रित करुन योग्य प्रमाणात आधारित संशोधन करतो. भारतातील इतर राज्य कृषि विद्यापीठातील दोन तज्ञ स्वतंत्रपणे आचार्य संशोधन प्रबंधाचे मूल्यांकन करतात. प्रत्येक विद्यार्थ्यांची एक सल्लागार समिती असते, जी विषयांची निवड आणि संशोधनास विद्यार्थ्यांना मदत करते. कृषि विषयातील आचार्य पदवी साठी पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी येथे ७० आणि पुणे येथील कृषि महाविद्यालयात ०२ प्रवेश क्षमता आहे. कृषि अभियांत्रिकीमधील आचार्य पदवी साठी डॉ. अ शिं. कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी येथे १२

विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. याव्यतिरिक्त, सेवेतील उमेदवारांना आचार्य पदवीसाठी प्रवेश दिला जातो.

### २.१.४. पदविका

विद्यापीठ दरवर्षी ६० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असलेल्या नऊ घटक आणि सत्याहत्तर कृषि तंत्रज्ञान शाळांच्या माध्यमातून कृषि तंत्रज्ञान पदविका प्रदान करते.

### २.१.५. प्रमाणपत्र अभ्यासक्रम

विद्यापीठाने दोन घटक आणि तीन संलग्न केंद्राद्वारे वर्षाकाठी ४० विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या एका वर्षाच्या कालावधीसाठी गार्डनर्स (माळी) प्रशिक्षण कोर्स देखील उपलब्ध करुन दिला आहे. तसेच सहा महिने कालावधीच्या पॉलिहाऊस तंत्रज्ञानाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम उच्च तंत्रज्ञान पुष्पसंवर्धन प्रकल्प, कृषि महाविद्यालय, पुणे येथे उपलब्ध आहे.

## २.२ शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठात कृषि शिक्षण देण्याकरीता दोन प्रमुख शाखा आहेत

१. कृषि विद्या शाखा
२. कृषि अभियांत्रिकी शाखा

### कृषि विद्या शाखा

१. कृषि विद्या शाखा ही विद्यापीठाची प्रमुख विद्या शाखांपैकी एक विद्या शाखा आहे. या विद्या शाखेत विविध १४ विभागांचा समावेश आहे, जसे की कृषि वनस्पतीशास्त्र, कृषि अर्थशास्त्र, कृषि किटकशास्त्र, कृषि विस्तार आणि प्रसारण, कृषि हवामानशास्त्र, कृषिविद्या, पशुसंवर्धन आणि दुग्ध विज्ञान, जीवरसायनशास्त्र, अन्न विज्ञान आणि तंत्रज्ञान, उद्यानविद्या, जल व्यवस्थापन, वनस्पती विकृतीशास्त्र व कृषि सूक्ष्मजीवशास्त्र, मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र आणि संख्याशास्त्र.
२. ही विद्या शाखा विविध शैक्षणिक कार्यक्रमांना जबाबदार आहे. उदा. पदवी बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि, बी.एस.सी. (ऑनर्स) उद्यानविद्या, बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी), पदव्युत्तर एम.एस. सी. (कृषि) आणि आचार्य (कृषि) आणि कृषि तंत्रज्ञान पदविका.

### कृषि अभियांत्रिकी शाखा

१. कृषि अभियांत्रिकी शाखा ही विद्यापीठाची एक विद्या शाखा असून यात कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी, कृषि यंत्र आणि उर्जा अभियांत्रिकी, कृषि रचना व ग्रामीण विद्युतीकरण, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी आणि मृद व जलसंधारण अभियांत्रिकी अशा विविध पाच विभागांचा समावेश आहे.
२. ही विद्याशाखा विविध शैक्षणिक कार्यक्रमांना जबाबदार आहे, उदा. पदवी बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि, बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी), पदव्युत्तर एम. टेक. (कृषि अभियांत्रिकी) आणि आचार्य (कृषि अभियांत्रिकी). कृषि अभियांत्रिकी विद्याशाखा विविध क्षेत्रात शैक्षणिक गरजा पूर्ण करते जसे की, सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञान, पॉलिहाऊस, निचरा अभियांत्रिकी, भूजल, विहिरी आणि पंप, मृद व जलसंधारण, पाणलोट व्यवस्थापन, धान्य, फळ आणि भाजीपाला साठवण आणि प्रक्रिया, अपारंपरिक उर्जा स्त्रोत , ट्रॅक्टर, कृषि यंत्र आणि उपकरणे, संगणक अनुप्रयोग, रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस.

## २.३ घटक महाविद्यालये

विद्यापीठात दहा घटक महाविद्यालये आहेत त्यापैकी पुणे, कोल्हापूर, धुळे, नंदुरबार, कराड, मुक्ताईनगर आणि हळगांव येथे कृषि महाविद्यालये आहेत; मफुकृवि, राहुरी येथे एक कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय; आणि पुणे येथे एक उद्यानविद्या महाविद्यालय आहे. मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी येथे पदव्युत्तर महाविद्यालय आहे.

### २.३.१ कृषि महाविद्यालय, पुणे



पुणे येथिल ऐतिहासिक कृषि महाविद्यालय, भारतात स्थापना झालेल्या पहिल्या पाच कृषि महाविद्यालयांपैकी एक असून २००७ साली त्याचे शताब्दी वर्ष साजरे झाले. येथे पदवी अभ्यासक्रमासाठी १९० विद्यार्थ्यांची वार्षिक प्रवेश क्षमता आहे. १९८४ साली पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. एम.एस.सी. (कृषि), एम.एस.सी. (उद्यानविद्या) आणि एमबीए (कृषि) साठी अनुक्रमे ५४, ६ आणि ३० अशी प्रवेश क्षमता या महाविद्यालयात आहे. कृषि हवामानशास्त्र विषयात आचार्य पदवी साठी वार्षिक दोन विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे.

नुकत्याच सुरू झालेल्या एमबीएम (कृषि) पदवीसह विविध विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी कार्यक्रम उपलब्ध आहे. महाविद्यालयात उच्च तंत्रज्ञान पुष्पसंवर्धन प्रकल्प, अखिल भारतीय समन्वित जैव–

नियंत्रण प्रकल्प, कृषि–हवामानशास्त्र मध्ये प्रगत अभ्यास केंद्र, जैविक नायट्रोजन निर्धारण योजना, कृषि चिकित्सालय व कृषि व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, अखिल भारतीय समन्वित अळंबी सुधार प्रकल्प, मासे व कोळंबीचे शेती विभाग, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प आणि सुसज्ञ रोपवाटीका आहे.

### २.३.२ कृषि महाविद्यालय, धुळे



धुळे हा पश्चिम महाराष्ट्राचा उत्तरेकडील जिल्हा आहे. कृषि महाविद्यालयाची स्थापना १९६० मध्ये झाली असून पदवी अभ्यासक्रमासाठी १२८ विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. २००९–१० सालापासून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. एम.एस.सी. (कृषि) आणि एम.एस.सी. (उद्यानविद्या) साठी प्रवेश क्षमता अनुक्रमे २४ आणि ०४ आहे.

महाविद्यालयामध्ये प्रत्येक विभागासाठी प्रशस्त इमारती आहे. कोरडवाहु शेती, कापूस आणि शेंगदाण्यावर संशोधन करण्यावर भर म्हणून हे महाविद्यालय महाराष्ट्रातील उत्तर भागासाठी प्रादेशिक संशोधन केंद्र म्हणून काम करते. महाविद्यालयात गांडुळ खते (वर्मी कंपोस्ट), जैव–खते, जैव–कीटकनाशके, मृदा व सिंचन जल विश्लेषण प्रयोगशाळा, सेंद्रिय शेती प्रात्यक्षिक युनिट, बियाणे उत्पादन, फलोत्पादन रोपवाटिका, गुरेढोरे, मेंढी व शेळी गट, पाणलोट प्रात्यक्षिक युनिट, जलसिंचन प्रणाली प्रात्यक्षिक भूखंड इ. प्रकल्प आहेत.

### २.३.३ राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर

कोल्हापूर, महाराष्ट्र राज्यातील दक्षिणेकडील कृषि आधारित उद्योग आणि सहकारी संस्थांचे उत्कृष्ट जाळे असलेले देशातील एक कृषिदृष्ट्या प्रगत जिल्हा शहर आहे. पुणे – बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर कृषि महाविद्यालय आहे. १९६३ मध्ये या महाविद्यालयाची स्थापना झाली आणि सुरुवातीला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरशी संबंधित



होते त्यानंतर १९६९ मध्ये ते या विद्यापीठाचे घटक महाविद्यालय बनले. महाविद्यालयाने सन २०१३ मध्ये सुवर्ण महोत्सव वर्ष साजरा केला. २०१७ मध्ये महाविद्यालयाचे नामकरण राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय असे करण्यात आले. या महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमासाठी वार्षिक विद्यार्थ्यांची क्षमता १९० आहे. हे विविध विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रदान करते. २००९–१० पासून पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. एम.एस.सी. (कृषि) आणि एम.एस.सी. (उद्यानविद्या ) साठी अनुक्रमे ४८ आणि ०६ अशी वार्षिक विद्यार्थ्यांची क्षमता आहे.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत करण्यासाठी गांडूळ खत, जैव–खते, जैव कीटकनाशके, फुले शीतपेय, मृद व सिंचन जल विश्लेषण प्रयोगशाळा, रोपे व पिकाच्या बियाण्यांसाठी फळ पिकांची रोपवाटिका, मृद व जल अभियांत्रिकी प्रक्षेत्र प्रयोगशाळा यासारखे प्रकल्प स्थापना केले आहेत.

### २.२.५ कृषि महाविद्यालय, कराड



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा.श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या (२०१३) प्रसंगी कृषि महाविद्यालय, कराडची स्थापना झाली. कृषि महाविद्यालय, कराड सन २०१३–१४ पासून ६० विद्यार्थ्यांच्या क्षमतेसह सुरुवात झाले. हे महाविद्यालय बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि हा पदवी अभ्यासक्रम राबविला जातो. महाविद्यालयाने नविन प्रशासकीय इमारत, ग्रंथालय, मुले आणि मुलींचे वसतिगृहे, विद्यार्थी सुविधा संकुल, खेळाचे मैदान आणि प्रशिक्षण प्रक्षेत्र प्रस्थापित केलेले आहे.

### २.२.६ कृषि महाविद्यालय, नंदुरबार



आदिवासी उपयोजना योजनेंतर्गत अनुसूचित जमाती लोकसंख्येच्या जिल्ह्यांमध्ये (म्हणजेच नंदुरबार व गडचिरोली) शासकीय कृषि महाविद्यालय स्थापनेच्या पुढाकार व निर्णयानुसार १९ जून, २०१३ रोजीचा महाराष्ट्र शासन ठराव तसेच दिनांक ०६ ऑगस्ट २०१३ रोजीचा विद्यापीठ ठरावयानुसार शासकीय कृषि महाविद्यालय, नंदुरबार ०१ ऑगस्ट, २०१३ पासून सुरु करण्यात आले. या महाविद्यालयात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी ८०% जागा राखीव आहेत.

हे महाविद्यालय बी.एस.सी (ऑनर्स) कृषि हा पदवी अभ्यासक्रम राबवते. ६० विद्यार्थ्यांची वार्षिक प्रवेश क्षमता आहे. महाविद्यालयाने नविन प्रशासकीय इमारत, ग्रंथालय, मुले आणि मुलींचे वसतिगृहे, विद्यार्थी सुविधा संकुल, खेळाचे मैदान आणि प्रशिक्षण प्रक्षेत्र प्रस्थापित केलेले आहे.

### २.२.७ कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर

कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर हे २०१५ साली नव्याने स्थापित झालेले महाविद्यालय आहे. २०१५–१६ मध्ये ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस.सी. (ऑनर्स) कृषि पदवी हा अभ्यासक्रम सुरु झाला. शिकवण्याबरोबरच वृक्षारोपण, जुन्या झाडाचे कायाकल्प करणे आणि शेतकर्यांबाबतच्या तक्रारींचे निवारण यासारखे उपक्रमही कर्मचार्यांकडून राबविण्यात येतात.

### २.२.८ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगांव

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगांव शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून वार्षिक ६० विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेसह सुरू झाले. हे महाविद्यालय बी.एस.सी (ऑनर्स) कृषि पदवी अभ्यासक्रम राबवते.

### २.२.४ उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे



१९८४ मध्ये कृषि महाविद्यालय पुणेच्या परिसरात या महाविद्यालयाची स्थापना झाली. ३२ विद्यार्थी वार्षिक प्रवेश क्षमता आहे. महाविद्यालयाची स्वत: ची इमारत आहे ज्यात सुसज्ज वर्ग, प्रयोगशाळा, संगणक व इंटरनेट सुविधा आहेत.

### २.८.१ डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी




मातीचे संरक्षण, सिंचन व्यवस्थापन, कृषि यांत्रिकीकरण व काढणी पश्चात प्रक्रियेसाठी कृषि अभियंत्यांची गरज लक्षात घेतल्यानंतर १९६९ मध्ये महाविद्यालयाची स्थापना झाली. १९९६ मध्ये या महाविद्यालयाचे नामकरण माजी केंद्रीय कृषि राज्यमंत्री आणि भारतातील हरितक्रांतीचे शिल्पकार कै. अण्णासाहेब शिंदे यांच्या नावावरून झाले. हे महाविद्यालय वार्षिक ६४ विद्यार्थीक्षमतेसह बी. टेक. (कृषि अभियांत्रिकी) अभ्यासक्रम राबवते, तसेच १९८२ सालापासून १२ विद्यार्थी क्षमतेसह ३ वेगवेगळ्या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम राबवते. अलीकडेच या महाविद्यालयाने कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, मृद व जलसंधारण अभियांत्रिकी व कृषि ऊर्जा व यंत्र या विषयामध्ये आचार्य पदवी अभ्यासक्रम आणि संशोधन कामांसह सुरु केली आहे.

शैक्षणिक कार्यक्रमांव्यतिरिक्त महाविद्यालयात विहीर आणि कूपनलिकेद्वारे भूजल वापरावर अखिल भारतीय समन्वयित संशोधन

प्रकल्प; काटेकोर शेती विकास केंद्र, अखिल भारतीय समन्वयित कृषि अवजारे व यंत्र संशोधन प्रकल्प, दुरस्थ संवेदन प्रयोगशाळा आणि ट्रॅक्टर प्रशिक्षण प्रयोगशाळा कार्यरत आहे. विद्यापीठाच्या आठ संलग्न महाविद्यालयांमध्ये हा अभ्यासक्रम राबविला जात आहे.

## २.४ पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी




राज्यातील शेतीच्या उच्च शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी १९७२ मध्ये पदव्युत्तर महाविद्यालय स्थापन केले गेले. सध्या पदव्युत्तर महाविद्यालय कृषि विद्याशाखेच्या अनुक्रमे १८ आणि १७ विषयांमध्ये पदव्युत्तर आणि आचार्य पदवी अभ्यासक्रम प्रदान करते. पदव्युत्तर आणि आचार्य अभ्यासक्रमला अनुक्रमे १८८ आणि ७० वर्षीक प्रवेशक्षमता आहे.

पदव्युत्तर महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागाला पदव्युत्तर आणि आचार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी परस्परसंवादी दोन वर्ग कक्ष उपलब्ध आहेत. वर्गखोल्याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांच्या चर्चासत्र, गट चर्चा इत्यादींचे सादरीकरण करण्यासाठी जवळपास प्रत्येक शाखेमध्ये सुसज्ज सेमिनार हॉल आहे. पदव्युत्तर महाविद्यालयाला ५६.२१ हेक्टर क्षेत्रावर पसरलेली एक शिक्षणात्मक शेती आहे आणि ती केवळ विद्यार्थ्यांच्या संशोधन कार्यांसाठी वापरली जाते. विद्यार्थ्यांना उद्यानविद्या शेती, औषधी व सुगंधी वनस्पतींचे शेती तसेच सिंचन व पाणी व्यवस्थापन प्रक्षेत्रावर संशोधनासाठी परवानगी आहे. प्रत्येक विभागात सुसज्ज प्रयोगशाळा आहेत. या व्यतिरिक्त, खालील केंद्रांच्या आधुनिक सुविधा विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी उपलब्ध आहेतः जैव तंत्रज्ञान संशोधन केंद्र, कीटकनाशक अवशेषांवर अखिल भारतीय समन्वयीत प्रकल्प, सूक्ष्म पोषक संशोधन योजना, काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रयोगशाळा, जैव-खते प्रयोगशाळा, गोठलेले वीर्य प्रयोगशाळा, जैविक नियंत्रण प्रयोगशाळा, बेकरी युनिट.

## विनाअनुदानित महाविद्यालये

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीला शेतीत अधिक प्रशिक्षित मानव संसाधनाची आवश्यकता व मागणीची जाणीव झाली आणि त्यानुसार कृषि आणि संलग्न विज्ञान शाखेत ६२ महाविद्यालयांना मान्यता दिली गेली. ही महाविद्यालये कृषि विद्याशाखेत विविध पदवीधर पदवी प्रदान करतात.

| अ. क्र. | शाखा | महाविद्यालयांची संख्या | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | कृषि | २७ | २८२० |
| २ | उद्यानविद्या | ०५ | २४० |
| ३ | कृषि अभियांत्रिकी | ०८ | ४४० |
| ४ | अन्नतंत्रज्ञान | ०७ | ४०० |
| ५ | जैवतंत्रज्ञान | ०६ | ३६० |
| ६ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ०९ | ४४० |
| | **एकुण** | **६२** | **४७००** |

## क्रीडा घडामोडी

वेंकटेश्वरा पशुवैद्यकीय विद्यापीठ, तिरुपती येथे दि. ०१–०५ मार्च, २०२० मध्ये आयोजित करण्यात आले होते. मफुकृवि, राहुरीचे संघ या स्पर्धेत उपविजेते होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी खालील बक्षिसे मिळविली.

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | पदक |
|---|---|---|
| १ | खो–खो (मुली) | सुवर्ण पदक |
| २ | व्हॉलीबॉल (मुले) | सुवर्ण पदक |
| ३ | बास्केटबॉल (मुले) | रजत पदक |
| ४ | कब्बडी (मुले) | कांस्य पदक |
| ५ | टेबल टेनिस (मुली) | कांस्य पदक |

### अखिल भारतीय आंतर कृषि विद्यापीठ क्रीडा स्पर्धा

**ॲथेलॅटिक्स**

| अ. क्र. | स्पर्धा प्रकार | स्पर्धकाचे नांव | पदक |
|---|---|---|---|
| १ | ४०० मीटर लांब उडी | कुमारी सांगळे शिल्पा | सुवर्ण पदक |
| २ | ४ x १०० मी. धावणे (मुली) | संघ | रजत पदक |
| ३ | १०० मी. धावणे | कुमारी नाईक शिवानी | रजत पदक |
| ४ | २०० मी. धावणे | कुमारी नाईक शिवानी | कांस्य पदक |
| ५ | ४०० मी. धावणे | कु. यशराज सावंत | कांस्य पदक |

### कर्मचाऱ्यांच्या क्रिडा क्षेत्रातील उपलब्धी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि. २४–२६ जानेवारी, २०२० दरम्यान आयोजित अखिल महाराष्ट्र आंतर राज्य कृषि विद्यापीठ कर्मचारी क्रीडा स्पर्धा –२०२० मध्ये मफुकृवि, राहुरीच्या कर्मचारी क्रिडा संघाने उपविजेतेपद पटकावले.

### विद्यापीठात आयोजित केलेल्या विविध आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा २०१९–२० ची माहिती खालील प्रमाणे

| अ. क्र. | आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा | तारीख | ठिकाण | विजेता | उपविजेता | तृतीय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बुध्दीबळ (मुले) | दि. १० ते ११ जुलै, २०१९ | उद्यानविद्या महाविद्यालय, मालेगांव | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, जळगांव | कृषि व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगांव |
| | बुध्दीबळ (मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, अकलुज | डॉ. अ. शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी |
| | मल्लखांब | | | उद्यानविद्या महाविद्यालय, मालेगांव | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | कृषि महाविद्यालय, बारामती |
| २ | टेबल टेनिस (मुले) | दि. २३ ते २४ जुलै, २०१९ | कृषि महाविद्यालय, विळदघाट अहमदनगर | कृषि महाविद्यालय,धुळे | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, तळसंदे |
| | टेबल टेनिस (मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | कृषि महाविद्यालय, धुळे |
| | बॅडमिंटन(मुले) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | के.के.वाघ. कृषि महाविद्यालय, नाशिक | कृषि महाविद्यालय, फलटण |
| | बॅडमिंटन(मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय ,धुळे |
| ३ | फुटबॉल (मुले) | दि. ०२ ते ०३ ऑगस्ट, २०१९ | के.के. वाघ कृषि महाविद्यालय, नाशिक | के. के. वाघ कृषि महाविद्यालय, नाशिक | कृषि महाविद्यालय, तळसंदे | कृषि महाविद्यालय, धुळे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | बास्केट बॉल (मुले) | दि. १२ ते १३ सप्टेबर, २०१९ | के.के.वाघ कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नाशिक | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, धुळे | कृषि महाविद्यालय, तळसंदे |
| | बास्केट बॉल (मुली) | | | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | डॉ. अ. शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | कृषि महाविद्यालय, अकलुज |
| ५ | कब्बड्डी (मुले) | दि. ३० ते ३१ ऑगस्ट २०१९ | कृषि महाविद्यालय, मदडगांव | कृषि महाविद्यालय, सोनई | कृषि महाविद्यालय, पानीव | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगांव |
| | कब्बड्डी (मुली) | | | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, मिरजगांव | उदयान विद्या महाविद्यालय, फलटण |
| ६ | व्हॉलीबॉल (मुले) | दि. ११ ते १२ सप्टेबर २०१९ | विद्यार्थी कल्याण अधिकारी, मफुकृवि, राहुरी | कृषि महाविद्यालय, बारामती | डॉ. अ. शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | के.के.वाघ कृषि महाविद्यालय, नाशिक |
| | व्हॉलीबॉल (मुली) | | | कृषि महाविद्यालय, वडाळा | कृषि महाविद्यालय, राजमाची | कृषि महाविद्यालय, आंबी |
| ७ | हॉकी (मुले) | दि. २५ ते २७ सप्टेबर २०१९ | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, राजमाची | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, दोंडाईचा |
| ८ | कुस्ती ५७ किलो | दि. २९ ते ३० सप्टेबर २०१९ | उदयानविद्या महाविद्यालय, फलटण | कृषि महाविद्यालय, मिरजगांव | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, जैनापुर |
| | कुस्ती ६१ किलो | | | कृषि महाविद्यालय, राजमाची | कृषि महाविद्यालय, मिरजगांव | कृषि महाविद्यालय, जैनापुर |
| | कुस्ती ६५ किलो | | | कृषि महाविद्यालय, सोनई | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, नेसरी |
| | वजन उचलने ५५ किलो | | | कृषि महाविद्यालय, वडाळा | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर |
| | वजन उचलने ६१ किलो | | | कृषि महाविद्यालय, जैनापुर | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | कृषि महाविद्यालय, अकलुज |
| | वजन उचलने ६७ किलो | | | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | कृषि महाविद्यालय, अकलुज | कृषि महाविद्यालय, तळसंदे |
| | वजन उचलने ७३ किलो | | | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | कृषि महाविद्यालय, अकलुज |
| | वजन उचलने ८१ किलो | | | कृषि महाविद्यालय, अकलुज | कृषि महाविद्यालय, पानीव | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर |
| | वजन उचलने ८९ किलो | | | कृषि महाविद्यालय, तळसंदे | कृषि महाविद्यालय, पानीव | कृषि महाविद्यालय, अकलुज |
| | वजन उचलने ९६ किलो | | | कृषि महाविद्यालय, तळसंदे | कृषि महाविद्यालय, पानीव | कृषि महाविद्यालय, पानीव |
| | वजन उचलने १०२ किलो | | | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | कृषि महाविद्यालय, वडाळा | कृषि महाविद्यालय, अकलुज |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वजन उचलने १०९ किलो | | | कृषि महाविद्यालय, वडाळा | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, फलटण |
| | शरीर सौष्ठव स्पर्धा ५५ किलो | | | कृषि महाविद्यालय, राजमाची | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, आंबी |
| | शरीर सौष्ठव स्पर्धा ६५–७५ किलो | | | कृषि महाविद्यालय, जैनापुर | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर |
| | शरीर सौष्ठव स्पर्धा ७५ किलो | | | कृषि महाविद्यालय, जैनापुर | कृषि महाविद्यालय, राजमाची | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर |
| ९ | खो–खो (मुले) | दि. ०२ ते ०३ ऑक्टोबर २०१९ ॲथलेटीक्स (मुले) | उदयानविद्या महाविद्यालय, पानीव | कृषि महाविद्यालय, पानीव | कृषि महाविद्यालय, वडाळा | कृषि महाविद्यालय, बारामती |
| | खो–खो (मुली) | | | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, तळसंदे |
| १० | ८०० मीटर धावणे (मुले) | दि. ०७ ते ०८ डिसेंबर २०१९ | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, लोणी | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, नारायणगांव |
| | ८०० मीटर धावणे (मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, बारामती |
| | ५००० मीटर धावणे (मुले) | | | कृषि महाविद्यालय, नारायणगांव | कृषि महाविद्यालय, रेठरे | कृषि महाविद्यालय, फलटण |
| | भालाफेक (मुले) | | | कृषि महाविद्यालय, तळसंदे | कृषि महाविद्यालय, फलटण | कृषि महाविद्यालय, आंबी |
| | भालाफेक (मुली) | | | कृषि महाविद्यालय, धुळे | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, फलटण |
| | लांब उडी (मुले) | | | कृषि महाविद्यालय, मालेगांव | कृषि महाविद्यालय, धुळे | कृषि महाविद्यालय, पुणे |
| | लांब उडी (मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, कराड | कृषि महाविद्यालय, बारामती |
| | १०० मीटर धावणे (मुले) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, आंबी | कृषि महाविद्यालय, धुळे |
| | ५००० मीटर धावणे (मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, बारामती | – |
| | २०० मीटर धावणे (मुले) | | | कृषि महाविद्यालय, शहादा | कृषि महाविद्यालय, आंबी | कृषि महाविद्यालय, पुणे |
| | ४०० मीटर धावणे (मुले) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, शहादा | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगांव |
| | ४०० मीटर धावणे (मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, मालदाड | कृषि महाविद्यालय, पुणे |
| | १५०० मीटर धावणे (मुले) | | | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी | कृषि महाविद्यालय, विळदघाट | कृषि महाविद्यालय, धुळे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १५०० मीटर धावणे (मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर |
| | ४ × ४०० मीटर रिले (मुले) | | | कृषि महाविद्यालय पुणे | कृषि महाविद्यालय, धुळे | – |
| | ४ × ४०० मीटर रिले (मुली) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, बारामती | – |
| | उंचउडी (मुले) | | | कृषि महाविद्यालय, मालदाड | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर |
| | थाळीफेक (मुले) | | | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नाशिक | कृषि महाविद्यालय, तळसंदे | कृषि महाविद्यालय, आंबी |
| | थाळीफेक (मुली) | | | कृषि महाविद्यालय, कराड | कृषि महाविद्यालय, कराड | कृषि महाविद्यालय, पुणे |
| | तिहेरी उडी (मुले) | | | कृषि महाविद्यालय, मालदाड | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नाशिक | कृषि महाविद्यालय, सोनई |
| | गोळाफेक (मुले) | | | कृषि महाविद्यालय, पुणे | कृषि महाविद्यालय, फलटण | कृषि महाविद्यालय, धुळे |
| | गोळाफेक (मुली) | | | कृषि महाविद्यालय, कराड | कृषि महाविद्यालय, बारामती | कृषि महाविद्यालय, धुळे |
| ११ | क्रिकेट | दि. १३ ते १६ डिसेंबर २०१९ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी | कृषि महाविद्यालय, आंबी | के.के.वाघ कृषि महाविद्यालय, नाशिक | पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि, राहुरी |

आंतमहाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा दिनांक २१.०९.२०१९ रोजी सकाळी आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी येथे पार पडला तीचा निकाल खालील प्रमाणे .

## १) वादविवाद स्पर्धा

१) सहकारी प्रशिक्षण – इंग्रजी

| अ. नं. | स्पर्धकाचे नांव | For/ Against | महाविद्यालय | विजेता/ उपविजेता |
|---|---|---|---|---|
| १ | गंटुपल्ली साई एस. | For | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, आकुर्डी, पुणे | प्रथम |
| २ | धनवडे दर्शन | | कृषि महाविद्यालय, फलटण | द्वितीय |
| ३ | खेडकर स्नेहल ए. | Against | डॉ. अ.शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | प्रथम |
| ४ | घोडके रणजित | | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | द्वितीय |

२) सहकारी प्रशिक्षण – हिंदी

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | For/Against | महाविद्यालय | विजेता/ उपविजेता |
|---|---|---|---|---|
| १ | विमल प्रजापती | For | डॉ. अ.शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | प्रथम |
| २ | जाधव प्रणाली | | कृषि महाविद्यालय, फलटण | द्वितीय |
| ३ | माळी कोमल | Against | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगांव | प्रथम |
| ४ | लांडगे रुतुजा | | कृषि महाविद्यालय, धुळे | द्वितीय |

३) लोकसंख्या आणि पर्यावरण – इंग्रजी

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | For/Against | महाविद्यालय | विजेता/उपविजेता |
|---|---|---|---|---|
| १ | चव्हाण विक्रम | For | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | प्रथम |
| २ | माने दत्तात्रय | Against | कृषि महाविद्यालय, तळसंदे | द्वितीय |

४) लोकसंख्या आणि पर्यावरण – हिंदी

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | For/Against | महाविद्यालय | विजेता/उपविजेता |
|---|---|---|---|---|
| १ | नवले सोनाली | For | कृषि महाविद्यालय, धुळे | प्रथम |
| २ | गुंजाळ स्नेहल | Against | कृषि महाविद्यालय, धुळे | द्वितीय |

५) Agriunifest 2019 - इंग्रजी

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | For/Against | महाविद्यालय | विजेता/उपविजेता |
|---|---|---|---|---|
| १ | सोनवणे भक्ती एस. | For | कृषि महाविद्यालय, पुणे | प्रथम |
| २ | ठमके सुशांत | Against | कृषि महाविद्यालय, पुणे | द्वितीय |

६) Agriunifest २०१९ – हिंदी

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | For/Against | महाविद्यालय | विजेता/उपविजेता |
|---|---|---|---|---|
| १ | चोळके ऋषीकेश एन | For | कृषि महाविद्यालय, लोणी | प्रथम |
| २ | जाधव सागर विलास | Against | कृषि महाविद्यालय, तळसंदे | द्वितीय |

७) आंतरराष्ट्रीय वादविवाद स्पर्धा–पंतनगर

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | For/Against | महाविद्यालय | विजेता उपविजेता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रांजली फटांगरे | For | डॉ. अ.शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | प्रथम |
| २ | अजय शिंदे | | कृषि महाविद्यालय, पुणे | द्वितीय |
| ३ | राज गावंडे | Against | डॉ. अ.शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | प्रथम |
| ४ | सौरभ ठुबे | | कृषि महाविद्यालय, कोल्हापुर | द्वितीय |

८) आंतरराष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धा–पंतनगर–हिंदी

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | For/Against | महाविद्यालय | विजेता उपविजेता |
|---|---|---|---|---|
| १ | वासुपुरदा निराली | For | डॉ. अ.शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | प्रथम |
| २ | रुपम घुले | | कृषि महाविद्यालय, धुळे | द्वितीय |
| ३ | ऋषीकेश पवार | Against | कृषि महाविद्यालय, बारामती | प्रथम |
| ४ | प्रितम चव्हाण | | डॉ. अ.शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | द्वितीय |

## २) वक्तृत्व स्पर्धा निकाल

अ) शिक्षा मंडळ वर्धा

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | महाविद्यालय | विजेता/उपविजेता |
|---|---|---|---|
| १ | देशमुख मयुरी हिराजी | डॉ. अ.शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | प्रथम |
| २ | सोनवणे हर्षल राजेंद्र | कृषि महाविद्यालय, धुळे | द्वितीय |

इ) पी.सी.अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा मराठी

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | महाविद्यालय | विजेता/उपविजेता |
|---|---|---|---|
| १ | जाधव जयेश एन. | कृषि महाविद्यालय, धुळे | प्रथम |
| २ | शिवळे भास्कर | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगांव | द्वितीय |

उ) पी.सी.अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा इंग्रजी

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | महाविद्यालय | विजेता/उपविजेता |
|---|---|---|---|
| १ | मेहेत्रे तेजस बी. | कृषि महाविद्यालय, धुळे | प्रथम |
| २ | शिंदे वरद एस. | डॉ. अ.शिं. कृ. अ. व तं. म., मफुकृवि, राहुरी | द्वितीय |

ऊ) हुंडा विरोधी चळवळ मुंबई

| अ.नं. | स्पर्धकाचे नांव | महाविद्यालय | विजेता/उपविजेता |
|---|---|---|---|
| १ | पवार ऋषीकेश भारत | कृषि महाविद्यालय, बारामती | प्रथम |
| २ | दुरगुडे नेहा राजेंद्र | कृषि महाविद्यालय, फलटण | द्वितीय |

सन २०१९–२० मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे विद्यार्थी खालीलप्रमाणे विविध आंतर–विद्यापीठ क्रिडा स्पर्धांमध्ये सहभागी झाले.

| अ. क्र. | स्पर्धा प्रकार | तारीख | विजेता |
|---|---|---|---|
| १ | हॉकी (मुले) | २३ ते २९ ऑक्टोबर, २०१९ | लक्ष्मीबाई विश्वविद्यालय, ग्वाल्हेर (म.प्र.) |
| २ | बॅडमिंटन (मुली) | २५ ते २९ नोव्हेंबर, २०१९ | कोटा विश्वविद्यालय, राजस्थान |
| ३ | वेट लिफटींग आणि बेस्ट फिजींक्स | १५ ते १९ डिसेंबर ,२०१९ | चंढीगड विश्वविद्यालय गुहारान मोहोली, पंजाब |
| ४ | क्रिकेट (मुले) | २३ डिसेंबर, २०१९ ते ०७ जानेवारी, २०२० | आय.टी.एम. विश्वविद्यालय, ग्वाल्हेर (म.प्र.) |
| ५ | बॅडमिंटन (मुले) | ०२ ते ०५ जानेवारी, २०२० | स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड, कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी |
| ६ | मल्लखांब | १४ ते १६ मार्च, २०२० | गुरु नानक देव विश्वविद्यालय, अमृतसर |

## विद्यापीठ ग्रंथालय

विद्यार्थ्यांना व वाचकांच्या शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यामध्ये ज्ञानदान व माहिती पुरविण्याचे महत्वाचे कार्य ग्रंथालय करते. वाचकांच्या गरजा पुरविण्यासाठी सन १९७१ पासून मध्यवर्ती परिसरात ग्रंथालय कार्यरत झाले. गेल्या चार दशकापासून मा. अध्यक्ष, ग्रथपाल सल्लागार समिती यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रथालयाची समृध्दी होत असून शास्त्रज्ञ, वाचक, शिक्षक यांना अविरत सेवा देत आहे. सध्याच्या माहिती व तंत्रज्ञान युगात ग्रंथालयाच्या सेवेमध्ये आमलाग्र बदल झालेले आहेत. पारंपारिक सेवेसोबत सध्या ग्रंथालयाच्या इंटरनेट, ई–मेल सेवा, सीडी रोम शोध सेवा, ई नियतकालिके, सेरा, माहिती व तंत्रज्ञानावर आधारित सेवा देण्यात येतात.

## ग्रंथालय अनुदान

मध्यवर्ती परिसर, राहुरी येथील ग्रंथालयासाठी सन २०१९–२० मध्ये महाराष्ट्र शासनाकडून वेतनसाठी रू. ४६.६० लक्ष व आकस्मिक खर्चासाठी रू. ३.७१ लक्ष आणि विद्यापीठ अनुदान रू. ५.२७ लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले तसेच कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून रू. १४ लक्ष असे एकूण रू. ६९.५८ लक्षचे अनुदान ग्रंथालयास अहवाल वर्षात उपलब्ध झाले.

## नियतकालिके व पुस्तक खरेदी

चालू अहवाल वर्षात १७८ पुस्तके, १०३ नियतकालिके, ३०६ प्रबंधे यांची ग्रंथ संग्रहात भर पडली आणि ३१.३.२०२० रोजी एकूण ग्रंथ संख्या १,१२,८७८ इतकी झाली. जर्नल ऑफ महाराष्ट्र ॲग्रीकल्चरल युनिव्हरसिटीच्या अदलाबदल कार्यक्रमातंर्गत १४ नियतकालिके प्राप्त झाली आहेत. तसेच ४० नियतकालिके भेट म्हणून प्राप्त झाली आहेत.

## ग्रंथालय सेवा

१. मुक्तद्वार पध्दत
२. वाचनासाठी पुस्तके
३. आंतर ग्रंथाकालीन आदान–प्रदान
४. पुर्नआलेख सेवा (झेरॉक्स)

## माहिती तंत्रज्ञान सेवेअंतर्गत खालील सुविधा उपलब्ध आहेत

१. इंटरनेट सेवा
२. सीडी रोम डेटाबेसेस
३. सेरा (कन्सोरशियम ऑफ इ–रिर्सोसेस इन ॲग्रीकल्चर)
४. ई– जर्नल्स, ऑनलाईन ई–जर्नल्स
५. सांख्यिकी डेटाबेस
६. ई–थेसीस ॲब्स्ट्रॅक्टस डेटाबेस
७. दुरदर्शन संच/ कव्ह.सी.आर
८. कृषि प्रभा–कृषि कोष, ई–ग्रंथ इ.
९. ओपीएसी (ऑनलाईन पब्लीक ॲसेस कॅटलॉग)

## नविन उपक्रम व पध्दती

१. भाकृअप, नवी दिल्लीचा सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देण्यास

प्रारंभ करण्यात आला.

२. कृषि आणि संलग्न विज्ञान शाखेत २९ सहायक संकाय ओळखले.

३. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि स्वत: चे उद्योग सुरू करण्यासाठी त्यांची क्षमता वाढविण्यासाठी दहा आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यवहार्य अनुभवात्मक शिक्षण मॉड्यूलची स्थापना केली. प्रायोगिक शिक्षण मॉड्यूलचे नफा वाटून घेण्यासाठी विद्यापीठाचा ठराव अंमलबजावणीसाठी पारित करण्यात आला.

४. विद्यार्थ्यांना शिक्षण, संशोधन आणि परदेशात अभ्यास करण्याची संधी तसेच शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांसोबत संबंध विकसित केले.

५. प्रत्येक घटक महाविद्यालयात प्लेसमेंट सेलची स्थापना करण्यात आली आहे.

६. ऐआरएस / जेआरएफ / एसआरएफ / नेट / गेट परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरीत प्रत्येक घटक महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मंच सक्रिय करण्यात आला आहे.

७. पदवी/ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संबंधित विद्याशाखेतील गुणवत्ता पुरस्कार प्रदान केला जातो.

८. विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी अनुक्रमे अवहान, अश्वमेध, इंद्रधनुष्य आणि अविष्कार यांसारख्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरित केले जाते.

९. सर्व पदवी कार्यक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सामील करून प्रत्येक विद्यार्थ्याने पाच झाडे लावून वृक्ष लागवडीची नवीन संकल्पना राबविन्यात येत आहे.

## हवामान अद्ययावत कृषी आणि पाणी व्यवस्थापनासाठी प्रगत कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्र

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीस राष्ट्रीय कृषी उच्च शिक्षण प्रकल्प (एनएएचईपी) अंतर्गत भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचा प्रतिष्ठित जागतिक बँक प्रकल्प हवामान अद्ययावत कृषी आणि जल व्यवस्थापनासाठी प्रगत कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान या शीर्षकासह प्राप्त झाला.

### मुख्य उद्दीष्टे

१. अचूक हवामान अद्ययावत कृषी आणि जल व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा विकास आणि अवलंब करण्यासाठी प्राध्यापक आणि वैज्ञानिक यांच्यात क्षमता विकसित करणे.

२. मानव संसाधन विकसित करण्यासाठी त्यांना सार्वजनिक क्षेत्रातील आणि खाजगी उद्योगांमध्ये उद्योजकता आणि नोकरी करण्यायोग्य सक्षम करण्यासाठी हवामान अद्ययावत कृषी आणि जल व्यवस्थापनामध्ये एक वर्षाचा पदव्युत्तर पदविका सुरू करणे; सध्याच्या एम.एस्सी, एम. टेक., आणि आचार्य अभ्यासक्रम (त्यांच्या संशोधन प्रकल्पांसाठी) बळकट करणे आणि प्राध्यापकांना/ संशोधकांना अचूक जल व्यवस्थापन, अचूक हवामान अद्ययावत शेती आणि भौगोलिक-माहितीशास्त्रातील पोस्ट डॉक्टरेट अभ्यासासाठी तरतूद करणे.

३. आरएस / जीआयएस आणि जीपीएस टूल्स, मॉडेलिंग आणि एसडीएसएस टूल्स विना मानवरहित एरियल सिस्टम (यूएएस ड्रोन) आणि सेन्सर-आधारित तंत्रज्ञानासह समाकलित प्रणाली विकसित करणे; हवामान अद्ययावत व अचूक शेती आणि जल व्यवस्थापनासाठी मोबाइल अनुप्रयोग आणि त्यांचे उपयोजन.

४. कार्यांतर्गत नोकरी-प्रशिक्षण आणि अभ्यासाधारित शिक्षण प्रणाली राबविणे; रोजगार आणि प्लेसमेंट दर वृध्दिंगत करणे आणि व्यवसाय आणि उद्योजकता संधी.

एकूण २०.०० कोटी रुपये अर्थसंकल्प असलेला प्रकल्प डॉ. के. पी. विश्वनाथा, कुलगुरू, मफुकृवि, राहुरी यांच्या नेतृत्वात डॉ. ए. एल. फरांदे, अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी, डॉ. एस. आर. गडाख, संशोधन संचालक आणि विस्तार शिक्षण संचालक, मफुकृवि, राहुरी यांच्या मुख्य संचालक, विस्तार शिक्षण संचालक, राहुरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. ए. एल. फरांदे, अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, मफुकृवि, राहुरी यांच्या प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणाखाली डॉ. एस.डी. गोरंटीवार, प्रमुख अन्वेषक आणि डॉ. एम.जी. शिंदे, सह-मुख्य अन्वेषक; डॉ. जे.एस. पाचपुते, सह-मुख्य अन्वेषक, मफुकृवि, राहुरी यांच्यासह २२ विद्याशाखा सदस्य आणि २२ विविध विभागातील संशोधन सहकारी सादर करणेत आला.

या प्रकल्पाने परदेशातील विविध विद्यापीठे, वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी, पुलमन, डब्ल्यूए, यूएसए; मिसिसिपी स्टेट युनिव्हर्सिटी, स्टार्कविले, एमएस, यूएसए; आंतरराष्ट्रीय जल व्यवस्थापन संस्था (आयडब्ल्यूएमआय) कोलंबो, श्रीलंका (सीजीआयएआर

ऑर्गनायझेशन); एशियन इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बँकॉक, थायलंड; लॉफबरो युनिव्हर्सिटी, यूके आणि प्रतिष्ठित राष्ट्रीय संस्था व संघटना जसे की, भारतीय तंत्रज्ञान संस्था, पवई, मुंबई; इंडियन इंस्टिट्यूट ऑफ रिमोट सेन्सिंग, देहरादून; राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्था, माळेगाव, बारामती; सेंट्रल रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर ड्रायलँड ॲग्रीकल्चर (सीआरआयडीए), हैदराबाद आणि नॅशनल ब्युरो ऑफ सॉइल सायन्स अँड लँड यूज प्लॅनिंग, नागपूर यांचेशी सहकार्यात्मक करार केले आहेत.

हवामान अद्ययावत शेतीसाठी काटेकोर शेती यंत्रे, रोबोटिक्स आणि ड्रोनचा उपयोग, अचूक व काटेकोर जल व्यवस्थापन, स्वयंचलित सिंचन प्रणाली, दुरस्थ संवेदन, जीआयएस आणि जीपीएस, हवामान अनुकूल कृषि आणि हवामान अद्ययावत खेड्यांमध्ये गूगल अर्थ इंजिन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अनुप्रयोग ही हवामान अद्ययावत कृषी व जल व्यवस्थापन या प्रकल्पाची प्रमुख अंगे आहेत.

## सन २०१९–२० मधील ठळक उपलब्धी खालीलप्रमाणे

### १) क्षमता विकास

| अ.क्र | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण | ०१ |
| २ | आंतरराष्ट्रीय भेटी | ०१ |
| ३ | आंतरराष्ट्रीय सिंपोझियम | ०२ |
| ४ | आंतरराष्ट्रीय कार्यशाळा | ०३ |
| ५ | विद्यार्थी–उद्योग संन्मुख परिषद | २७ |
| ६ | प्रशिक्षण | २८ |
| ७ | अतिथी व्याख्याने | १२ |
| ८ | अभ्यास दौरा | १४ |
| ९ | प्रात्यक्षिके | ०५ |
| | **एकुण** | **९४** |
| | **लाभार्थी संख्या (प्राध्यापक, विद्यार्थी आणि शेतकरी)** | **५७०४** |

डॉ. सुनील कदम, सहाय्यक प्राध्यापक, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी या विद्यापीठाच्या सदर प्रकलाच्या सदस्यांपैकी एक यांना वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी, पुलमन, यूएसए मध्ये पोस्ट डॉक्टरेट रिसर्च फेलोशिप देण्यात आली आहे आणि डिसेंबर, २०१९ मध्ये ते रुजू झाले आहेत.

### २) शैक्षणिक कार्यक्रम

अ) मफुकृवि, राहुरी आणि पुणे परिसरामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भागीदारांसह आयोजित आठ कार्यशाळांमध्ये आणि उच्च चर्चासत्रांमध्ये प्रत्येक मॉड्यूलमध्ये पाठविलेल्या अभ्यासक्रमांसह पीजी डिप्लोमाची चौकट निश्चित केली गेली आहे. हा डिप्लोमा हा मॉड्यूल बेस्ड असल्याने आदर्श आहे. ५२ आठवड्यांमध्ये म्हणजेच एकावर्षात चार मॉड्यूल शिकविले जातील.

**मॉड्यूल–१ :** १० आठवड्यांच्या कालावधीचे आहे; ३ आठवड्यांचा ३ कोर्स असून त्या नंतर उद्योग व शेतकरी दिन आहे.

**मॉड्यूल–२ आणि ३ :** प्रत्येक १३ आठवड्यांच्या कालावधीचे आहेत; प्रत्येकी ३ आठवड्यांच्या कालावधीचे ३ कोर्स व त्यानंतर ३ आठवड्यांच्या कालावधीचे प्रकल्प.

**मॉड्यूल–४ :** हा १६ आठवड्यांचा कालावधी आहे त्यानंतर ६ आठवड्यांचा कालावधी प्रकल्प आहे. नैसर्गिक संसाधने व्यवस्थापन, काटेकोर कृषी यंत्रे, काटेकोर सिंचन व्यवस्थापन आणि संरक्षित लागवड, रोबोटिक्स, ड्रोन्स आणि आयओटी, भौगोलिक माहिती आणि सामाजिक विज्ञान या संदर्भात हवामान अद्ययावत कृषी आणि जल व्यवस्थापनासाठी तीन आठवड्यांच्या कालावधीचे ७१ अभ्यासक्रम विकसित करण्यात आले आहेत.

ब) पोस्ट डॉक्टरेट संशोधन कार्यक्रम सुरू केला आहे.

क) प्रमाणपत्र अभ्यासक्रम निश्चित केले आहेत.

ड) हवामान अद्ययावत कृषी व जल व्यवस्थापनाशी निगडीत नॉन क्रेडिट किंवा ऑडिट कोर्स एम.एस्सी / एम.टेक आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासह राबविण्याकरिता तयार केले आहे.

ई) ड्रोन / रोबोटिक्स प्रयोगशाळा विकसित केली असून आरएस, जीआयएस आणि सीएडी–सीएएम प्रयोगशाळा अद्ययावत केल्या आहेत.

### ३) नाविन्यपूर्ण संशोधनात पुढाकार

अ) निस्यंदन दर मोजण्यासाठी पारंपारिक डबल–रिंग इन्फिल्ट्रोमीटरच्या अडचणी आणि मर्यादा दूर करण्यासाठी, शेतात माती किंवा इतर सच्छिद्र माध्यमांमध्ये पाण्याचे निस्यंदन प्रमाण मोजण्यासाठी स्वयंचलित रिंग इन्फिल्ट्रोमीटरची रचना विकसित केली असून चाचणी केली आहे. हे उपकरण विद्यमान

इन्फिल्ट्रोमीटरच्या तुलनेत अचूक वेळ आणि मोजमाप करण्याम ध्ये सुयोग्य आहे.

ब) यांत्रिकीकरणाची आवश्यकता आणि उपलब्ध नेटवर्क सोल्यूशन्समध्ये प्रवेश करण्यासाठी फुले सन्मान सॉफ्टवेअर आणि मोबाइल ॲप विकसित केले गेले. सदर मोबाइल ॲप हे शेतक–यांद्वारे सद्यस्थितीतील उपयोजित कृषी यंत्रे यांचा माहिती संपादन, तफावत शोधण्यासाठी आणि सेवा प्रदात्याच्या स्थान आणि सुविधांसह यांत्रिकीकरणासाठी इष्टतम निराकरणासाठी विकसित केले गेले आहे.

क) स्थान आधारित नाव किंवा गूगल नकाशावरील स्थानावर क्लिक करून पिकाच्या पाण्याची गरज लक्षात घेण्यासाठी आवश्यक स्थानिक ईटीआर (मिमी / दिवस) मोजण्यासाठी वेब आधारीत व मोबाइल आधारीत स्थानिक इव्हॅपो–ट्रान्सपिरेशन (ईटी) कॅल्क्युलेटर विकसित केले गेले. हा कॅल्क्युलेटर पेनमन मॉन्टीथ पद्धतीने हवामान अंदाजानुसार वर्तमान दिवस आणि पुढील चार दिवस इच्छित स्थानाचे ईटीआर प्रदान करते.

## ४) अभिज्ञान उपलब्धी

अ) हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाशी संबंधित संशोधन, प्रयोग आणि प्रात्यक्षिकांसाठी हवामान अद्ययावत कृषी खंड विकसित केले.

ब) आठ निवडलेल्या खेड्यांमध्ये हवामान अद्ययावत ग्राम पध्दतीची अंमलबजावणी करणे आणि हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन तंत्रज्ञानांची संभाव्यता वाढविण्याची तपासणी करणे.

क) महाराष्ट्रातील अकोले ब्लॉकच्या सात दत्तक गावांसाठी ग्रामीण पातळीवरील आपत्कालीन पीक योजना विकसित केली.

ड) पुणे जिल्हयातील जुन्नर तहसीलमध्ये बुचकेवाडी गाव डिजिटल ग्राम विकसित करण्यासाठी अचूक पाणी व्यवस्थापनाच्या संदर्भात उपक्रम सुरू केले.

ई) हवामान अद्ययावत शेती आणि अचूक जल व्यवस्थापन यासाठी शेतक–यांची क्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले.

## विद्यापीठाच्या शैक्षणिक संस्था

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| | **अ) घटक महाविद्यालय** | | |
| १ | पदव्युत्तर महाविद्यालय, राहुरी | पी.एच.डी. (कृषि) | ७० |
| | | एम.एस्सी. (कृषि) | १६८ |
| | | एम.एस्सी.(उद्यानविद्या) | १२ |
| | | एम.एस्सी.(जैव तंत्रज्ञान) | ८ |
| २ | कृषि महाविद्यालय, पुणे | पी.एच.डी. (कृषि हवामानशास्त्र) | २ |
| | | एम.एस्सी. (कृषि) | ५४ |
| | | एम.एस्सी.(उदयानविद्या) | ६ |
| | | एम.बी.ए. (कृषि व्यवसाय व्यवस्थापन) | ३० |
| | | बी.एस्सी. (कृषि) | १९० |
| ३ | राजर्षी छत्रपती शाहु महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर | एम.एस्सी. (कृषि) | ४८ |
| | | एम.एस्सी.(उद्यानविद्या) | ६ |
| | | बी. एस.सी. (कृषि) | १९० |
| ४ | कृषि महाविद्यालय, धुळे | एम.एस.सी. (कृषि) | २४ |
| | | एम.एस. सी.(उद्यानविद्या) | ४ |
| | | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२८ |
| ५ | कृषि महाविद्यालय, कराड | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| ६ | कृषि महाविद्यालय, नंदुरबार | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| ७ | कृषि महाविद्यालय,मुक्ताईनगर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| ८ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगांव | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ३२ |
| ९ | उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे | बी.एस्सी.(ऑनर्स) उद्यानविद्या | ३२ |
| १० | डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी | पी.एच.डी. (कृषि अभि) | १२ |
| | | एम.टेक (कृषि अभि) | १६ |
| | | बी.टेक (कृषि अभि) | ६४ |
| | **ब) विना अनुदानीत महाविद्यालय** | | |
| १. | कृषि महाविद्यालय, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| २. | डॉ. आप्पासाहेब पवार कृषि महाविद्यालय, कृषि विकास प्रतिष्ठान, बारामती, मु.पो. शारदानगर, ता. बारामती, जि. पुणे | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १८० |
| ३. | लोकनेते मोहनराव कदम कृषि महाविद्यालय, भारती विद्यापीठ, कडेगांव, जि.सांगली. | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| ४. | कृषि महाविद्यालय, कर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील मराठा विद्या प्रसारक,शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | जयंतराव भोसले कृष्णा कृषि महाविद्यालय, कृष्णा सहकारी साखर कारखाना लि.रेठरे बु.।।, मु.पो. शिवनगर, ता. कराड, जि.सातारा | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| ६. | कृषि महाविद्यालय, मूळा एज्यूकेशन सोसायटी, सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १८० |
| ७. | कर्मवीर काकासाहेब वाघ कृषि महाविद्यालय, अमृतधाम, पंचवटी, नाशिक | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| ८. | दादासाहेब मोकाशी कृषि महाविद्यालय, राजमाची, ता.कराड, जि.सातारा. | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| ९. | डॉ. उल्हास पाटील कृषि महाविद्यालय, जळगांव, जि. जळगांव | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| १०. | डॉ. डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कृषि महाविद्यालय, आंबी, ता. मावळ, जि.पुणे | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| ११. | कृषि महाविद्यालय, पुज्य साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ, शहादा, ता.शहादा, जि.नंदूरबार | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| १२. | लोकमंगल कृषि महाविद्यालय, श्रीराम ग्रामीण व विकास प्रतिष्ठाण, मु.पो.वडाळा, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| १३. | डॉ. डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कृषि महाविद्यालय, तळसंदे ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| १४. | कृषि महाविद्यालय, फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण, जि. सातारा | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| १५. | कृषि महाविद्यालय, नवलभाऊ प्रतिष्ठाण, नवलनगर, मु.पो. अमळनेर,जि. जळगांव | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| १६. | श्रमशक्ती कृषि महाविद्यालय, सेवा संस्कार संस्था, श्रमीक प्रतिष्ठाण, मु.पो. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| १७. | कृषि महाविद्यालय, श्री. संत गजानन महाराज ग्रामिण विकास प्रतिष्ठाण, मु.पो. मिरजगांव, ता. कर्जत, जि. अहमदनगर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १२० |
| १८. | कृषि महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | १८० |
| १९. | कृषि महाविद्यालय, बाभुळगाव, ता.येवला, जि. नाशिक | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| २०. | कृषि महाविद्यालय, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| २१. | साईकृपा कृषि महाविद्यालय, घारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| २२. | शरद कृषि महाविद्यालय, जैनापूर, जि. कोल्हापूर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| २३. | कृषि महाविद्यालय, पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| २४. | डॉ. विठकृषि महाविद्यालय, विळदघाट, जि. अहमदनगर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| २५. | रोशनजी शमनजी कृषि महाविद्यालय, नेसरी, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |

| | | | |
|---|---|---|---|
| २६. | कृषि महाविद्यालय, मालेगांव, जि. नाशिक | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| २७ | कृषि महाविद्यालय,भानसहिवरा, नेवासा, अहमदनगर | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषि | ६० |
| २८. | उद्यानविद्या महाविद्यालय, फलटण एज्यूकेशन सोसायटी ता.फलटण, जि.सातारा | बी.एस्सी. (ऑनर्स) उद्यानविद्या | ८० |
| २९. | उद्यानविद्या महाविद्यालय, कडेगाव, जि. सांगली | बी.एस्सी. (ऑनर्स) उद्यानविद्या | ४० |
| ३०. | क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक | बी.एस्सी. (ऑनर्स) उद्यानविद्या | ४० |
| ३१. | एच.एच.एस.एस.एम.एस. उद्यानविद्या महाविद्यालय, मालेगांव, जि. नाशिक | बी.एस्सी. (ऑनर्स) उद्यानविद्या | ४० |
| ३२. | श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालय,पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर | बी.एस्सी. (ऑनर्स) उद्यानविद्या | ४० |
| ३३. | डॉ.उल्हास पाटील कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, गोदावरी फाँऊडेशन, जळगांव, ता.जि. जळगांव | बी.टेक. (कृषि अभि.) | ८० |
| ३४. | कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, पद्मश्री डॉ.डी.वाय. पाटील एज्यूकेशन सोसायटी, तळसंदे ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. | बी.टेक. (कृषि अभि.) | ८० |
| ३५. | कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, कर्मवीर काकासाहेब वाघ एज्यूकेशन सोसायटी, नाशिक, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक | बी.टेक. (कृषि अभि.) | ८० |
| ३६. | सह्याद्री कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, यशवंतनगर, कराड, जि. सातारा | बी.टेक. (कृषि अभि.) | ४० |
| ३७. | कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, मिरजगांव, ता कर्जत, जि. अहमदनगर | बी.टेक. (कृषि अभि.) | ४० |
| ३८. | कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर | बी.टेक.(कृषि अभि.) | ४० |
| ३९. | कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, श्रमीक प्रतिष्ठाण, मु.पो. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | बी.टेक.(कृषि अभि.) | ४० |
| ४०. | दादासाहेब मोकाशी कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय,राजमाची, ता कराड. जि. सातारा | बी.टेक.(कृषि अभि.) | ४० |
| ४१. | दादासाहेब मोकाशी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, राजमाची, ता. कराड, जि.सातारा | बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान) | ८० |
| ४२. | अन्नविज्ञान व तंत्रशास्त्र महाविद्यालय, के.के. वाघ एज्युकेशन सोसायटी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक | बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान) | ८० |
| ४३. | श्रमशक्ती अन्नविज्ञान व तंत्रज्ञान महाविद्यालय, सेवा संस्कार संस्था, श्रमीक प्रतिष्ठाण, मु.पो. मालदाड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान) | ८० |
| ४४. | डॉ. उल्हास पाटील अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, जळगांव. जि. जळगांव. | बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान) | ४० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५. | अन्नविज्ञान व तंत्रज्ञान महाविद्यालय, दिवानमळा (लळींग), धुळे, जि. धुळे | बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान) | ४० |
| ४६. | जी.डी. अन्नविज्ञान व तंत्रज्ञान महाविद्यालय, वाघोली, ता. मोहोळ, जि.सोलापूर | बी.टेक.(अन्न व तंत्रज्ञान) | ४० |
| ४७. | अन्नविज्ञान व तंत्रज्ञान महाविद्यालय, घारगांव, ता.श्रीगोंदा,जि. अहमदनगर | बी.टेक. अन्न व तंत्रज्ञान) | ४० |
| ४८. | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ८० |
| ४९. | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, के.के. वाघ शिक्षण संस्था, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, जि. नाशिक | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ८० |
| ५०. | लोकमंगल कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, श्रीराम ग्रामीण व विकास प्रतिष्ठाण, मु.पो. वडाळा, जि. सोलापूर | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ४० |
| ५१. | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, मु.पो. पौड, ता. मुळशी, जि. पुणे | बी.टेक. (जैवतंत्रज्ञान) | ४० |
| ५२. | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, राजलक्ष्मी फाउंडेशन, मदडगाव, पो. भातोडी, जि. अहमदनगर | बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) | ८० |
| ५३. | कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, विद्या प्रतिष्ठाण, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती, जि.पुणे | बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) | ४० |
| ५४. | डॉ. डी.वाय.पाटील कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, डॉ.डी.वाय. पाटील प्रतिष्ठान, आकुर्डी, जि. पुणे | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ८० |
| ५५. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु. पो. नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ८० |
| ५६. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, विलींगडन कॉलेज कॅम्पस, विश्राम बाग, सांगली | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ४० |
| ५७. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ४० |
| ५८. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ४० |
| ५९. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, के.के. वाघ शिक्षण संस्था, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ४० |
| ६०. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, श्रीराम ग्रामीण व विकास प्रतिष्ठाण वडाळा, जि. सोलापूर | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ४० |
| ६१. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, बारामती, जि. पुणे | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ४० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६२. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय,पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर | बी.एस्सी.(ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ४० |
| ६३. | पशुशास्त्र महाविद्यालय, बारामती, जि. पुणे | बी.एस्सी. (पशुशास्त्र) | ३० |
| | **क) कृषि पदविका** | | |
| १. | कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म (पुणे), कोल्हापूर, धुळे, बोरगांव (सातारा), सोलापूर, डिग्रस (सांगली), पुणतांबा (अहमदनगर), मालेगांव (नाशिक), जळगांव | कृषि पदविका | ६० (प्रत्येकी) |
| २. | मान्यता प्राप्त खाजगी कृषि तंत्र निकतने (एकूण- ७४) | कृषि पदविका | ६० (प्रत्येकी) |
| ३. | माळी प्रशिक्षण केंद्र, गणेशाखिंड, पुणे | प्रमाणपत्र | ४० |
| ४. | मान्यता प्राप्त माळी प्रशिक्षण केंद्र (एकूण- ०४) | प्रमाणपत्र | ४० (प्रत्येकी) |

## सन २०१९-२० मध्ये अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी

| अ.क. | पदवी अभ्यासक्रमाचे नांव | सन २०१८-१९ मध्ये अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी |
|---|---|---|
| | **पदवी अभ्यासक्रम** | |
| १ | बी.एस्सी. (कृषि) | २९८२ |
| २ | बी.एस्सी. (उद्यानविद्या) | २४४ |
| ३ | बी.टेक. (कृषि अभि.) | ४२४ |
| ४ | बी.टेक. (अनशास्त्र) | ३८३ |
| ५ | बी.एस्सी. (जैव तंत्रज्ञान) | ३०९ |
| ६ | बी.एस्सी. ( कृषि व्यवसाय व्यवस्थापन) | ३४५ |
| ७ | बी.एस्सी. (पशुसंवर्धन) | २० |
| | **एकुण** | **४७०७** |
| | **पदव्युत्तर अभ्यासक्रम** | |
| ८ | एम.एस्सी .(कृषि) | २५१ |
| ९ | एम.एस्सी.(उद्यानविद्या) | १४ |
| १० | एम.टेक. (कृषि अभियांत्रिकी) | १० |
| ११ | पी.एच.डी. | ५२ |
| १२ | एम.बी.ए.(कृषि) | ३० |
| १३ | एम.एस्सी. (कृषि जैवतंत्रज्ञान) | ०३ |
| | **एकुण** | **३६०** |
| | **कृषि पदविका अभ्यासक्रम** | |
| १४ | कृषि पदविका (तंत्र विद्यालय) | १७१५ |
| १५ | कृषि पदविका (तंत्र निकेतन) | ३२४२ |

# ३. संशोधन



पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्हे हे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असून कोकणलगतचा पश्चिम घाट, पूर्वेकडील डोंगरउताराचा उपपर्वतीय विभाग, मैदानी विभाग आणि सोलापूरपासून धुळ्यापर्यंत विखुरलेला अवर्षणप्रवण विभाग असे चार कृषि हवामान विभाग आहेत. शिवाय मध्यवर्ती पठारी विभागातील हमखास पावसाचा जळगांव जिल्हा या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतो. या दहा जिल्ह्यातील जमीन, हवामान, पीक पद्धती, पशुधन आणि शेतीशी निगडीत इतर जोडधंद्यांसंबंधीच्या समस्यांवरील कृषि हवामान विभागातील २७ संशोधन केंद्रांवर संशोधन केले जाते. या विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसराशिवाय चार विभागीय कृषि संशोधन केंद्रे, इगतपूरी, पुणे, कोल्हापूर व सोलापूर, ४ राज्यस्तरीय विषय विशेषज्ञ जळगाव-तेलबिया, पाडेगांव-ऊस, निफाड-गहू आणि सोलापूर-मृद आणि इतर १८ संशोधन केंद्रे आणि कृषि महाविद्यालये येथे राज्य शासन अनुदानित ८२ योजनेतर योजना राबविल्या जात आहेत. तसेच अखिल भारतीय समन्वीत योजनेअंतर्गत एकूण ४५ संशोधन प्रकल्प विद्यापीठात कार्यरत आहेत, शिवाय केंद्र पुरस्कृत १०० टक्के अनुदानीत १ संशोधन प्रकल्प या विद्यापीठात चालू आहेत.

गेल्या ५० वर्षात महात्मा फुले कृषि विद्यापीठाने भरीव संशोधन करुन विविध अन्नधान्ये, कडधान्ये, गळीतधान्ये या पिकांचे तसेच कापूस, ऊस, भाजीपाला, फळे, फुले आणि चारा पिकांचे अनेक वाण (२६३ पेक्षा जास्त) विकसीत केले आहेत. यापैकी अनेक वाण राज्यातच नव्हे तर राज्याबाहेरही प्रसारीत करण्यात आले. मृद व जलसंधारण, विविध पिके आणि पीक लागवड पध्दती, खते आणि पाणी व्यवस्थापन, आंतरम शागत, तण,रोग आणि किडींचे एकात्मिक व्यवस्थापन, सुधारीत औजारे, हरीतगृहातील शेती, प्रक्रिया आणि विपणन याविषयी सखोल संशोधन करुन अनेक शिफारशी देण्यात आल्या. राज्यातील मर्यादित सिंचन सुविधा लक्षात घेऊन कोरडवाहू शेती तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात आला. मृद आणि जलसंधारणाच्या पध्दती, जमीन, पाऊसमान आणि हंगामानुसार पीक व्यवस्थापन, मध्य हंगाम दुरुस्ती, पडणाऱ्या पाऊस पाण्याचा अधिक कार्यक्षमतेने वापर करणाऱ्या पिकांचे सुधारित वाण आणि पीक पध्दती विकसित करणे आणि पाणलोट क्षेत्रातील पाणी अडवून त्याचा उत्पादन वाढीसाठी जास्तीत जास्त क्षमतेने वापर करणे याविषयी बहुमोल संशोधन करण्यात आले.

विद्यापीठाने जैवतंत्रज्ञान क्षेत्रात भरीव कार्य केले असून वनस्पती ऊती संवर्धन, अणुजीवशास्त्र, जैविक कीड नियंत्रण व जीवाणू खते यामध्ये जैवतंत्रज्ञानाचा वापर करण्याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

अहवाल वर्षात विद्यापीठाने विकसीत केलेले निरनिराळ्या ९ वाण व ३ कृषि औजारे प्रसारीत केले असून शेतकऱ्यांकरीता वेगवेगळ्या पिकांवर पीक पध्दतीवर, संरक्षण आणि प्रक्रियावर आधारित ५९ तंत्रज्ञानाच्या शिफारशी दिल्या.

## विद्यापीठात कार्यरत विभागीय, राज्य पातळीवरील प्रमुख कृषि संशोधन केंद्रे व तपासणीसाठीची संशोधन केंद्रे

| अ.क्र. | कृषि संशोधन केंद्र | मुख्य कार्य | तपासणी कार्य |
|---|---|---|---|
| **अ. पश्चिम घाट विभाग** | | | |
| १. | विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपूरी, जि. नासिक | भात, कारळा, वनीय कुरण, मृद व जलसंधारण | रबी कडधान्ये, फलोद्यान, रागी, हळद |
| २. | कृषि संशोधन केंद्र, लोणावळा, जि. पुणे | भात (रोग व निदान) | - |
| ३. | कृषि संशोधन केंद्र, महाबळेश्वर, जि. सातारा | गहू (तांबेरा रोग) | भाजीपाला, स्ट्रॉबेरी |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, राधानगरी, जि.कोल्हापूर | कोरडवाहू भात | गहू, वाल |
| **ब. उप-पर्वतीय विभाग** | | | |
| १. | विभागीय कृषि संशोधन केंद्र, कोल्हापूर | ऊस, मका | गवत, कोरडवाहू फळे, भाजीपाला, सोयाबीन, भुईमूग, सेंद्रीय भाजीपाला शेती |
| २. | विभागीय ऊस व गुळ संशोधन केंद्र, कोल्हापूर | ऊस, गूळ | ऊस आधारीत पीक पध्दती |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | कृषि संशोधन केंद्र, गडहिंग्लज | सेंद्रीय शेती, बासमती भात | ज्वारी खरीप, कडधान्ये, मिरची व गळीत धान्य |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, कराड, जि. सातारा | एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, पीक पध्दती | कडधान्ये, मका, खरीप ज्वारी, सोयाबीन, सुर्यफुल, भुईमूग |
| ५. | कृषि संशोधन केंद्र, वडगांव मावळ | भात | भात आधारीत पीक पध्दती |
| **क. मैदानी प्रदेश विभाग** | | | |
| १. | विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे | फळे, भाजीपाला, फुले, राजमाबीन, मसाल्याचे पदार्थ | कडधान्य, गळीतधान्य, गहू |
| २. | कृषि संशोधन केंद्र, डिग्रज, जि. सांगली | हळद, सोयाबीन, भुईमूग, पानवेल, क्षारपड जमीन सुधारणा | खरीप ज्वारी, कडधान्ये, ऊस, शर्करा कंद |
| ३. | कृषि संशोधन केंद्र, निफाड, जि. नासिक | गहू, गहू आधारीत पीक पध्दती | बाजरी, कडधान्ये व तेलबिया |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, पिंपळगांव बसवंत जि. नासिक | द्राक्षे, कांदा व लसूण | डाळिंब, भाजीपाला |
| **ड. अवर्षण प्रवण विभाग** | | | |
| १. | विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर | कोरडवाहू शेती, सुर्यफुल, करडई व कृषि हवामान शास्त्र | रब्बी ज्वारी, कडधान्ये, बाजरी |
| २. | कृषि संशोधन केंद्र, मोहोळ, जि. सोलापूर | रब्बी ज्वारी | कडधान्ये व तेलबिया |
| ३. | कृषि संशोधन केंद्र, जेऊर, जि. सोलापूर | कोरडवाहू | रब्बी ज्वारी, कडधान्ये |
| ४. | कृषि संशोधन केंद्र, पंढरपूर, जि.सोलापूर | कडधान्ये व तेलबिया | कोरडवाहू फळपिके |
| ५. | कृषि संशोधन केंद्र, चास, जि.अहमदनगर | – | बाजरी, कडधान्ये (खरीप), रबी ज्वारी व कोरडवाहू शेती |
| ६. | मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव जि. सातारा | ऊस व ऊस आधारीत शेती आणि पीक पध्दती | शर्करा कंद |
| ७. | मध्यवर्ती परिसर, राहुरी | ज्वारी, कडधान्ये, बागायती कापूस, चारा पिके, गवत, उन्हाळी भुईमूग, फळे, भाजीपाला, पीक पध्दती, पाणी व्यवस्थापन, सेंद्रीय शेती, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, जैवतंत्रज्ञान, काढणी पश्चात तंत्रज्ञान, शेती औजारे, शेळी, मेंढी, गाय | – |
| ८. | कृषि संशोधन केंद्र, सावळविहीर फार्म, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर | सुर्यफुल | बाजरी, कडधान्ये, सोयाबीन, कापूस व गहू |
| ९. | कृषि संशोधन केंद्र, श्रीरामपूर जि.अ.नगर | लिंबूवर्गीय फळे | – |
| १०. | कृषि संशोधन केंद्र, धुळे | कोरडवाहू शेती, बाजरी, गवत | खरीप ज्वारी, कडधान्ये, तेलबिया, जिरायती कापूस, कोरडवाहू फळ पिके |
| ११. | अखिल भारतीय समन्वित अंजीर व सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी (पुणे) | अंजीर व सिताफळ | – |
| १२. | डाळिंब संशोधन प्रकल्प, लखमापूर ता. सटाणा जि. नासिक | डाळिंब | डाळिंब |
| **इ. मध्य महाराष्ट्र पठारी विभाग** | | | |
| १. | तेलबिया संशोधन केंद्र, जळगांव | तेलबिया, केळी, पानवेल व जिरायती कापूस | कडधान्ये, खरीप ज्वारी, सोयाबीन, सुर्यफुल |

भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्र राज्य कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या चार विभागात विभागले आहे. हे चारही विभाग जमीन, पाऊस, हवामान आणि पर्यायाने पीक पध्दतीनुसार वेगवेगळे आहेत. वास्तविक पाहता, जमीन व कृषि हवामानानुसार राज्याचे नऊ विभाग पडतात. उत्तर कोकण, दक्षिण कोकण, पर्वतीय विभाग, उपपर्वतीय विभाग, मैदानी प्रदेश, अवर्षणप्रवण विभाग, मध्य पठारीप्रदेश, पश्चिम विदर्भ आणि पूर्व विदर्भ असे हे विभाग आहेत. या विभागांतर्गत विविध कृषि हवामान गटांचा अंतर्भाव होतो. या कृषि हवामान विभागानुसार आणि पाट पाण्याच्या उपलब्धतेनुसार त्या त्या भागातील शेती विकसित करणे विशेषत: अल्प आणि अत्यल्प भूधारकास शेती करणे किफायतशीर ठरावे या दृष्टीने त्या त्या विभागातील नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग आणि विकास करुन कृषि संबंधी नियोजन करणे गरजेचे आहे.

शाश्वत शेती उत्पादनासाठी शेती पध्दतीमध्ये शेळी–मेंढी, कुक्कुटपालन, मधुमक्षिका, ससे आणि मत्स्य पालन, रेशिम उद्योग इत्यादींचा अंतर्भाव करुन त्यास चालना देणे आवश्यक आहे.

अधिक उत्पादकता असलेल्या पिकांची लागवड जास्त क्षमता असलेल्या विभागात घेणे फायदेशीर आहे. उदा. ऊस लागवड – कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर, द्राक्षे –नाशिक, सांगली, पुणे, सोलापूर, फळपिके– पुणे, अहमदनगर, सांगली, सोलापूर याच भागात घेतल्यास आर्थिक मोबदला जास्त मिळू शकेल.

शेती उत्पादन वाढीमध्ये शुध्द व चांगली गुणवत्ता असणाऱ्या बियाण्याच्या वापरास अनन्य साधारण महत्व असून तो हमखास असा उपाय आहे. पिकांच्या संकरीत व सुधारीत वाणांचे बीजोत्पादन मोठया प्रमाणात घेऊन शेतकऱ्यांना रास्त दरात वितरीत करणे आवश्यक आहे.

## अ) प्रसारीत वाण

### शेतीपिके वाण

**हरभरा : फुले विश्वराज (फुले जी १५१०९)**



हरभऱ्याचा फुले विश्वराज हा प्रचलित वाणापेक्षा सरासरी अधिक उत्पादन देणारा वाण मर रोगास प्रतिबंधक असुन पश्चिम महाराष्ट्रातील जिरायती लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.

**गहू : फुले सात्विक (एन आय ए डब्ल्यु ३१७०)**



गहू पिकाचा फुले सात्विक या वाणाची द्वीपकल्प क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील गव्हाच्या लागवडी खालील क्षेत्रासाठी प्रसारित करण्यात आला असून हा वाण बिस्किट निर्मितीसाठी उत्कृष्ट आढळून आलेला आहे.

**मटकी : फुले सरिता ( एम बी एस ८०३)**



मटकीचा फुले सरिता हा वाण प्रचलित वाणापेक्षा लवकर येणारा असून सरासरी उत्पादनामध्ये सरस आढळला आहे. यातील पोषकमुल्ये चांगली असून पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण क्षेत्रात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.

**चवळी : फुले सोनाली**



चवळीच्या अधिक धान्य उत्पादनासाठी, फुले सोनाली ह्या एकाच वेळी पक्व होणाऱ्या, उभट वाढीच्या वाण पश्चिम महाराष्ट्रातील चवळीच्या क्षेत्रासाठी प्रसारित करण्यात आला आहे.

**मुग – फुले चेतक (पी.एम.–७०७–०५)**



मुगाचा फुले चेतक हा जास्त उत्पादन देणारा (सरासरी उत्पादन १० क्वि./हे.) प्रचलीत वाण वैभव पेक्षा ३६ % व तुल्य वाण उत्कर्ष पेक्षा १३ % जास्त लवकर पक्व होणारा (६९ दिवस) व टपोऱ्या दाण्याचा वाण (१०० दाण्यांचे वजन ४.७७ ग्रॅम) महाराष्ट्रातील खरिप क्षेत्रासाठी प्रसारित करण्यात आला आहे.

**करडई : फुले भिवरा**



करडईचा फुले भिवरा हा वाण भारतातील करडई लागवड क्षेत्रात अधिक

धान्य उत्पादनासाठी प्रसारित करण्यात आला आहे.

**करडई : फुले निरा**



करडईचा फुले निरा हा वाण भारतातील करडई लागवड क्षेत्रात तेलाचे अधिक प्रमाण असल्याने लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.

### शेती अवजारे व यंत्रे

**ट्रॅक्टरचलित फुले कुट्टी यंत्र**



फळबागेतील छाटणीनंतर पडणाऱ्या अवशेषांची कुट्टी करून बेडवर दोन्ही बाजूस समांतर टाकण्याकरिता ''ट्रॅक्टरचलित फुले कुट्टी यंत्र'' प्रसारित करण्यात आले आहे.

**ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो– मेकॅनिक नियंत्रित ऑफसेट फळबागा व्यवस्थापन यंत्र**



फळबागेतील जारवा तोडणे तसेच वरंबा फोडण्या करिता ''ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो– मेकॅनिक नियंत्रित ऑफसेट फळबागा व्यवस्थापन यंत्र'' प्रसारित करण्यात आले आहे.

**ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे अवजार**



मध्यम ते खोल जमीनीत जिरायत पिकांसाठी मूलस्थानी जलसंधारण करणे करिता ६ x २ मीटर आकाराचे वाफे तयार करण्यासाठी ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे अवजार प्रसारित करण्यात आले आहे.

## पीक तंत्रज्ञान शिफारशी

### नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन

१. पश्चिम महाराष्ट्रातील मैदानी प्रदेशातील मध्यम खोल काळ्या जमिनीत संकरीत वांग्यापासून अधिक उत्पादन, आर्थिक फायदा आणि जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी शिफारसीत खत मात्रेसोबत (१००:५०:५० किलो/हे. नत्रःस्फुरदःपालाश + १० टन हेक्टरी शेणखत) १२% हुमिक आम्ल ३० किलो / हे. लागवडीच्या वेळी जमिनीतून देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्राच्या उपपर्वतीय विभागात जमिनीतील उपलब्ध पालाशची कमतरता असलेल्या हलक्या जमिनीमध्ये खरीप भुईमूग पिकाच्या अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी आणि जमिनीत पालाशची पातळी वाढविण्याकरिता शिफारसीत खत मात्रेसोबत (२५:५० किलो/हे. नत्र:स्फुरद + १० टन/हे. शेणखत) पालाश २० किलो प्रति हेक्टरी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत पूर्व हंगामी उसासाठी २०० टन प्रति हेक्टर आणि खोडव्यासाठी १५० टन प्रति हेक्टर अपेक्षित उत्पादन उद्दिष्टासाठी समीकरणानुसार ७५ टक्के खत मात्रा ठिबक सिंचनातून आणि लागण करतांना स्फुरद विरघळणारे जिवाणू २.५ लिटर प्रति हेक्टर आणि ॲसिटोबॅक्टर ३ किलो प्रती हेक्टर फवारणीद्वारे लागण केल्यानंतर ६० दिवसांनी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत बी.टि. कपाशीचे अधिक उत्पादन, आर्थिक फायदा व जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी बी.टी. कापशी करीता १० टन शेणखताबरोबर ५० क्विंटल प्रति हेक्टरी अपेक्षित उत्पादन समीकरणानुसार खतांची मात्रा ठिबक सिंचनातून देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**शेणखतासोबत अपेक्षित उत्पादन समीकरणे**

**खतामधुन द्यावयाचे नत्र, कि./हे.** = (९.५८ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.)– (१.१५ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि./हे.)– (१.४२ x शेणखत, टन/हे.)

**खतामधुन द्यावयाचे स्फुरद, कि./हे =** (३.६२ x अपेक्षित उत्पादन, क्विं /हे.)– (२.९९ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि./हे.)– (१.५९ x शेणखत, टन/हे.)

**खतामधुन द्यावयाचे पालाश, कि./हे. =** (८.३२ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.)– (०.४५ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि./हे.)– (३.७७ x शेणखत, टन/हे.)

५. पश्चिम महाराष्ट्रातील मध्यम खोल काळ्या जमिनीत हळदीचे ३०० ते ३५० क्विं/हे. अपेक्षित उत्पादनासाठी आणि जमिनीच्या सुपीकता टिकवण्यासाठी प्रति हेक्टरी २५ टन शेणखताबरोबर उत्पादन उद्दिष्ट समीकरणानुसार नत्र, स्फुरद आणि पालाश या संतुलित अन्नद्रव्यांची शिफारस करण्यात येत आहे.

**शेणखतासोबत अपेक्षित उत्पादन समीकरणे**

**खतामधुन द्यावयाचे नत्र, कि./हे. =** (०.९२ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.)– (०.१२ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि./हे.)– (१.६१ x शेणखत, टन/हे.)

**खतामधुन द्यावयाचे स्फुरद, कि./हे =** (०.५० x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.)– (१.७५ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि./हे.)– (०.५२ x शेणखत, टन/हे.)

**खतामधुन द्यावयाचे पालाश, कि./हे. =** (०.७७ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.)– (०.१२ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि./हे.)– (२.१७ x शेणखत, टन/हे.)

**शेणखत विरहित अपेक्षित उत्पादन समीकरणे**

**खतामधुन द्यावयाचे नत्र, कि./हे. =** (१.३९ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.)– (०.१८ x जमिनीतील उपलब्ध नत्र, कि./हे.)

**खतामधुन द्यावयाचे स्फुरद, कि./हे. =** (०.८४ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.)– (२.९३ x जमिनीतील उपलब्ध स्फुरद, कि./हे.)

**खतामधुन द्यावयाचे पालाश, कि./हे. =** (१.०२ x अपेक्षित उत्पादन, क्विं/हे.)– (०.१६ x जमिनीतील उपलब्ध पालाश, कि./हे.)

६. पश्चिम महाराष्ट्रामध्ये लोह व जस्त कमतरता असलेल्या मध्यम खोल काळ्या जमिनीत सोयाबीन पिकामध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांचे शोषण वाढविण्यासाठी तसेच अधिक धान्य उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी पेरणीपूर्वी सोयाबीन बियाणास फेरस सल्फेट आणि झिंक सल्फेटची ०.५% (५ ग्रमॅ/किलो बियाणे) प्रत्येकी बीजप्रक्रिया करून पेरणीच्या वेळी शिफारसीत खत मात्रेची (५०:७५:४५ कि/हे. नत्र:स्फुरद:पालाश + ५ टन/हे. शेणखत) शिफारस करण्यात येत आहे.

७. पश्चिम महाराष्ट्रातील हलक्या जमिनीवर खरीप कांद्याचे अधिक उत्पादन, आर्थिक फायदा, जमिनीतील सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता व शोषण होण्यासाठी पेरणीच्यावेळी सिलिकॉन १०० किलो/हे. देण्यासाठी जमिनीतून कॅल्शीयम सिलीकेट (२७८ कि/हे.) किवा बगॅस राख (३५७ किलो/हे.) शिफारसीत खत मात्रेसोबत (१००:५०:५० किलो/हे. नत्र:स्फुरद:पालाश + २० टन/हे. शेणखत) देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

८. पश्चिम महाराष्ट्रातील लोह आणि जस्त या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असणाऱ्या मध्यमखोल काळ्या जमिनीत ॲस्टरचे अधिक उत्पादन, आर्थिक फायदा तसेच जमिनीत लोह आणि जस्ताची उपलब्धता वाढविण्यासाठी जमिनीतून फेरस सल्फेट २० किलो आणि झिंक सल्फेट १० किलो प्रति हेक्टरी १०० किलो शेणखतात १५ दिवस मुरवून लागवडीच्या वेळी १०० क्विंटल/हे. अपेक्षित उत्पादनासाठी (१००:७५:७५ किलो/हे. नत्रःस्फुरद:पालाश +१० टन/हे. शेणखत) देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

९. महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण विभागातील मध्यम खोल काळ्या जमिनीमध्ये उडीद, ज्वारी या क्रमवार पीक पद्धतीच्या अधिक धान्य व कडबा उत्पादनासाठी, आर्थिक फायदा आणि ओलावा वापर कार्यक्षमता मिळवून जमिनीचे आरोग्य टिकविण्यासाठी आणि उडीद पिकाच्या धान्यासाठी कमीत कमी मशागत करून शिफारसीत खत मात्रेच्या ७५% मात्रा (१९ किलो नत्र + ३८ किलो स्फुरद प्रति हेक्टरी) देऊन तिसऱ्या आठवड्यामध्ये कोळपणी करावी. उडीद पिकाच्या काढणी नंतर रब्बी ज्वारी पेरणीच्या वेळी पिकास शिफारसीत खतमात्रेच्या ७५% मात्रा (३८ किलो नत्र + १९ किलो स्फुरद + २५ किलो पालाश प्रति हेक्टरी) देऊन तिसऱ्या आणि पाचव्या आठवड्यात दोन कोळपण्या करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१०. महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण विभागातील मध्यम खोल काळ्या जमिनीतील रब्बी ज्वारीच्या अधिक उत्पादनासाठी आणि अवर्षणाच्या परिणामाची तीव्रता कमी करण्यासाठी शिफारशीत खत मात्रेसोबत (५०:२५:२५ नत्र:स्फुरद:पालाश किलो प्रति हेक्टरी) पेरणी नंतर ३५ आणि ५५ दिवसांनी १ टक्का पोटॅशियम नायट्रेट ($KNO_3$) ची फवारणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

११. महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण विभागातील मध्यम खोल काळ्या जमिनीत खरीप सुर्यफुल पिकाच्या अधिक उत्पादन आणि आर्थिक फायद्यासाठी शिफारशीत खत मात्रेसोबत (५०:२५ किलो/हे. नत्र:स्फुरद) अधिक २.५ टन शेणखताबरोबर पालाश ५० किलो/हे. देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१२. पश्चिम महाराष्ट्रासाठी हलक्या ते मध्यम जमिनीत रब्बी लसूण पिकाच्या अधिक पिकाच्या अधिक उत्पादन व पाण्याचा कार्यक्षम वापर तसेच आर्थिक दृष्टया फायदेशीर उत्पादन मिळविण्यासाठी पीक बाष्पोत्सर्जनाच्या १०० टक्के पाणी दर दिवसाआड व १०० टक्के विद्राव्य स्वरुपातील खते (१००:५०:५० नत्र:स्पुरद:पालाश किलो/हे) १० समान हफ्त्यात दर आठवड्याने देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१३. पश्चिम महाराष्ट्रातील कागदी लिंबु पिकासाठी जानेवारी ते जून या कालावधीची सिंचनाच्या दृष्टीने संवेदनशील अवस्था म्हणून शिफारस करण्यात येत आहे.

१४. पश्चिम महाराष्ट्रासाठी कागदी लिंबूची चांगली वाढ, अधिक उत्पादन व गुणवत्ता तसेच पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी ठिबकद्वारे पीक कालावधीत (जानेवारी-डिसेंबर) सिंचनाची खालीलप्रमाणे शिफारस करण्यात येत आहे.

| जानेवारी - फेब्रुवारी | मार्च-एप्रिल | मे-जून |
|---|---|---|
| ६०% बाष्पीभवन पातळी | ८०% बाष्पीभवन पातळी | ६०% बाष्पीभवन पातळी |

| जूलै - ऑगस्ट | सप्टेंबर-ऑक्टोबर | नोव्हेंबर-डिसेंबर |
|---|---|---|
| ८०% बाष्पीभवन पातळी | ६० %बाष्पीभवन पातळी | ८०% बाष्पीभवन पातळी |

१५. पश्चिम महाराष्ट्रातील बीटी कपाशीचे अधिक उत्पादन व आर्थिक लाभ मिळविण्यासाठी कपाशीची फरदड ऐवजी कपाशी नंतर गहू पीक पध्दतीत बीटी कपाशीस १२५:६५:६५ व गहू पिकास १२०:६०:४० नत्र: स्फुरद:पालाश किलो प्रति हेक्टरी १०० टक्के शिफारसीत खत मात्रा शिफारस करण्यात येत आहे.

१६. पश्चिम महाराष्ट्रातील बागायती बीटी कपाशीचे अधिक उत्पादन व आर्थिक लाभ मिळविण्यासाठी पुढील प्रमाणे एकत्रित तंत्रज्ञानाची शिफारस करण्यात येत आहे.

- पेरणीपुर्वी दुसऱ्या कुळवणीस १२ टन प्रति हेक्टर शेणखता बरोबर ७५ टक्के नत्राची शिफारसीत खत मात्रा (९३.७५ किलो प्रति हेक्टर) पेरणी, पाते लागणे, फुले लागणे व बोंडे भरणे अवस्थेत चार वेळा विभागून बांगडी पध्दतीने देवून १०० टक्के स्फुरद व पालाश (६८ किलो प्रति हेक्टर प्रत्येकी) पेरणीच्या वेळी दयावे.
- तीन वेळा एक टक्का युरियाची पाते लागणे, फुले लागणे व बोंडे भरणे अवस्थेत कापूस पिकावर फवारणी दयावे.
- कापूस पेरणी नंतर लगेच दोन ओळीत तागाची एक ओळ पेरून तागास फुले येण्यापूर्वी गाडावे.

१७. खरीप हंगामामध्ये ज्युट पिकाच्या अधिक बिजोत्पादनासाठी मध्यम खोल जमिनीमध्ये ५ टन शेणखतासोबत पेरणीच्या वेळी ४०:४०:४० किलो (नत्र: स्फुरद:पालाश) व पेरणीनंतर ३० दिवसांनी ४० किलो नत्र प्रती हेक्टरी या अन्नद्रव्याची मात्रा देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१८. भात पिकाच्या रोपवाटीकेतील प्रभावी तण व्यवस्थापानासाठी प्रेटीलाक्लोर ३०.७% (४५० ग्राम क्रियाशील घटक प्रती हेक्टर) ३० मि.ली. १० लिटर

पाण्यामध्ये मिसळून पेरणी नंतर दोन दिवसात शिफारस करण्यात येत आहे.

## उद्यानविद्या

१९. केळीचे कोलमडण्यामुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी व अधिक उत्पादन मिळविण्यासाठी ग्रँड नैन या वाणाची गादीवाफ्यावर, १ मीटर रूंद x १ फुट उंच व १.७५ x १.७५ मीटर अंतरावर लागवड करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२०. निर्यातक्षम दर्जेदार केळी व अधिक उत्पन्नासाठी ग्रँड नैन केळीमध्ये घड पुर्ण निसवल्यानंतर घडावरफक्त ८ फण्यां ठेवून, टोकाकडील फण्यांची विरळणी करावी. घडावर पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट ०.५% + युरिया १% मिश्रीत द्रावणाच्या एकूण दोन फवारण्याची (विरळणी नंतर पहिली फवारणी त्यानंतर १५ दिवसांनी दुसरी फवारणी) करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२१. शेवग्याचे अधिक उत्पादन घेण्यासाठी मुख्य खोडाची छाटणी ४५ सें.मी. ऊंचीवर, तसेच प्राथमिक आणि दुय्यम शाखांची छाटणी ३० सें.मी. लांबीवर करावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

## पशु व मत्स्यविज्ञान

२२. संकरित गायी मधील स्तनदाह या रोगाच्या नियंत्रणासाठी गायी दुधातुन आटवताना सड बंद करतेवेळेस १० मिली सेफ्टीओफर हायड्रोक्लोराईडचे (१२५ मिग्रा/१० मिली) इंजेक्शन प्रत्येक सडात देण्याची शिफारस करण्यात येते.

## मुलभुत शास्त्रे, अन्न व तंत्रज्ञान

२३. पिकलेल्या केळीच्या (°ब्रिक्स २० ते २२) उत्कृष्ट प्रतिच्या चकत्या (८ मि.मि. जाडिच्या) तयार करण्यासाठी त्यास प्रथम २ टक्के गंधकाची धुरी प्रति किलोस २ तास देवून त्या चकत्या ६० टक्के साखरेच्या पाकात (पाकामध्ये ०.१ टक्के पोटॅशिय मेटाबायसल्फाईट + ०.१ टक्के सिट्रेट + ०.२ टक्के ऑस्कॉबीक आम्ल) १६ तास ठेवून नंतर कॅबिनेट ड्रायरमध्ये ५५° सें. तापमानास १५ टक्के पाण्याचे प्रमाण राहिल तोपर्यंत वाळवून २०० गेजच्या प्लॅस्टिक पिशवीत भरुन ६ महिन्यापर्यंत चांगल्या स्थितीत साठविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२४ राळयाच्या पिठापासून पोषण मुल्ययुक्त, कुरकुरित, अधिक तंतुमय पदार्थ असणारी चकली तयार करण्यासाठी १००० ग्रॅम राळयाचे पीठ, २० ग्रॅम मीठ, ३० ग्रॅम मिरची पावडर, ५० ग्रॅम जिरे आणि आवश्यकतेनुसार गरम पाणी व तेल वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२५. राळयाच्या पिठापासून पोषण मुल्ययुक्त, कुरकुरित, अधिक तंतुमय पदार्थ असणारी उत्तम प्रतिची शेव तयार करण्यासाठी राळयाचे पीठ ५०० ग्रॅम व हरभरा डाळीचे पीठ ५०० ग्रॅम, २० ग्रॅम मीठ, ३० ग्रॅम मिरची पावडर, ५० ग्रॅम जिरे आणि आवश्यकतेनुसार गरम पाणी व तेल वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२६. बार्टी पिठापासून पोषण मुल्ययुक्त अधिक तंतुमय पदार्थ असणाऱ्या उत्तम प्रकारच्या कुकीज तयार करण्यासाठी बार्टीचे पीठ ८०० ग्रॅम व गव्हाचे पीठ २०० ग्रॅम, ५०० ग्रॅम साखर, ५०० ग्रॅम वनस्पती तूप, ५ ग्रॅम अमोनियम बायकार्बोनेट, ५ ग्रॅम सोडीयम बायकार्बोनेट वापर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२७. पूरबाधीत क्षेत्रातील उसापासून अधिक उतारा आणि चांगल्या प्रतिचा गुळ तयार करण्यासाठी पूरबाधीत उसाबरोबर सामान्य ऊस ६०° से. तापमान असलेल्या पाण्यात १० मिनीटे बुडवून स्वच्छ व गाळप करून ५०:५० टक्के या प्रमाणात रस घेऊन गुळ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२८. सरदार वाणाच्या पेरु फळापासुन उत्तम प्रतिचा गर तयार करुन ६ महिने शितकक्षामध्ये (५+१° सें. तापमान आणि ९२.५±२.५ % सापेक्ष आर्द्रता) आणि ३ महिने खोलीच्या तापमानास साठविण्यासाठी खालील प्रक्रिया पध्दतीची शिफारस करण्यात येते.

- ✻ पेरु फळांचे काप करुन ब्लिचिंग न करता स्क्रु टाईप पल्पररच्या सहाय्याने गर काढुन गाळुन घ्यावा
- ✻ गरामध्ये ०.१ % पोटॅशियम मेटाबायसल्फाईट हे परिरक्षक मिसळून ८५° सें. तापमानाला १० मिनिटे पाश्चरीकरणानंतर निर्जंतूक केलेल्या प्रतिकारक्षम

(रिटॉरटेबल) पाऊचमध्ये सिलबंद करावा व पाऊच १५ मिनिटे पाश्चरीकरण करुन घ्यावेत.

२९. सरदार वाणाची पेरु फळे ५० पी.पी.एम. बेनझॉईल ऍडेनीनच्या द्रावणात ५ मिनिटे बुडविण्याची प्रक्रिया करुन ३०० गेज (७५ मायक्रॉन) लोडेनसिटी पॉलिथिन (एल.डि.पी.ई.) पिशव्यामध्ये शितकक्षात (८+१° सें तापमान आणि ९२.५±२.५ % सापेक्ष आर्द्रता) ३० दिवसांपर्यत आणि खोलीच्या तापमानास १० दिवसापर्यंत साठविण्याची शिफारस करण्यात येते.

## पीक संरक्षण

३०. गव्हाच्या अधिक किफायतशीर उत्पादनासाठी आणि रासायनिक नत्र, स्फुरद व पालाश खतांची २५% बचत करण्यासाठी बियाण्यास पेरणीपुर्वी अझोटोबॅक्टर, स्फुरद विघटक जीवाणू (बॅसीलास मेगाटेरींअम) आणि पालाशची उपलब्धता वाढविणाऱ्या जीवाणूसंवर्धन खताची (फ्रान्चुरीया ओरेसिया) प्रती किलो २५ ग्रॅम या प्रमाणात बीजप्रक्रिया करून पिकास शिफारशीत रासायनिक खत मात्रेच्या ७५% खते (९० कि. नत्र, ४५ कि. स्फुरद आणि ३० कि. पालाश प्रती हे) वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३१. सुरु हंगामातील ऊस पिकाचे व साखरेचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी पालाश उपलब्ध करून देणाऱ्या जीवाणूंचा समूह (फ्रान्चुरीया ओरेसिया, बॅसीलस म्युसिलोजीनोसस, सुडोमोनास पुटीडा, एन्टरोबॅक्टर क्लोसी) असलेल्या द्रवरूप जीवाणू खताची २.५ लिटर प्रति हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून लागण करतेवेळी आळवणी करावी तसेच पिकास ७५ % शिफारशीत पालाशयुक्त रासायनिक खत (८७ कि/हे) आणि शिफारशीत १००% नत्र व स्फुरदयुक्त खतांच्या मात्रा (२५० व ११५ कि/हे) वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३२. डाळिंबावरील मावा व फुलकिडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच सायन्ट्रॅनिलीप्रोल १०.२६ ओ.डी. ९ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३३. खरीप हंगामातील मक्यावरील लष्करी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी, मेटाऱ्हिझीयम रिलेयी १.१५ डब्लू.पी. किंवा मेटाऱ्हिझीयम ॲनिसोप्ली १.१५ डब्लू.पी. ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच १५ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३४. धान्य उत्पादनासाठी घेण्यात येणाऱ्या मक्यावरील अमेरिकन लष्करी अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी स्पिनेटोराम ११.७ एस.सी. ५ मिली किंवा क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल १८.५ एस.सी. ४ मिली प्रति १० लिटर पाण्यातून किडीचा प्रादुर्भाव दिसुन येताच १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या करण्याची शिफारस धान्य उत्पादनासाठी घेण्यात येणाऱ्या मका पिकासाठी करण्यात येत आहे.

## कृषि अभियांत्रिकी

३५. महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण विभागामध्ये खरीप हंगामात कोरडवाहु सोयाबीन पिकाचे ईष्टतम उत्पादन घेण्यासाठी तसेच पर्जन्य संधारणासाठी ६० सेंमी. रुंद सरी वरंबा पद्धतीची शिफारस करण्यात येत आहे.

३६. पश्चिम महाराष्ट्रातल्या तालुक्यांसाठी कोबी पिकाला प्रवाही व ठिबक सिंचन पद्धतीद्वारे, तसेच वाटाणा पिकाला प्रवाही व तुषार सिंचन पद्धतीद्वारे ठराविक ठिकाणची आठवडानिहाय पाण्याची व सिंचनाची गरज काढण्यासाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेले तक्ते आणि भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) मध्ये विकसित केलेले नकाशे वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३७. सुरु हंगामात वेगवेगळ्या सिंचन नीतीसाठी उसाचे अपेक्षित उत्पादन अंदाजित करण्यासाठी खालील उत्पादन प्रतिसाद गुणांकाची शिफारस करण्यात येत आहे.

१. हंगामी उत्पादन प्रतिसाद गुणांक = १.११

२ पीक वाढीच्या अवस्थेनुसार उत्पादन प्रतिसाद गुणांक

अ) फुटवे फुटण्याची अवस्था (४५-१३५ दिवस) = ०.३२

ब) जोमदार वाढीची अवस्था (१३६-३०० दिवस) = ०.७९

क) परिपक्वता अवस्था (३०१ दिवस ते तोडणीपर्यंत) = ०.०८

३८. टोमॅटो पिकाचे इष्टतम उत्पादन घेण्यासाठी शाकीय (०-३५ दिवस) व फळ वाढीच्या (३६-७० दिवस) अवस्थेत १०० टक्के पाणी देण्याची, तसेच पाण्याची कमतरता असताना परिपक्वतेच्या अवस्थेत (७१ दिवस ते काढणी पर्यंत) सिंचन देतांना सिंचनाच्या गरजेपेक्षा २० टक्के पाणी कपात करण्याची शिफारस देण्यात येत आहे.

३९. टोमॅटो पिकाची पाण्याची गरज निश्चित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या ''पीक गुणांकाचा'' वापर करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

| लागवडी नंतरचा आठवडा | पीक गुणांक | लागवडी नंतरचा आठवडा | पीक गुणांक |
|---|---|---|---|
| १ | ०.५४ | १० | १.३१ |
| २ | ०.७९ | ११ | १.३३ |
| ३ | ०.९० | १२ | १.२९ |
| ४ | ०.९८ | १२ | १.२८ |
| ५ | १.०६ | १४ | १.२४ |
| ६ | १.१७ | १५ | १.१६ |
| ७ | १.२२ | १६ | १.०१ |
| ८ | १.२४ | १७ | ०.९१ |
| ९ | १.२९ | | |

वरील तक्त्याला पर्याय म्हणून खालील सूत्राची शिफारस करण्यात येते.

**पीक गुणांक** = १२.४६ $(ट/ठ)^{५}$ -३६.०२ $(ट/ठ)^{४}$ + ३७.३८ $(ट/ठ)^{३}$ - १९.४३ $(ट/ठ)^{२}$ +६.१२२ (ट/ठ) + ०.२६९

ट = लागवडीपासूनचा दिवस

ठ = पीक कालावधी

४०. वेगवेगळ्या सिंचन नीतीसाठी टोमॅटोचे अपेक्षित उत्पादन अंदाजित करण्यासाठी खालील उत्पादन प्रतिसाद गुणांकाची शिफारस करण्यात येत आहे.

१. हंगामी उत्पादन प्रतिसाद गुणांक = १.२८

२. पीक वाढीच्या अवस्थेनुसार उत्पादन प्रतिसाद गुणांक

i. शाकीय अवस्था (०-३५ दिवस) = ०.४१

ii. फळ वाढीची अवस्था (३६-७० दिवस) = ०.४७

iii. परिपक्वता अवस्था (७१ दिवस ते काढणीपर्यंत) = ०.३५

४१. कापूस पिकाचे इष्टतम उत्पादन घेण्यासाठी, पिकाच्या फुले लागण्याच्या अवस्थेत (४६-१०५ दिवस) व बोंड लागण्याच्या अवस्थेत (१०६ दिवस ते काढणी पर्यंत) १००% पाणी देण्याची, तसेच पाण्याची कमतरता असताना पाते लागण्याच्या अवस्थेत (पेरणी नंतर ४५ दिवसापर्यंत) सिंचन देतांना सिंचनाच्या गरजेपेक्षा ३०% पाणी कपात करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४२. कापूस (बीटी) पिकाची पाण्याची गरज निश्चित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या पीक गुणांकाचा वापर करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

| पेरणी नंतरचा आठवडा | पीक गुणांक | पेरणी नंतरचा आठवडा | पीक गुणांक |
|---|---|---|---|
| १ | ०.४२ | १२ | १.१८ |
| २ | ०.३५ | १३ | १.२० |
| ३ | ०.३५ | १४ | १.१८ |
| ४ | ०.४० | १५ | १.१४ |
| ५ | ०.४९ | १६ | १.०८ |
| ६ | ०.६१ | १७ | ०.९९ |
| ७ | ०.७४ | १८ | ०.८९ |
| ८ | ०.८६ | १९ | ०.७७ |
| ९ | ०.९७ | २० | ०.६५ |
| १० | १.०६ | २१ | ०.५५ |
| ११ | १.१३ | २२ | ०.४६ |

वरील तक्त्याला पर्याय म्हणून खालील सूत्राची शिफारस करण्यात येते.

**पीक गुणांक**= ३.९४३ $(ट/ठ)^{५}$ + ३०.७६ $(ट/ठ)^{४}$ -५४.८ $(ट/ठ)^{३}$ + ३२.९४ $(ट/ठ)^{२}$ -५.१६३ (ट/ठ) +०.५७२

ट = पेरणीपासूनचा दिवस

ठ = पीक कालावधी

४३. वेगवेगळ्या सिंचन नीतीसाठी कापसाचे अपेक्षित उत्पादन

अंदाजित करण्यासाठी खालील उत्पादन प्रतिसाद गुणांकाची शिफारस करण्यात येत आहे.

१.हंगामी उत्पादन प्रतिसाद गुणांक = १.१३

२. पीक वाढीच्या अवस्थेनुसार उत्पादन प्रतिसाद गुणांक

i. पाते लागणेची अवस्था (पेरणी नंतर ४५ दिवसापर्यंत) = ०.४७

ii. फुले लागणेची अवस्था (४६–१०५ दिवस) = ०.४१

iii. बोंड लागणेची अवस्था (१०६ दिवस ते काढणीपर्यंत) = ०.२७

४४. गव्हाचे इष्टतम उत्पादन घेण्यासाठी, मुकुटमुळे फुटण्याच्या (० ते २५ दिवस) व कांडी धरण्याच्या (२६ ते ६५ दिवस) अवस्थेत १०० टक्के पाणी देण्याची, तसेच पाण्याची कमतरता असताना दाणे भरण्याच्या अवस्थेत (पेरणीनंतर ६६ दिवस ते काढणी पर्यंत) सिंचन देतांना सिंचनाच्या गरजेपेक्षा ३० टक्के पाणी कपात करण्याची शिफारस देण्यात येत आहे.

४५. गहू पिकाची पाण्याची गरज निश्चित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या मफ्पीक गुणांकाचाफ्फ वापर करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

| पेरणीनंतरचा आठवडा | पीक गुणांक |
|---|---|
| १ | ०.३५ |
| २ | ०.४२ |
| ३ | ०.६१ |
| ४ | ०.८६ |
| ५ | ०.९७ |
| ६ | १.११ |
| ७ | १.१९ |
| ८ | १.१५ |
| ९ | १.१४ |
| १० | १.०३ |
| ११ | ०.८० |
| १२ | ०.६२ |

वरील तक्त्याला पर्याय म्हणून खालील सूत्राची शिफारस करण्यात येते.

**पीक गुणांक = ३१.१३८ (ट/ठ)$^{५}$ + ८३.५१ (ट/ठ)$^{४}$ -८६.१९८ (ट/ठ)$^{३}$ +३५.९६ (ट/ठ)$^{२}$ -३.४२५४ (ट/ठ) + ०.४३६२**

ट = पेरणीपासूनचा दिवस

ठ = पीक कालावधी

४६. वेगवेगळ्या सिंचन नीतीसाठी गव्हाचे अपेक्षित उत्पादन अंदाजित करण्यासाठी खालील उत्पादन प्रतिसाद गुणांकाची शिफारस करण्यात येत आहे.

१. हंगामी उत्पादन प्रतिसाद गुणांक = १.३०

२. पीक वाढीच्या अवस्थेनुसार उत्पादन प्रतिसाद गुणांक

i. मुकुटमुळे फुटण्याची अवस्था (० ते २५ दिवस) = ०.४९

ii. कांडी धरण्याची अवस्था (२६ ते ६५ दिवस) = ०.४७

iii. दाणे भरण्याची अवस्था (६६ दिवस ते काढणी पर्यंत) = ०.३६

४७. शेडनेटगृहातील काकडी पिकाचे अपेक्षित उत्पादन ठरविण्याकरिता खालील सुत्राची शिफारस करण्यात येत आहे.

अ. चंदेरी काळ्या रंगाचे प्लास्टिक आच्छादन असल्यास

Y= - ०.२१०७ $X_1$ - ४७.९९५३ $X_2$ + ०.७०२६२३ $X_3$ - २.८१०५१ $X_4$ + २४५.३१

ब. चंदेरी काळ्या रंगाचे प्लास्टिक आच्छादन नसल्यास

Y= - ०.०१८६१ $X_1$ - ०.३२३१५१ $X_2$ - ०.०५७६२ $X_3$ - १.६६८८६ $X_4$ + १७४.३१६६

वरील सुत्रामध्ये

Y = काकडी उत्पादन (कि. ग्रॅं. / हे.)

$X_1$ = हंगामी पाण्याची गरज (मि.मी.)

$X_2$ = शेडनेट करिता B-FR गुणांक

$X_3$ = शेडनेटमधील सरासरीत तापमान (० सें.)

$X_4$ = शेडनेटमधील सरासरीत आर्द्रता (%)

## सामाजिक शास्त्रे

४८. अहमदनगर जिल्ह्यातील मका उत्पादक शेतकऱ्यामध्ये कृषि विषयक माहिती घेण्यासाठी भ्रमणध्वनीद्वारे इंटरनेटचा (३९.१७%) वाढता वापर आढळून आला आहे. त्यामुळे कृषि विद्यापीठांतर्गत शास्त्रज्ञांनी मक्यावरील लष्करी अळी या किडीच्या व्यवस्थापनाकरीता दृकश्राव्य चित्रफिती आणि मोबाईल ॲपची निर्मिती करुन त्याचा कृषि विभागाच्या विस्तार यंत्रणेमार्फत प्रचार व प्रसिध्दी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४९. कापसावरील गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांद्वारे केल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत केलेल्या अभ्यासाअंती असे निदर्शनास आले आहे की, निवडलेले कापूस उत्पादक शेतकरी मध्यम प्रमाणात शास्त्रीय दृष्टीकोन असलेले,जोखीम घेणारे, विविध माध्यमांचा वापर करणारे आहेत. तसेच गुलाबी बोंडअळीचे नियंत्रण करण्यासाठी केलेल्या शास्त्रीय शिफारशींचा मध्यम प्रमाणात अवलंब करतात. असे असले तरी फारच थोडे शेतकरी कापूस गुलाबी

बोंडअळीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोकार्ड, लाईटट्रॅप, जैविक किटकनाशके इ.चा अवलंब करतात. त्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि कृषि विद्यापीठे यांनी कापसावरील गुलाबी बोंडअळीवर मोबाईल ॲप तयार करावे. तसेच गुलाबी बोंडअळीचे नियंत्रण करण्यासाठी प्रसिध्दी मोहिमा घेवून शेतकऱ्यामध्ये जागृकता निर्माण करावी. शिवाय कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मोठ्या प्रमाणावर गावपातळी पर्यंत रास्त दरात फेरोमनट्रॅप, ट्रायकोकार्ड, लाईट ट्रॅप व इतर जैविक किटकनाशके उपलब्ध करुन द्यावीत.

५०. गूळ निर्मितीसाठी अभ्यास करण्यात आलेल्या शिफारशीत निवडक वाणाच्या भौतिक लक्षणा नुसार को.एम. ०९०५७ या वाणाचा गूळ उत्पादकांमध्ये प्रसार होण्यासाठी विविध विस्तार कार्यक्रमांचे उदा. गटचर्चा, शेतकरी मेळावे इ. आयोजन विस्तार यंत्रणे मार्फत होणे आवश्यक आहे.

५१. कमी खर्चाचे मोल निचरा तंत्रज्ञान हे लहान व सिमांत शेतकऱ्यांच्या क्षारपड–पाणथळ आणि कमी निचरा क्षमता असणाऱ्या काळया जमीनीसाठी आर्थीकदृष्या फायदेशीर असल्याचे दिसून आले आहे. म्हणून या तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार होण्याकरीता (गटचर्चा, शेतकरी मेळावे इ.) कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि कृषि विज्ञान केंद्र यांनी कृषि विद्यापीठांच्या सहाय्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. या तंत्रज्ञानाचे बळकटीकरण आणि प्रसाराकरीता कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत ६५ अश्वशक्तीचा ट्रॅक्टर व मोल नांगर सानुकुल भाड्याने किंवा बँकेव्दारे पीक कर्जाप्रमाणे ४% व्याजदराने कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे. हे तंत्रज्ञान प्रभावी होण्याकरीता साखर कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये निचरा चर काढणे आवश्यक आहे.

५२. पुणे व सोलापूर जिल्ह्यामध्ये घेण्यात आलेल्या ''पुणे विभागातील एकात्मिक शेती पद्धतीचे दस्तऐवजीकरण'' या विषयीच्या अभ्यासाअंती पुणे जिल्ह्यातील विविध एकात्मिक शेती पद्धतींमध्ये कृषि + फलोत्पादन + दुग्धोत्पादन + मूल्यवर्धन (फळप्रक्रिया) (२.४१), कृषि + फलोत्पादन + कुक्कुटपालन + मत्स्यशेती (२.३८) आणि कृषि + फलोत्पादन + दुग्धोत्पादन + शेळीपालन + कुक्कुटपालन (२.१८) या पद्धतींचे सरासरी नफा–खर्च गुणोत्तर अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यासारख्या दुष्काळग्रस्त भागामधून कृषि + रेशीम उत्पादन (२.०९), फलोत्पादन + रेशीम उत्पादन + शेळीपालन (१.९०) व कृषि + फलोत्पादन + दुग्धोत्पादन (१.७४) या पद्धतींमध्ये सरासरी नफा – खर्च गुणोत्तर जास्त असल्याचे दिसून आले. म्हणून असे शिफारसीत करण्यात येते की, पुणे व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अधिक उत्पन्न व शाश्वत शेतीसाठी अनुक्रमे वर उल्लेख केलेल्या एकात्मिक शेती पद्धतींचा अवलंब करावा.

५३. मूग पिकाच्या उत्पादनामध्ये खत व्यवस्थापन, वाण व वाण वापर बाबी आंतरमशागत, पूर्व मशागत व संरक्षित पाणी यांचा अनुक्रमे ३१, २६, १७, १२ त १२ टक्के वाटा आहे, म्हणून, मूग पिकाच्या अधिक उत्पादकतेसाठी शेतकऱ्यांनी वरील तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त अवलंब करावा.

५४. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने हरभरा पिकाच्या विकसित केलेल्या वाणाचा (विजय, विशाल, दिग्विजय, विराट, विहार, फुले जी–१२, विश्वास, राजस, कृपा) लागवडीमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी १९९०–९१ ते २०१७–१८ (२८ वर्षे) पर्यंत एकूण २९१२० कोटी रुपये तर ६९८९ कोटी रूपयांचा निव्वळ नफा झालेला आहे. हरभरा पिकाच्या संशोधन आणि विस्तार कार्यामध्ये १ रुपयाची गुंतवणूक केली असता २७ रुपये उत्पन्न व अंतर्गत परतावा दर ३१ टक्के असल्याचे निदर्शनास येते, म्हणून हरभरा पिकाच्या संशोधन व विस्तारासाठी वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५५. सन १९९६–९७ ते २०१६–१७ या कलावधीत स्थिर किंमतीनुसार भुईमूग, सोयाबीन आणि सूर्यफुल या तेलबियांच्या किमान आधारभूत किंमत निर्देशंकांतील वाढ ही निविष्ठांच्या किंमत निर्देशंकांतील वाढीपेक्षा अनुक्रमे ११४, ६६ आणि ३३ टक्के यांनी कमी आहे, म्हणून ह्या तेलबिया पिकांच्या किमान आधारभूत किंमती व निविष्ठा किंमतींमध्ये समतोल ठेवणे गरजेचे आहे.

५६. अभिनव शेतकरी गटाच्या सदस्यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा एकत्रित वापर आणि मध्यस्थाशिवाय स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत थेट विक्री केल्यामुळे द्राक्षांची किंमत (रु. ६२/किलो) ही बिगर सदस्यांना मिळालेल्या किंमतीपेक्षा (रु.३९/किलो) जास्त आहे. तसेच अभिनव शेतकरी गटाचा परतावा दर (३२%) लक्षात घेता अशी शिफारस करण्यात येते की, फळ उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतकरी उत्पादक गट स्थापन करावेत.

५७. धुळे जिल्ह्यातील बागायती व जिरायती भागातील प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्थांच्या मागील १० वर्षातील (२००९–१० ते २०१८–१९) माहितीच्या अभ्यासावरून असे दिसून आले की जिरायती भागातील पतसंस्थांचा कर्जपुरवठा व कर्ज परतफेड अनुक्रमे २६ व ५२ टक्के इतकी कमी झाली. त्यामुळे सदर सहकारी कृषि पतसंस्थांच्या कार्यात सुधारणा होण्यासाठी व त्या सुरळीत चालण्यासाठी या संस्थांना अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समितीने शिफारस केलेले मफराष्ट्रीय कृषि कर्जफफ (स्थिरता) निधि व राष्ट्रीय कृषि कर्ज (दीर्घ मुदत) करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५८. पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, आणि पुणे या जिल्ह्यांमध्ये खतांचा अत्यंत असंतुलित प्रमाणात वापर केल्याचे आढळून आले आहे तसेच जळगाव, सोलापूर, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांध्ये मध्यम असंतुलित प्रमाणात वापर केल्याचे आढळून आले आहे. असंतुलित प्रमाणात वापर झाल्यामुळे जमिनीचे आरोग्य प्रभावित झाले आहे म्हणून जमिनीची सुपिकता टिकविण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रात खतांचा २ नत्र : १ स्फुरद : १ पालाश या संतुलित प्रमाणात वापर करण्यात यावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

## जैविक व अजैविक ताण सहन करणारे स्त्रोत

५९. माव्याचा प्रादुर्भाव, प्रादुर्भावामुळे पीक वाळण्याचे परिमाण, उत्पादन क्षमता आणि वाणाचे बाह्य भौतिक व जैव–रासायनिक गुणधर्म यांच्या आधारे एसएसएफ ६८२ आणि एसएसएफ ६९५ हे दोन वाण करडई–मावा प्रतिकारक्षम स्त्रोत म्हणून शिफारस करण्यात येत आहेत.

## मफुकृवि निविष्ठा उत्पादन आढावा (२०१९–२०)

| तपशील | उत्पादन |
|---|---|
| बिजोत्पादन | प्रक्षेत्र बिजोत्पादन – ८०७१ क्विं. |
| | शेतकरी सहभाग – १४००० क्विं. |
| | कडधान्य सीड हब प्रकल्प – ३७४० क्विं. |
| | **एकुण – २५८११ क्विंटल** |
| कलमे रोपे | ९.३८ लाख |
| जैविक खते | ४४.६ मे.टन व ७०० लि. |
| जैविक किडनाशके | ४५ मे. टन व ३०० लि. |
| द्रवरुप सुक्ष्म अन्नद्रव्य | ५४०० लि. |

## ४. विस्तार शिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी यांच्या कार्यक्षेत्रात पश्चिम महाराष्ट्रातील १० जिल्हयांचा समावेश होतो. यामध्ये अहमदनगर, पुणे, सोलापुर, सातारा, कोल्हापुर, सांगली, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदुरबार हे जिल्हे येतात. विद्यापीठाची कृषि शिक्षण,कृषि संशोधन आणि कृषि विस्तार शिक्षण ही प्रमुख तीन उद्दिष्ट्ये आहेत.

कृषि विद्यापीठामध्ये विकसीत झालेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यापर्यंत परिणामकारकरित्या पोहचविण्यासाठी विस्तार शिक्षण संचनालयाची स्थापना १९८१ साली करण्यात आली. या माध्यमातून विद्यापीठ विकसीत तंत्रज्ञान अधिकाधिक शेतकरी व कृषि क्षेत्राशी निगडीत संस्था व इतर यांचेपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठाची विस्तार शिक्षण यंत्रणा सदैव कार्यरत असते. प्रामुख्याने कृषि विद्यापीठाकडे विस्तार शिक्षणाचा महत्वाचा भाग असुन त्याद्वारे विस्तार कार्यकर्ते, ग्रामविस्तारक, विषय विशेषज्ञ, विविध खात्यातील अधिकारी, शेतकरी, शेतकरी महिला आणि युवक यांना प्रशिक्षण व कैशल्य विकास विषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. प्रसार माध्यमे, लिखित साहित्य, सोशल मिडीया, विविध संपर्कपद्धतीद्वारे प्रशिक्षित करुन त्यांना कृषि विषयक माहिती दिली जाते.

- सद्यस्थितीत विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे खालील उद्दिष्टे ठेवून कार्यक्रम राबविले जातात
- विविध कृषि हवामान परिस्थितीत शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी अल्प व दिर्घ मुदतीचे व्यवसायभिमुख प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.
- अत्याधुनिक कृषि तंत्रज्ञानाचे आद्यरेखा प्रात्यक्षिकाद्वारे चाचणी करुन व्यापक क्षेत्रावर तंत्राचा प्रसार करणे.
- विविध विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना कृषि तंत्रज्ञानाबद्दल माहिती उपलब्ध करणे.
- सुधारीत तंत्रज्ञानाचा लाभ आणि त्यापासुन मिळणारे फायदे कृति/परिणाम प्रात्यक्षीकाद्वारे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष समजावून सांगणे.
- स्थानिक पातळीवर प्रश्न, संशोधन शिफारशींच्या आधारे सोडविणे आणि संशोधन बळकटीकरण करण्यासाठी प्रत्याभरण करणे. या व्यतिरिक्त विस्तार संचालनालयामार्फत खालील उपक्रम राबविले जातात.
- विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांचे संयोजन व समन्वय साधणे.
- प्रसारण केंद्र, विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्रे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र आणि कृषि माहिती केंद्रे यामध्ये समन्वय साधने.
- प्रशिक्षंणाचे आयोजन करणे.
- शेतकरी मेळावे, कृषि प्रदर्शने आयोजन करणे.

### महात्मा फुले कृषि विद्यापीठात विस्तार शिक्षणाचे कार्य

### १. कृषि विज्ञान केंद्र

कृषि विद्यपीठाचे चार कृषि विज्ञान केंद्रे आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत धुळे जिल्ह्यासाठी मे १९८३ मध्ये कृषि विज्ञान केंद्राची स्थापना करण्यात आली. यानंतर सन २०११–१२ ला कृषि विज्ञान केंद्रे मोहोळ (सोलापुर),बोरगाव (सातारा)आणि ममूराबाद फार्म (जळगाव) यांची स्थापना महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत करण्यात आली. तसेच या विद्यापीठातंर्गत एकुण १३ कृषि विज्ञान केंद्रे, अशासकीय संस्थेद्वारे व एक कृषि विज्ञान केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेद्वारा संचलीत करण्यात येत आहे. कृषि विज्ञान केंद्रांची प्रमुख उद्दिष्ट्ये व उपक्रम पुढीलप्रमाणे.

- कृषि क्षेत्रातील विकसीत तंत्रज्ञानाच्या प्रक्षेत्रावर विभागवार विविध चाचणी प्रयोगाचे आयोजन करणे.
- जिल्ह्यामधील महत्वाच्या पिकांच्या उत्पादन तंत्रज्ञानावर आद्यरेखा प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर आयोजित करणे.
- शेतकरी, शेतकरी महिला, ग्रामीण तरुण आणि विस्तार कार्यकर्ते यांच्यासाठी त्यांच्या गरजेवर आधारीत कृषि क्षेत्रात व त्यांच्याशी संबंधीत उद्योगावर प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.
- जिल्ह्यातील कृषि क्षेत्राशी संबंधीत अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी कृषि क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे ज्ञान व संशोधनाचे केंद्र म्हणुन कार्य करणे.
- माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन कृषि क्षेत्राशी निगडीत विविध सल्ला सेवा शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे.

### २. विभागीय विस्तार शिक्षण केंद्रे/जिल्हा विस्तार केंद्रे

अधुनिक तंत्रज्ञानाची चाचणी घेण्यासाठी व ती ताबडतोब शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी या विद्यापीठाचे कृषि महाविद्यालयामध्ये विभागीय विस्तार केंद्र (सन २०००) सुरु करण्यात आलेले आहे. या विद्यापीठामार्फत कृषि महाविद्यालय, पुणे,धुळे,कोल्हापूर आणि मध्यवर्ती परिसर राहुरी येथे हे केंद्र कार्यन्वीत आहेत. कृषि विद्या, उद्यान विद्या, पशुविज्ञान व पिक संरक्षण या चार विषयांचे विशेषज्ञ या विस्तार केंद्रामध्ये असतात. या केंद्राचा प्रमुख विस्तार कृषि विद्या वेत्ता असून ते विस्तार शिक्षण संचालक यांच्या तांत्रीक नियंत्रणाखाली काम करत असतात. या व्यतिरिक्त विस्तार शिक्षण कार्यक्रम अधिक परिणामकारक करण्यासाठी या विद्यापीठाने जळगाव, पाडेगांव

(सातारा), सोलापूर, डिग्रज (सांगली) आणि निफाड (नाशिक) येथे पाच जिल्हा विस्तार केंद्रे (सन २००६) स्थापन केलेली आहे.

या केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे

* सद्यस्थितीला अस्तित्वात असलेल्या कृषि कर्मचाऱ्यांची ज्ञान पातळी उंचविण्यासाठी अल्पमुदतीचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.
* शेतकऱ्यांचे शेती विषयक प्रश्न सोडविण्यासाठी विविध प्रशिक्षणाचे आयोजीत करणे.
* संशोधन निष्कर्शाच्या प्रत्याभरणाकरीता शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यामध्ये सुसंवाद घडुन आणने.
* शेतकऱ्यांचे दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी तालुकानिहाय मासिक सभा आयोजित करणे.
* कृषि संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

आधुनिक कृषि तंत्रज्ञान त्यांच्या कार्यक्षेत्रात पोहचविण्याचे काम त्या विभागातील संबधित विस्तार केंद्रांचे आणि जिल्हा विस्तार केंद्रांचे कर्मचारी करतात यामध्ये मासिक जिल्हा चर्चासत्र, पंधरवाडा प्रशिक्षण, शेतकऱ्यांच्या शेतावर प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे, निदान चमू भेटी, बियाणे तक्रारी आणि तांत्रिक मार्गदर्शन यांचा समावेश असतो.

या विभागीय विस्तार व जिल्हा विस्तार केंद्रांचे काम परिणामकारक होण्यासाठी आणि विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यापीठाने या प्रत्येक केंद्रास एक वाहन (फिरते पीक चिकित्सालय) दिले आहे. या फिरत्या पीक चिकित्सालयामध्ये माती आणि पाणी पृथःकरण, रोगांचे निदान किडी आणि रोग या विषयावर शेतकऱ्यांना त्याच ठिकाणी माहिती देण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहे.

## ३. प्रसारण केंद्र

कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे वित्तीय पुरवठ्याने १९८२ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठात प्रसारण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. तथापी कृषि अनुसंधान परिषदेचा वित्तीय पुरवठा बंद झाल्यानंतर विद्यापीठाने स्वखर्चाने हि केंद्रे चालविली आहे. तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी, प्रसार माध्यमांचा परिणामकारक वापर करण्यासाठी हे केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. हे केंद्रे विविध लिखित साहित्ये उदा. घडिपत्रिका, बुलेटींन, कृषि दर्शनी, श्रीसुगी हे शेतकऱ्यांसाठी आणि विस्तार कार्यकर्त्यांसाठी तयार करीत असतात. विद्यापीठातील कृषि विषयक कार्यक्रम व घटना यांना विद्यापीठाच्या वार्तापत्रात सातत्याने प्रसिद्धी दिली जाते. शेतीविषयक माहिती संकलन करुन ती दुरदर्शन तसेच आकाशवाणीच्या विविध केंद्रावर, नभोवाणी आणि शेतीशाळा या कार्यक्रमातुन प्रसारीत केली जाते.

## ४. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, राहुरी

कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र हे कृषि विद्यापीठातील संशोधनाबद्दल एकाच ठिकाणी माहिती मिळण्याचे एकमेव ठिकाण आहे. हे केंद्र ऑगस्ट २००१ मध्ये सुरु झालेले आहे. संशोधन संस्था व शेतकरी यांच्यामधील दरी कमी करुन कृषि सेवा सल्ला देणे हा या केंद्राचा प्रमुख उद्देश आहे.

* कृषि माहिती व तंत्रज्ञान मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना सबळ करणे.
* संशोधन विभाग/गट आणि तंत्रज्ञानाचा उपयोग करणाऱ्यांमध्ये सशक्त समन्वय तयार करणे.
* शेतकऱ्यांना निर्णय घेण्यासाठी आणि त्यांच्या कृषि विषयक समस्या सोडविण्यासाठी योग्य मार्गदर्शन/मदत करणे.
* प्रत्याभरण यंत्रणा/सक्षक्तिकरण करण्यास चालना देणे.
* पीक आणि पशुविकास आणि उत्पानातील दरी भरुन काढणे.
* विक्री व सेवा यांच्या साह्याने आर्थीक फायदा मिळवीने.
* शेतकरी मेळावे,शिवार फेरी आणि कृषि प्रदर्शनाद्वारे शेतकऱ्यांपर्यत कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.
* कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे नियंत्रण व्यवस्थापक करतात. कृषि विज्ञान, पीक संरक्षण, पशुविज्ञान, उद्यानविद्या व मृदशास्त्र या पाच विषयांचे विशेषज्ञ त्यांना मदत करतात. जनसंपर्क अधिकारी शेतकऱ्यांशी हितगुज साधण्याचे कामी त्यांना सहाय्य करतात.
* दूरभाष्य सेवा (०२४२६-२४३८६१), किसान कॉल सेंटर (१८००-१८०-१५५१) हे नवीन उपक्रम केंद्रामार्फत राबविले जातात.

## ५. कृषि महाविद्यालय विस्तार गट

कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कृषि विस्तार विषयाचे प्रात्यक्षीकाद्वारे प्रशिक्षण देण्यासाठी कृषि महाविद्यालय पुणे,धुळे,कोल्हापूर यांना प्रत्येकी ६० ते १०० खेड्यांचा एक विस्तार गट जोडलेला आहे. या विस्तार गटाचा उपयोग विस्तार शिक्षणाची प्रयोगशाळा म्हणून करण्यात येते. विद्यापीठात विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत या विस्तार गटामार्फत पोहचविले जाते. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांना क्लिष्ट वाटते का आणि त्याची उपयुक्तता याची पडताळणी या गटामार्फत केली जाते. या गटातील अधिकारी शेतकऱ्यांना वेळोवेळी भेट देतात व शेतीच्या विविध समस्यांवर मार्गदर्शन करतात. या गटात विस्तार कार्यक्रमाचे नियोजन व अमलबजावणी विस्तार प्रशिक्षण अधिकारी, कृषि पर्यवेक्षक यांचे समवेत कृषि सहाय्यकांच्या मदतीने करतात. विस्तार गटातील कार्यामुळे या शेतकऱ्यांच्या सामाजिक व अर्थिक परिस्थितीत काही बदल झाला आहे काय? याचाही अभ्यास केला जातो. विस्तार गटातील विविध कार्यक्रमाचे नियोजन व त्याची अमलबजावनी महाविद्यालयाचे विस्तार शिक्षण विभागातर्फे केली जाते.

### ६. शास्त्रज्ञ, प्राध्यापक यांचा विस्तार कार्यक्रमात सहभाग

विद्यापीठातील शास्त्रज्ञ व प्राध्यापक वेळोवेळी स्वतः अथवा गटाने निरनिराळ्या विषयांवर विस्तार कार्यक्रमात सहभागी होतात. शेती प्रात्यक्षिके,शेतकऱ्यांच्या शेतावरील भेटी, प्रायोगिक शेती प्रयोगास भेटी,गटचर्चा, शेतकरी मेळावे,कृषि प्रदर्शने, शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे, शेतीविषयक मासिकातून लेख, वर्तमानपत्रातून लेख,रेडियो व दूरदर्शन या कार्यक्रमातून शेतकऱ्यांसाठी उपयुक्त माहिती दिली जाते.

### ७. विभागीय कृषि संशोधन आणि विस्तार सल्लागार समिती बैठक

विभागीय कृषि संशोधन अणि विस्तार सल्लागार समिती बैठकीद्वारे विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान शिफारशी, विविध वाण, यंत्रे कृषि विभागाच्या समन्वयाने अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी चर्चा केली जाते. तसेच विद्यापीठात संशोधनाकरीता गरजेनुसार महत्वाचे असलेले प्रत्याभरण संशोधकांपर्यंत पोहचविण्याचे महत्वाचे कार्य केले जाते.

### ८. इतर खात्याशी समन्वय

विद्यापीठस्तरावरील विस्तार यंत्रणेमार्फत विविध विभागांशी समन्वय साधून विद्यापीठ लोकाभीमुख करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो. कृषि विभाग यांच्या समन्वयाने कृषि विस्तार विद्यावेत्ता यांनी आयोजित केलेल्या जिल्हा मासिक चर्चासत्रात आणि प्रक्षेत्रभेट कार्यक्रमात विद्यापीठ शास्त्रज्ञांचा सहभाग असतो. राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प आणि कृषि संशोधन केंद्रामधील शास्त्रज्ञांचा सदरच्या मासिक जिल्हा चर्चासत्रात,जिल्हा चर्चासत्रात,संयुक्त प्रक्षेत्र भेटीत आणि चाचणी प्रयोगात प्रामुख्याने सहभाग असतो. मासिक जिल्हा चर्चासत्रात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि खात्यातील अधिकारी वनविभागाचे अधिकारी,मत्स्यपालन विभागाचे अधिकारी,पाटबंधारे विभागातील अधिकारी उपस्थित असतात. या चर्चासत्रामध्ये शेतकऱ्यांसाठी निविष्ठा, रोपे पुरवठा, पहाणी आणि तपासणी इ.विषयांवर उहापोह केला जातो.

### ९. शेतकरी प्रथम प्रकल्प

#### राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शेतकरी प्रथम प्रकल्प

उत्पादन आणि उत्पादनाच्या पलीकडे जाण्यासाठी आणि शेतकरी व शास्त्रज्ञांचा संवाद घडून आणण्यासाठी रु ५.९१ कोटीचा प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठास मंजूर झाला आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाणे विकसीत केलेले तंत्रज्ञान जसे उसामध्ये भाजीपाला आंतरपीक (१५००), कापूस उत्पादन तंत्रज्ञान (९००), भुईमुग उत्पादन तंत्रज्ञान (३००), हरभरा उत्पादन तंत्रज्ञान (३००), डाळिंबावरील तेलकट डाग व्यवस्थापन (६००), केळीवरील सिगाटोका रोग व्यवस्थापन (३००), चिंगळी कांदा लागवड (९००), कमी निचरा होणाऱ्या जमिनीसाठी मोल नांगर तंत्रज्ञान (४५०) आणि पशुसंवर्धन (खाद्य व्यवस्थापन, गायींमध्ये कृत्रिम रेतन, चारा गवत सेटचा पुरवठा, परसबागेतील कुकुटपालन) यांचा समावेश होतो. या प्रकल्पाद्वारे ५५५० सहभागी शेतकऱ्यांपर्यंत विद्यापीठ तंत्रज्ञानाचा प्रसार होणार आहे .

### भाकृअप शेतकरी प्रथम कार्यक्रम

भाकृअप शेतकरी प्रथम कार्यक्रम ''अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा शाश्वत कृषि विकास करण्यासाठी एकात्मिक शेती पद्धतीद्वारे शेतकर्यांचे सामाजिक व आर्थिक स्तर उंचविणे'' सन २०१६-१७ पासून मंजूर झाला आहे. एकात्मिक शेती पद्धती या संकल्पनेवर हा प्रकल्प चिंचविहिरे आणि कणगर या गावात राबविला जात आहे. या प्रकल्पातून शेतकर्यांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

### विस्तार शिक्षण उपक्रम अहवाल

### मागोवा-२०१९

महात्मा फुले कृषि विद्यापीठात मागोवा-२०१९ आणि छायाचित्र प्रदर्शन आणि रब्बी शेतकरी मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन दि. ११ जानेवारी, २०२० रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटन राज्याचे कृषि, माजी सैनिक कल्याण मंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे महसुल मंत्री मा. ना. श्री. बाळासाहेब थोरात उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा, कार्यकारी परिषदेचे सदस्य आ. श्री. प्रकाश गजभिये, आ. प्रा. लहुजी कानडे, महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे मा. श्री. विश्वजीत माने (भा.प्र.से.), महाराष्ट्र राज्याचे संचालक, कृषि प्रक्रिया व नियोजन, निविष्ठा, गुणवत्ता नियंत्रण, मा. श्री. विजय घावटे, अहमदनगर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री. प्रतापराव शेळके, बाळासाहेब आढाव, ज्ञानदेव वाफारे, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संचालक संशोधन व विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. सोपान कासार, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.ना.श्री. बाळासाहेब थोरात, विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य आ. प्रकाश गजभिये यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या निमित्ताने विद्यापीठाचे लोकप्रिय प्रकाशन कृषिदर्शनी २०२० चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. या प्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाची कृषि मार्गदर्शिका-२०२०, महात्मा फुले कृषि विद्यापीठ उपलब्धी- २०१९, एम.पी.के.व्ही. ॲट ए ग्लान्स या प्रकाशनाचे आणि विद्यापीठाच्या वेबसाईटचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा यांनी केले. संचालक संशोधन डॉ. शरद गडाख यांनी संशोधनाचा आढावा व सन २०१९ चा विस्तार शिक्षणाचा आढावा सादर

केला. अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे यांनी शिक्षणाचा आढावा, कुलसचिव श्री. सोपान कासार यांनी प्रशासनाचा आढावा सादर केला.

## कृषि विद्यापीठात कृषि विज्ञान केंद्रांची कृती कार्यशाळा

महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्था, विभाग-८, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १७ कृषि विज्ञान केंद्रांची एक दिवसीय कृती कार्यशाळेचे आयोजन दि. ९ मार्च २०२० रोजी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक संशोधन तथा विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता (प.म.) डॉ. यशवंत फुलपगारे, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, हळगाव कृषि महाविद्यालयाचे नोडल ऑफिसर डॉ. विठ्ठल शेंडे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी कृषि विज्ञान केंद्राचे प्रकल्प समन्वयक, विषय विशेषज्ञ, कार्यक्रम सहाय्यक आदी १६५ अधिकारी उपस्थित होते.

## विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती (खरीप-२०१९) बैठक

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक दि. १९ जून २०१९ रोजी राज्य पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे येथे पार पडली. या बैठकीमध्ये सन २०१८-१९ वर्षांमध्ये कृषि विद्यापीठामध्ये झालेल्या संशोधनाचा प्रसार शेतकऱ्यांमध्ये करण्याकरिता राज्याच्या कृषि विभागाकडे हे संशोधन हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने सदर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. के.पी. विश्वनाथा हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते तर राज्याचे कृषि आयुक्त मा. श्री. सुहास दिवसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बैठकीकरिता महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील पुणे, कोल्हापूर व नाशिक या तीनही कृषि विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक, पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, सर्व पीक विशेषज्ञ, कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक, विभागीय व जिल्हा विस्तार केंद्रांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी संचालक संशोधन व विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठ विस्तार व संशोधन उपक्रमाचे संक्षिप्त सादरीकरण केले. तसेच कृषि सहसंचालक पुणे, नाशिक आणि कोल्हापूर यांनी कृषि विभागाशी निगडीत विषयांचे सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी विद्यापीठ तसेच कृषि विभागातील १६० अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती (रब्बी व उन्हाळी २०१९-२०) बैठक

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक दि. २५ ऑक्टोबर, २०१९ रोजी विद्यापीठात आयोजीत करण्यात आली होती. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. के.पी. विश्वनाथा हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते तर राज्याचे कृषि विभागाचे संचालक फलोत्पादन डॉ. पी.एन. पोकळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बैठकीकरिता महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील पुणे, कोल्हापूर व नाशिक या तीनही कृषि विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. दिलीप झेंडे, श्री. दशरथ तांभाळे, श्री. रमेश भदाणे, पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, विद्यापीठातील सहयोगी अधिष्ठाता डॉ. एस.बी. खरबडे, डॉ. जी.जी. खोत, सर्व पीक विशेषज्ञ, कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक, विभागीय व जिल्हा विस्तार केंद्रांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी संचालक संशोधन व विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठ विस्तार व संशोधन उपक्रमाचे संक्षिप्त सादरीकरण केले तसेच उपस्थितांना मार्गदर्शन केले. कृषि सहसंचालक पुणे, नाशिक आणि कोल्हापूर यांनी कृषि विभागाशी निगडीत विषयांचे सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी विद्यापीठ तसेच कृषि विभागातील १६० अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## वनमहोत्सव-२०१९

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत वनमहोत्सव व कृषि दिनाचे आयोजन दि. ८ जुलै, २०१९ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. याप्रसंगी राहुरीचे तहसीलदार श्री. फैसुद्दीन शेख, जिल्हा सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी श्री. देवखीळे, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन संचालक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. प्रकाश तुरबतमठ, कृषि महाविद्यालय, हळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विठ्ठलराव शेंडे, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता इंजि. मिलिंद ढोके उपस्थित होते.

यावेळी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, श्री. शेख व श्री. देवखीळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर विद्यापीठात आयोजित वृक्षलागवडीच्या कार्यक्रमात अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. राहुल द्विवेदी, जिल्ह्याचे उपवनसंरक्षक श्री. आदर्श रेड्डी, कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांच्या व मान्यवरांच्या शुभहस्ते वृक्षारोपन करण्यात आले.

### कृषि विद्यापीठात जलशक्ती जनजागृती मेळावा व रथ यात्रेचे आयोजन

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने जलशक्ती मंत्रालय पेयजल व स्वच्छता विभाग पुरस्कृत जलशक्ती अभियानातर्गत जलशक्ती जनजागृती मेळावा आणि रथ यात्रेचे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठात  दि. ५ ऑगस्ट, २०१९ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रामच्या अध्यक्षस्थानी विस्तार शिक्षण संचालक तथा संशोधन संचालक डॉ. शरद गडाख होते. यावेळी अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. विलास नलगे, बाभळेश्वर येथील कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. संभाजी नालकर, दहीगावणे कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. कौशिक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रमुख प्रा. माधव देसाई, तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख, श्री. विलास नलगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### शेतकरी प्रथम प्रकल्पातंर्गद विविध उपक्रम

### बाजरी व तुर उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या शेतकरी प्रथम प्रकल्पातंर्गत दि. १७ जुन, २०१९ रोजी बाजरी व तुर उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठातील कडधान्य सुधार प्रकल्पाचे शास्त्रज्ञ डॉ. एन.एस. कुटे आणि इतर शास्त्रज्ञ यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना बाजरी व तुर उत्पादन तंत्रज्ञान या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी ६० शेतकऱ्यांनी प्रशिक्षणात सहभाग नोंदविला.

### गांडूळ खत व मुरघास निर्मिती प्रशिक्षण

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या शेतकरी प्रथम प्रकल्पातंर्गत विद्यापीठाच्या एकात्मिक शेती पध्दती प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावर गांडूळ खत आणि मूरघास तयार करण्याची पध्दती या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. ९ जुलै, २०१९ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे फलोत्पादन संचालक श्री. प्रल्हाद पोकळे, एन.एच.एम. प्रकल्प संचालक डॉ. हसनाबदे, कृषि विद्या विभाग प्रमुख तथा प्रमुख शास्त्रण (बियाणे) डॉ. आनंद सोळंके, प्रकल्प अधिकारी श्रीमती उर्मीला राजपूत, श्रीमती राजश्री पवार, कृषि उद्योजक श्री. संदिप डेरे, शेतकरी प्रथम कार्यक्रमाचे प्रमुख समन्वयक आणि प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे, प्रमुख शास्त्रज्ञ, एकात्मिक शेती प्रकल्प डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते. यावेळी चिंचविहिरे आणि कणगर या गावातील ५० शेतकरी आणि शेतकरी महिला प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता उपस्थित होते.

### चिंचविहिरे आणि कणगर गावात प्रक्षेत्र भेट व चर्चासत्र कार्यक्रम संपन्न

महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पातील चिंचविहिरे आणि कणगर गावांच्या प्रक्षेत्र भेट व शेतकरी चर्चासत्राच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन संचालक डॉ. शरद गडाख होते. यावेळी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ, डॉ. रविंद्र निमसे उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख, डॉ. यशवंत फुलपगारे यांनी मार्गदर्शन केले.

### शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत नवी दिल्लीच्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा शेतकरी प्रथम प्रकल्पातील चिंचविहीरे व कणगर गावातील शेतकऱ्यांचा राहता व नेवासा तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर अभ्यास दौऱ्याचे आयोजन दि. २५ जुलै, २०१९ केले होते. यावेळी प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे व डॉ. अनिल दुरगुडे, डॉ. रविंद्र निमसे, डॉ. भगवान देशमुख व डॉ. सचिन सदाफळ हे प्रकल्पाचे समहमन्वयक सहभागी झाले होते. यावेळी ३७ शेतकरी आणि शेतकरी महिला अभ्यास दौऱ्यामध्ये सहभाग नोंदविला.

### शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण वर्ग

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या वतीने दुग्ध व कुक्कुट उत्पादन आणि पुर्व हंगामी ऊस अधिक भाजीपाला आंतरपिके तंत्रज्ञान या विषयावरील कृषि अधिकारी, कर्मचारी यांच्याकरीता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दि. १९ फेब्रुवारी, २०२० रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. शरद गडाख यांनी केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके उपस्थित होते. यावेळी उप विभागीय कृषि अधिकारी, कर्जत येथील श्री. आर. के. गायकवाड व श्रीरामपूर येथील श्री. संजय काचोळे, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे समन्वयक प्रा. माधव देसाई, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे सह समन्वयक डॉ. सुनिल अडांगळे, तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे उपस्थित होते.

### शेतकरी प्रथम प्रकल्पाला मान्यवरांच्या भेटी

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राबवत असलेल्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या विविध प्रात्यक्षिकांना मान्यवरांनी भेटी दिल्या. पुणे येथील अटारी केंद्राचे संचालक डॉ. लाखन सिंह, कानपूर येथील अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. आर.के. सिंह, बाभळेश्वर कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संभाजी नालकर तसेच गुजरात आणि महाराष्ट्र राज्यातील कृषि विज्ञान केंद्राचे

तीस शास्त्रज्ञांनी प्रात्यक्षिकांना भेटी दिल्या. यावेळी मान्यवरांनी श्री. अभिजीत गिते यांच्या तूर पिकाचा फुले राजेश्वरी वाण, श्री. विशाल गिते यांच्या परसबागेतील कुक्कुटपालन, श्री. गोरक्षनाथ शिंदे यांच्या शेतावरील फुले विक्रम या हरभरा पिकाच्या वाणाची पाहणी केली. यावेळी संचालक डॉ. लाखन सिंह यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

### डाळिंब उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाचा डाळिंब उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन कणगर या गावामध्ये दि. २० जानेवारी, २०२० रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक व प्रभारी अधिकारी प्रसारण केंद्र डॉ. पंडित खर्डे होते. याप्रसंगी कोरडवाहू प्रकल्पाचे किटकशास्त्रज्ञ डॉ. अशोक वाळुंज, उद्यानविद्या विभागाचे सहाय्यक प्रा. मंजाबापू गावडे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक प्रा. माधव देसाई, कणगर गावचे प्रगतशील शेतकरी श्री. भास्कर वरघुडे व चिंचविहिरे गावचे प्रगतशील शेतकरी श्री. दगडू गिते उपस्थित होते. यावेळी सदरच्या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रा. मंजाबापू गावडे व किटकशास्त्रज्ञ डॉ. अशोक वाळुंज यांनी डाळिंब पिकाविषयी सखोल मार्गदर्शन केले.

### मॉडेल प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या आर्थिक सहकार्याने महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागामार्फत आयोजीत फळे व भाजीपाला प्रक्रिया तंत्रज्ञान व त्यांचे मुल्यवर्धन या विषयावरील मॉडेल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. १८–२५ नोव्हेंबर, २०१९ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे होते. याप्रसंगी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. प्रमोद कोटेचा उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गात २० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.

### व्यक्तिमत्व विकासाकरीता व्यवहारीक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम

भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या आर्थिक सहकार्याने महात्मा फुले कृषि विद्यापीठच्या विस्तार शिक्षण विभाग व गुजरात येथील आनंद कृषि विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिमत्व विकासाकरीता व्यवहारीक कौशल्य या विषयावरील दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. १८–१९ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे यांच्या हस्ते झाले. यावेळी आनंद विद्यापीठातील विस्तार शिक्षण संस्थेचे या कोर्सचे संचालक डॉ. महेश पटेल यांनी प्रशिक्षणाविषयी विस्तृत माहिती दिली. यावेळी विद्यापीठातील २० शास्त्रज्ञ आणि अधिकारी उपस्थित होते.

### किसान आधार संमेलन–२०१९

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि आत्मा, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दि. ऑक्टोबर २५–२६, २०२० रोजी आयोजित किसान आधार संमेलन व पशुप्रदर्शन, पीक प्रात्यक्षीके यांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कोरडवाहू क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक दलवाई यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण तथा संचालक संशोधन डॉ. शरद गडाख यांनी केले.

यावेळी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक मा. श्री. विश्वजीत माने, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी कुलगरु डॉ. रविप्रकाश दाणी, उझबेकिस्तान येथील नमणगन अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्थेचे डॉ. रावश्यान इस्मायलो, कामधेनु विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य मा. श्री. प्रतापराव भोसले, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजी जगताप, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, कुलसचिव श्री. सोपान कासार, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता इंजि. मिलिंद ढोके उपस्थित होते. या प्रसंगी सौ सुनिता पाटील, श्री. नाथाजी चौगुले, उपस्थित होते.

### कृषि विद्यापीठात किसान आधार संमेलनाच्या कार्यक्रमात तांत्रिक सत्र संपन्न

महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये आयोजित किसान आधार संमेलनाच्या तांत्रिक सत्रात प्रमुख वक्ते म्हणुन सह्याद्री ॲग्रो फार्म्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विलास शिंदे उपस्थित होते. या तांत्रिक सत्राचा विषय शेतकरी उत्पादक कंपनी आणि फळे व भाजीपाला प्रक्रिया हा होता. या तांत्रिक सत्राच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. एस.डी. सावंत, कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, विस्तार शिक्षण संचालक तथा संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, कांदा व लसुन संशोधन केंद्राचे संचालक डॉ. विजय महाजन, डॉ. व्ही.एम. मायंदे, माजी कुलगुरु डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, डॉ. एम.सी. वार्ष्णेय माजी कुलगुरु आनंद कृषि विद्यापीठ व कामधेनु विद्यापीठ, गुजरात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजीराव जगताप,

जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार उपस्थित होते.

यावेळी श्री. विलास शिंदे, प्युअर ऑरगॅनिक शेतकरी उत्पादक कंपनीच्या अध्यक्षा सौ. स्वाती शिंगाडे, डॉ. एस.डी. सावंत, डॉ. व्ही.एम. मायंदे व डॉ. एम.सी. वार्ष्णेय यांनी मार्गदर्शन केले. यावेळी या तांत्रिक सत्रासाठी शेतकरी, विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना तज्ञांनी उत्तरे दिली. या तांत्रिक सत्राच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले तर आभार डॉ. शरद गडाख यांनी मानले.

### पीक प्रात्यक्षीके

किसान आधार संमेलन-२०१९ च्या अनुषंगाने विद्यापीठ प्रक्षेत्रावर १०० एकर क्षेत्रावर विद्यापीठ तंत्रज्ञानाशि निगडीत पीक प्रात्यक्षीके यांचे आयोजन करण्यात आले. पीक प्रात्यक्षीकामध्ये तृणधान्य, कडधान्य, तेल बीया, चाऱ्याची पिके, भाजीपाला, फुल व फळ पिके आणि इतर महत्वाच्या ५६ पिकांच्या १४५ वाणांचे लागवड करण्यात आली. विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान सिंचन पध्दती, माती परिक्षण, गांडूळ खत निर्मिती, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन, जीवाणू खते निर्मिती या बाबींचा समावेश होता. तसेच एकात्मिक पीक पध्दती विषयक बाबींचा समावेश होता.

### कृषि आणि पशु पदर्शन

किसान आधार संमेलन-२०१९ या कार्यक्रमातंर्गत विद्यापीठामध्ये कृषि क्षेत्राशी निगडीत विविध निविष्ठा पुरवठा कंपन्या, कृषि अवजारे कंपन्या, कृषि प्रक्रिया विषयक कंपन्या आणि कृषि क्षेत्राशी निगडीत इतर शासकीय व खाजगी कंपन्यांचे प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते. तसेच पशुप्रदर्शनाचे आयोजन यावेळी करण्यात आले.

### कृषि महाविद्यालय, पुणे येथे खरीप तंत्रज्ञान दिवस आयोजन

दि.१५ ऑक्टोबर, २०१९ कृषि महाविद्यालय, पुणे येथे खरीप तांत्रिक दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन नालंदा विद्यापीठाचे कुलगुरु व परम महासंगणकाचे निर्माते डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते झाले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे कृषि आयुक्त श्री. सुहास दिवसे, कामधेनू विद्यापीठ, गांधीनगरचे कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. प्रतापराव भोसले, राहुरी कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य व फलोत्पादन संचालनालय, पुणेचे संचालक डॉ. के.व्ही. प्रसाद, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे विस्तार संचालक डॉ. व्ही. एस. शिर्के, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. दिलीप पवार, डॉ. सुनिल मासाळकर, सहयोगी संशोधन संचालक, गणेशखिंड डॉ. विनय सुपे, डॉ. शिवाजी गुरव उपस्थित होते. यावेळी डॉ. विजय भटकर, डॉ. के.पी. विश्वनाथा व श्री. भोसले यांनी मार्गदर्शन केले. डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाच्या संशोधन वाटचालीविषयी माहिती दिली.

### कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि तंत्रज्ञान दिवस आयोजन

दि. ३१ ऑक्टोबर, २०१९ कृषि महाविद्यालय, धुळे येथे विभागीय विस्तार केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, धुळे व कृषि विभाग, आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि तंत्रज्ञान दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाने विद्यापीठाचे संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, कार्यकारी परिषद सदस्य डॉ. पंकज महाले, सहयोगी अधिष्ठाता डॉ. ए.एम. मुसमाडे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे श्री. विवेक सोनवणे, विभागीय विस्तार केंद्राचे विस्तार कृषि विद्यावेत्ता डॉ. मुरलीधर महाजन, कृषि विज्ञान केंद्र धुळेचे प्रकल्प समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. सी.डी. देवकर उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख, डॉ. अशोक फरांदे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मुसमाडे यांनी महाविद्यालयाच्या प्रकल्पाविषयी माहिती दिली. यावेळी कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले.

### सामंजस्य करार

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि रिलायंन्स फाऊंडेशन यांच्यामध्ये सामंजस्य करार दि. १८ डिसेंबर, २०१९ रोजी करण्यात आला. सामंजस्य करारावर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख व रिलायंन्स फाऊंडेशनचे मुख्य वित्त अधिकारी श्री. सचिन मार्डीकर यांनी स्वाक्षरी केली. विद्यापीठासोबत सामंजस्य करार केल्यामुळे विद्यापीठाचे तंत्रज्ञान प्रसारास मदत होणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यामध्ये घेण्यात येणाऱ्या ऑडिओ कॉन्फरंन्स, व्हीडिओ कॉन्फरंन्स, जिओ चॅट प्रोग्राम, युट्युब लाइव्ह प्रोग्राम, किड व रोग चिकित्सा कार्यक्रमामध्ये तज्ञ म्हणुन संबंधीत जिल्ह्यातील विषयतज्ञ, शास्त्रज्ञ, विभाग प्रमुख यांचे सहकार्य लाभणार आहे. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे, कोल्हापूर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. गजानन खोत, कुलसचिव श्री. सोपान कासार, नियंत्रक श्री. विजय कोते, डॉ. आनंद सोळंके, डॉ. तानाजी नरुटे, डॉ. बापुसाहेब भाकरे, डॉ. अशोक पिसाळ, रिलायंन्स फाऊंडेशनच्या माहिती सेवा विभागाचे महाराष्ट्र विभाग प्रमुख श्री. दिपक केकाण, माहिती सेवा विभागाचे मॅनेजर श्री. संदिप गुंजाटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. दिपक

केकाण यांनी रिलायंन्स फाऊंडेशन–माहिती सेवा विषयी उपस्थितांना माहिती दिली. श्री. सचिन मार्डिकर यांनी रिलायंन्स फाऊंडेशन तर्फे कृषि, शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात राबविले जाणारे विविध उपक्रम या विषयी माहिती दिली.

### कृषि यांत्रिकीकरण दिवस आयोजन

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत अखिल भारतीय समन्वीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर, कृषि विभाग व आत्मा, सोलापूर आणि कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ आणि सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि यांत्रिकीकरण दिवस आणि सुधारीत कृषि अवजारांचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके यांचे आयोजन दि. १४ फेब्रुवारी, २०२० रोजी विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर येथे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. कार्यक्रमास डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील माजी कुलगुरु डॉ. व्यंकटराव मायंदे हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. यावेळी संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सोलापूर श्री. बसवराज बिराजदार, माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबठमत, डॉ. अजितकुमार देशपांडे, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बापुसाहेब भाकरे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शेंडे, डॉ. विजय अमृतसागर, कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक प्रा. तुळशीदास बास्टेवाड, कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वनाथ शिंदे, मोहोळ व सोलापूर येथील कृषि विज्ञान केंद्रांचे प्रकल्प समन्वयक डॉ. तानाजी वळकुंडे आणि डॉ. लालासाहेब तांबडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. व्यंकटराव मायंदे, डॉ. शरद गडाख, डॉ. दिलीप पवार व डॉ. प्रकाश तुरबतमठ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### शेतकरी शास्त्रज्ञ परिसंवाद आयोजन

जागतिक बँक अर्थसहाय्यित, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि भारतीय कृषि अभियांत्रिकी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि महाविद्यालय पुणे येथे शेतकरी शास्त्रज्ञ परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन कृषि अभियांत्रिकी संस्थेचे डॉ. इंद्रा मणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नाबार्डचे उपमहाव्यवस्थापक डॉ. उषा मणी, मि. व्यंकटेश शेटे लुपीन फाउंडेशन आणि हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार उपस्थित होते. योवळी कृषि महाविद्यालयातील विविध विभागांना भेटी देण्यात आल्या. कार्यक्रमासाठी १०० शेतकरी उपस्थित होते.

### औषधी व सुगंधी वनस्पती प्रशिक्षण कार्यक्रम आयोजन

औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, वनस्पती शास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि सुपारी व मसाला विकास निदेशालय, कालिकत (केरळ) यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. २० फेब्रुवारी, २०२० रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन नेव्ही टेक्नो प्रा. लि., पुणेचे संचालक डॉ. जीवन मुरकुटे, पेट्रीकोर इलिक्झॅरीस प्रा.लि., साताऱ्याचे संचालक श्री. ऋषिकेश शिंदे उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे श्री. ऋषिकेश शिंदे, डॉ. जीवन मुरकुटे, डॉ. सुरेश दोडके, डॉ. विक्रम कड व डॉ. मनोज माळी यांनी औषधी व सुगंधी वनस्ततींच्या लागवडी संदर्भात मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी ७० शेतकरी व शेतकरी महिला उपस्थित होत्या.

### अळिंबी प्रशिक्षण वर्ग आयोजन

राष्ट्रीय आळिंबी दिवसाच्या निमित्ताने अखिल भारतीय समन्वीत अळिंबी सुधार प्रकल्प, कृषि महाविद्यालय, पुणे यांनी दि. ४ जानेवारी, २०२० रोजी अळिंबी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. यावेळी सहयोगी अधिष्ठात डॉ. एस.डी. मासाळकर, सहयोगी संशोधन संचालक डॉ. व्ही.एस. सुपे उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात १२७ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.

### पार्थेनियम जागृती सप्ताह आयोजन

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांच्याद्वारे १६.८.२०१९ ते २२.८.२०१९ या कालावधीत पार्थेनियम जागृती सप्ताह आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये कृषि विज्ञान केंद्रातील सर्व विषय विशेषज्ञ यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे आयोजन पार्थेनियम पासून मानव आणि पशु यांच्यामध्ये निर्माण होणारे विविध आजार या विषयी जनजागृती करण्यावर भर देण्यात आला.

### खते वापरणे पध्दती विषयक जागृती अभियान

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत सर्व कृषि विज्ञान केंद्रांनी ऑक्टोबर,२०१९ मध्ये शेतकऱ्यांमध्ये खते व त्यांचा संतुलीत वापर या विषयी जनजागृती करण्याकरीता विशेष अभियान राबविण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांमध्ये विविध खतांविषयी माहिती देणे आणि त्यांच्या संतुलीत वापराविषयी जनजागृती करणे तसेच माती परिषणावर आधारीत खतांचा वापर करणे या विषयी माहिती देण्यात आली.

### जागतीक मृदा दिवस आयोजन

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत कार्यरत विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्र, कृषि विज्ञान केंद्रे यांच्याद्वारे दि. ५ डिसेंबर, २०१९ रोजी जागतीक मृदा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी खतांचा संतुलीत वापर व माती परिक्षण यांचे महत्व या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यापीठाच्या वतीने शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकाचे वितरण करण्यात आले.

### स्वच्छ भारत अभियान

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत कार्यरत विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्र, कृषि विज्ञान केंद्रे यांच्याद्वारे दि. २ ऑक्टोबर, २०१९ रोजी विद्यापीठातील सर्व कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छ भारत अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसर स्वच्छता आणि इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

### मासीक जिल्हा चर्चासत्र

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत कार्यरत विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्र, कृषि विज्ञान केंद्रे यांच्याद्वारे कृषि विभागाच्या समन्वयाने सन २०१९–२० या कालावधीत मासीक जिल्हा चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच प्रक्षेत्र भेटीचे आयोजनही करण्यात आले.

### निदान चमु भेटी आयोजन

महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत कार्यरत विभागीय विस्तार केंद्र, जिल्हा विस्तार केंद्र, कृषि विज्ञान केंद्रे यांच्याद्वारे कृषि विभागाच्या समन्वयाने सन २०१९–२० या कालावधीत शेतकऱ्यांच्या शेतावर गरजेनुरुप निदान चमु भेटींचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच प्रक्षेत्र भेटीचे आयोजनही करण्यात आले.

## विस्तार शिक्षण कार्यक्रम (२०१९–२०)

| अ.क्र. | तपशिल | सन २०१९–२०२० | |
|---|---|---|---|
| | | कार्यक्रम | एकुण लाभार्थी संख्या |
| **१. प्रशिक्षण कार्यक्रम** | | | |
| १. | शेतकरी, शेतकरी महिला व युवकांसाठी प्रशिक्षण | ३४६ | १८७९१ |
| २. | कृषि व विकास खात्यातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण | १३६ | ८८०४ |
| ३. | शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यामध्ये चर्चासत्र–प्रशिक्षण वर्ग | १५१ | ५१२९ |
| **२. चर्चासत्र/परिसंवाद** | | | |
| १. | मासिक जिल्हा चर्चासत्र | ६१ | १७५८ |
| २. | विद्यापीठ शास्त्रज्ञांचा परिसंवाद/चर्चासत्र सहभाग | १९ | ९९६ |
| ३. | संयुक्त कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक | २ | ३४० |
| ४. | शेतकरी शास्त्रज्ञ मंच बैठक | ३९ | १२८५ |
| **३. प्रात्यक्षिके/चाचणी प्रयोग** | | | |
| १. | कृति प्रात्याक्षिके | २३८ | ४५०६ |
| २. | परिणाम प्रात्याक्षिके | २८५ | २८५ |
| ३. | मुल्यांकन चाचण्या | ६० | ६० |
| ४. | आद्यरेखीय प्रात्याक्षिके | १३७१ | १३७१ |
| **४. इतर विस्तार शिक्षण कार्यक्रम** | | | |
| १. | सभा / गटचर्चा | ३०६ | ९६३१ |
| २. | प्रक्षेत्र भेटी / शिवार फेरी | ३६४ | ५४४९ |
| ३. | शेतीदिन | २३ | १०४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | प्रक्षेत्र व गृह भेटी | १०४५ | ३२८० |
| ५. | शेतकरी मेळावे | ८५ | समुह |
| ६. | कृषि प्रदर्शनांचे आयोजन | ६२ | समुह |
| ७. | किसान आधार संमेलन - २०१९ | ०१ | समुह |
| ८. | ॲग्रीटेक फेस्ट - २०१९ आणि कृषि प्रदर्शन (कृ.म., पुणे) | ०१ | समुह |
| ९. | कृषि तंत्रज्ञान दिवस आणि कृषि प्रदर्शन (कृ.म., धुळे) | ०१ | समुह |
| १०. | निदान चमुच्या भेटी व रोग आणि किड पहाणी पथक | २३७ | २२२४ |
| ११. | सर्व्हेलन्स चमु भेट | ९९ | १००९ |
| १२. | विद्यापीठ शास्त्रज्ञांचे कृषि खाते व इतर सेवाभावी संस्थेने आयोजित केलेल्या विस्तार कार्यक्रमात व्याख्याने | ४१३ | २५८५२ |
| ५. भेटी | | | |
| १. | शेतकरी | - | ८३४३१ |
| २. | विद्यार्थी | - | २६१७६ |
| ३. | प्रशिक्षणार्थी | - | ८६२१ |
| ४. | अधिकारी | - | २४४६ |
| ६. प्रसिध्दी | | | |
| १. | वर्तमानपत्रात/मासिकात प्रसिद्ध झालेले लेख | १३७९ | समुह |
| २. | आकाशवाणी कार्यक्रम | ३०४ | समुह |
| ३. | दूरदर्शन आणि इतर टि.व्ही. च्या वाहिन्यांवर प्रसारित झालेले कार्यक्रम | ५४ | समुह |
| ४. | विद्यापीठ कार्यक्रम | १५० | समुह |
| ७. इतर विस्तार उपक्रम | | | |
| १. | कृषि सल्ला | १३११ | २४४१३९ |
| २. | पाणी परिक्षण | ३१९ | ३१९ |
| ३. | माती परिक्षण आणि मृद आरोग्य पत्रिका वाटप | ३५९९ | ३५९९ |
| ४. | किड नमुने तपासणी | २०५ | २०५ |
| ५. | रोग नमुने तपासणी | ४०४ | ४०४ |
| ६. | दुरभाष्य / दूरध्वनीद्वारे दिलेली उत्तरे | १८२६० | १८२६० |

## ५. प्रमुख घडामोडी

### एप्रिल–२०१९

### १. पदव्युत्तर कृषि महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न



दि. १२ एप्रिल, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन सुप्रसिध्द हास्य कवी डॉ. मिर्झा बेग होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे होते. यावेळी व्यासपीठावर संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबठमत, कुलसचिव श्री. सोपानराव कासार, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. राजु नाईक, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहान, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राहुल देसले, शारिरीक शिक्षण निदेशक डॉ. अभिजीत नलावडे, सहाय्यक कुलसचिव श्री. राजेंद्र भुजबळ, विद्यार्थी परिषद सभापती कु. आरती बोरस्ते, क्रिडा समिती सचिव कु. ऋतुजा शिंदे, पारितोषिक वितरण सचिव कु. प्रियंका जगताप उपस्थित होते. डॉ. मिर्झा बेग यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अशोक फरांदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ यांनी केले. यावेळी एम.एस.सी. ॲग्रीची कु. ऋतुजा शिंदे आणि पी.एच. डी. चा विद्यार्थी श्री. पद्‍मकुमार पाटील यांना सर्वोत्कृष्ठ विद्यार्थी म्हणून प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

### २. कृषि विद्यापीठात महात्मा जोतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

दि. ११ एप्रिल, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठात महात्मा जोतिबा फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन नांदेड येथील साहित्यिक प्रा. देविदास फुलारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी



भूषविले. यावेळी व्यासपीठावर संचालक संशोधन डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, डॉ. अ.शि.कृ. अभियांत्रीकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, कुलसचिव श्री. सोपानराव कासार, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहान, प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. यावेळी प्रा. देविदास फुलारी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कुलसचिव डॉ. दिलीप पवार यांनी प्रस्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. बुकेश्वर गोडगे यांनी तर आभार प्रा. शरद पाटील यांनी मानले.

### ३. कृषि विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



दि. १४ एप्रिल, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्रा. प्रकाश पवार होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा होते. यावेळी व्यासपीठावर संचालक संशोधन तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, निम्नस्तर कृषि शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब

भारुड, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहाण आणि प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन केले आणि बुध्द वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रा. प्रकाश पवार यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी केले. डॉ. शरद गडाख यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्याची ओळख करुन दिली. कार्यक्रमाचे आभार डॉ. महाविरसिंग चौहाण यांनी मानले आणि सुत्रसंचालन श्री. जससिंग सोळंके यांनी केले.

## ४. कृषि विद्यापीठात बुध्दीमंथन कार्यशाळेचे आयोजन



दि. ३० एप्रिल, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे बांबू लागवड प्रकल्प, मफुकृवि, राहुरी यांचे वतीने बांबू लागवडीवर एक दिवसीय बुध्दीमंथन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणुन ग्रोमोर बायोटेक लि. चे संचालक डॉ. एन बारथी होते. कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी व्यासपीठावर कर्नाटक राज्याचे माजी सचिव डॉ. ए.सी. लक्ष्मना, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, महाराष्ट्र कृषि शिक्षण व परिषदेचे संशोधन संचालक डॉ. हरिहर कौसर्डीकर, डॉ. आर.डब्लु. भारुड, डॉ. आनंद सोळंके उपस्थित होते. यावेळी डॉ. एन बारथी, कर्नाटक राज्याचे माजी सचिव डॉ. ए.सी. लक्ष्मना, कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. अमरावतीचे वनपाल श्री. सईद सलीम अहमद, बांबू सोसायटी ऑफ इंडीया, पुणेचे डॉ. हेमंत बेडेकर, डॉ. ए.डी. राणे, डॉ. व्ही.एम. इल्लोरकर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रावसाहेब भारुड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत बोडके यांनी तर आभार डॉ. आनंद सोळंके यांनी मानले.

## ५. केंद्रिय पशु संशोधन संस्था, मेरठ यांच्या बरोबर सामंजस्य करार



एप्रिल १५, २०१९. कृषि महाविद्यालय पुणे येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि केंद्रीय गाय-गुरे संशोधन संस्था, मेरठ यांच्यात शिक्षण, संशोधन व विस्तारासाठी सामंजस्य करार झाला. या प्रसंगी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, केंद्रिय पशु संशोधन संस्थेचे संचालक डॉ. नितीन पाटील, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन संचालक डॉ. शरद गाडाख, सहयोगी अधिष्ठाता डॉ. पि.एन. रसाळ, प्राचार्य डॉ. एस.डी. मासाळकर, विभाग प्रमुख डॉ. वा.जी. फुलपगारे उपस्थित होते.

## ६. मुकुल-माधव फाउंडेशन बरोबर सामंजस्य करार



एप्रिल २२, २०१९. कृषि महाविद्यालय, पुणे येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि मुकुल-माधव फाउंडेशन यांच्यात कृषि शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि आर्थिक दृष्ट्या मागास शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे यासाठी सामंजस्य करारा संपन्न झाला. महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि महाविद्यालयातील आचार्य, पदव्युत्तर आणि पदवी घेणाऱ्या आर्थिक मागास ५९ विद्यार्थ्यांना मुकुल-माधव फाउंडेशन आणि फेनोलेक्स इंडस्ट्रीज लि. तर्फे प्रतिवर्षी रु. ५०,०००/- ची श्रीमती मोहिनी प्रल्हाद छाब्रीया शिष्यवृत्ती मिळणार आहे. या प्रसंगी कुलगुरु डॉ. के.

पी. विश्वनाथा, अधिष्ठाता डॉ. ए.एल. फरांदे, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि.चे संचालीका व मुकुल-माधव फाउंडेशनच्या मॅनेजींग ट्रस्टी श्रीमती रीतू छाब्रीया, फिनोलेक्स इडस्ट्रीज लि.चे सेक्रेटरी श्री. देवांग त्रिवेदी, सहयोगी अधिष्ठाता डॉ. पी.एन. रसाळ, प्राचार्य डॉ. एस.डी. मासाळकर उपस्थित होते.

### ७. नेहरु विज्ञान केंद्रा बरोबर सामंजस्य करार



एप्रिल १२, २०१९. कृषि महाविद्यालय, पुणे येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि मुंबई येथील नेहरु विज्ञान केंद्र यांच्यात कृषि महाविद्यालय, पुणे येथे कृषि शास्त्राचे म्युझियम तयार करण्याचा सामंजस्य करार संपन्न झाला. या प्रसंगी नेहरु विज्ञान केंद्राचे संचालक श्री. एस.एस. खेनेड, म्युझियम प्रमुख श्री. उमेशकुमार रसतोगी, सहयोगी अधिष्ठाता डॉ. पी.एन. रसाळ, प्राचार्य डॉ. एस.डी. मासाळकर उपस्थित होते.

## मे-२०१९

### ८. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ५९ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



दि. १ मे, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ५९ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी ग्रोमोर बायोटेक लि. चे संचालक डॉ. एन बारथी, कर्नाटक राज्याचे माजी सचिव डॉ. ए.सी. लक्ष्मना, निवृत्त आय.एफ.एस. डॉ. के.व्ही. लक्ष्मणमुर्ती, संशोधन संचालक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, कुलसचिव श्री. सोपानराव कासार, डॉ.अ.शि.कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद ढोके उपस्थित होते.यावेळी कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा म्हणाले की, महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शिक्षण, संशोधन आणि विस्तारात भरीव कार्य केलेले आहे. विद्यापीठाने विकसीत केलेल्या विविध वाणांचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन ५९ वा महाराष्ट्र दिनानिमित्त कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी केले. या प्रसंगी विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

### ९. हवामान स्मार्ट व आदर्शगाव पुरस्कार प्राप्त बुचकेवाडी (वैष्णवग्राम) ला कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांची भेट



दि. ६ मे, २०१९. आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत सुरु झालेले हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पातील शास्त्रज्ञांचा प्रत्यक्ष अभ्यास दौरा व भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी नाबार्डचे उपव्यवस्थापक डॉ. उषा मनी व सहाय्यक व्यवस्थापक श्री. सचिन कांबळे, लुपिनचे श्री. निलेश जोंधळे, श्री. व्यंकटेश शेटे, आयओटीचे श्री. चक्रधर बोरकुटे, अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, डॉ. ए.ए. अत्रे, डॉ. एस.ए. कदम हे यावेळी उपस्थित होते. यावेळी श्री. सचिन कांबळे यांनी सुरुवातीला अभ्यास दौरा व भेटीची पार्श्वभुमी विषद करुन गावात राबविण्यात येत असलेल्या विविध कामांचा आढावा सादर केला. आयओटी तंत्रज्ञानाविषयी श्री. चक्रधर यांनी माहिती दिली. डॉ. एस.डी. गोरंटीवार, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### १०. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. महेंद्र वारभूवन यांची कृषि विद्यापीठास भेट



दि. १३–१४ मे, २०१९. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथील महासंचालक श्री. महेंद्र वारभूवन यांनी नुकतीच महात्मा फुले कृषि विद्यापीठाला भेट दिली. यावेळी त्यांच्याबरोबर परिषदेचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, संशोधन संचालक डॉ. हरिहर कौसडीकर हे होते. याभेटी दरम्यान त्यांनी विद्यापीठातील वेगवेगळे संशोधन प्रकल्पांना भेटी देऊन तेथील संशोधनाची माहिती घेतली. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. सोपानराव कासार, पदव्युत्तर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबतमठ, डॉ.अ.शि.कृ.अभि. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, सर्व विभाग प्रमुख यांचे उपस्थितीत विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात संशोधन, विस्तार व शिक्षण विभागाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी श्री. महेंद्र वारभूवन यांनी विद्यापीठाच्या संशोधन, विस्तार व शिक्षण कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या अंतर्गत शेतकरी प्रथम प्रक़ल्पातर्फे चिंचविहिरे या गावात राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची पाहणी, एकात्मिक शेती प्रकल्प, राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांची पाहणी त्यांनी केली. यावेळी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. सोपानराव कासार आणि प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे हे यावेळी उपस्थित होते.

### ११. कृषि विद्यापीठात संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या ४७ व्या बैठकीचे उद्घाटन संपन्न

दि. २९ मे, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी कृषि विद्यापीठ येथे तीन दिवसीय संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीची ४७ वी बैठकीचे उद्घाटन संपन्न झाले. या प्रसंगी



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. या प्रसंगी इतर तीनही विद्यापीठांचे कुलगुरु डॉ. विलास भाले (अकोला), डॉ. अशोक ढवण (परभणी), डॉ. संजय सावंत (दापोली), संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, पुष्प संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. के.व्ही. प्रसाद, कृषि परिषदेचे संशोधन संचालक डॉ. हरिहर कौसडीकर, सर्व कृषि विद्यापीठांचे संचालक, डॉ. अशोक फरांदे, डॉ. दत्तप्रसाद वासकर, डॉ. दिपक मानकर, डॉ. विलास खर्चे, डॉ. यु.डी. पाटील, डॉ. पी.जी. इंगोले, डॉ. पराग हलदणकर, डॉ. एस.एस. नारखेडे, डॉ. संजय भावे, नियंत्रक श्री. विजय कोते, कुलसचिव श्री. सोपानराव कासार, कृषि परिषदेचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. विठ्ठल शिर्के उपस्थित होते.

यावेळी कुलगरु डॉ. के.पी. विश्वनाथा आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने एकात्मिक शेती पध्दतीचे मॉडेल विकसीत केले आहे. या मॉडेलचा प्रत्येक हवामान विभागात प्रात्यक्षिक होऊन त्याचा योग्य प्रसार होणे गरजेचे आहे. या प्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास भाले, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरु डॉ. अशोक ढवण व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरु डॉ. एस.डी. सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक आणि स्वागत डॉ. शरद गडाख यांनी केले. याप्रसंगी द्राक्षावरील राष्ट्रीय संशोधन संस्थेचे संचालीका डॉ. इंदू सावंत, लिंबूवर्गीय राष्ट्रीय संशोधन संस्थेचे संचालक डॉ. आय.पी. सिंग, राष्ट्रीय डाळिंब संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एन.पी. सिंग, अटारी संचालक डॉ. लाखन सिंग, माजी संचालक विस्तार शिक्षण डॉ. के.डी. कोकाटे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. नलगे, डॉ. राणे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. हरिहर कौसडीकर यांनी केले.

### १२. कृषि विद्यापीठात संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या ४७ व्या बैठकीचा समारोप संपन्न



दि. ३१ मे, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी कृषि विद्यापीठ येथे तीन दिवसीय संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीची ४७ वी बैठकीच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे कृषि व फलोत्पादन, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम, मंत्री आणि प्रतिकुलपती, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. या प्रसंगी इतर तीनही विद्यापीठांचे कुलगुरु डॉ. विलास भाले (अकोला), डॉ. अशोक ढवण (परभणी), डॉ. संजय सावंत (दापोली), महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचे प्रधान सचिव मा. श्री. एकनाथ डवले, कृषि परिषदेचे महासंचालक श्री. महेंद्र वारभुवन, संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, कृषि परिषदेचे संशोधन संचालक डॉ. हरिहर कौसडीकर, सर्व कृषि विद्यापीठांचे संचालक, डॉ. अशोक फरांदे, डॉ. दत्तप्रसाद वासकर, डॉ. दिपक मानकर, डॉ. विलास खर्चे, डॉ. यु.डी. पाटील, डॉ. पी.जी. इंगोले, डॉ. पराग हलदणकर, डॉ. एस.एस. नारखेडे, डॉ. संजय भावे, नियंत्रक श्री. विजय कोते, कुलसचिव श्री. सोपानराव कासार, कृषि परिषदेचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. विठ्ठल शिर्के उपस्थित होते.

यावेळी मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील आपल्या भाषणात म्हणाले की शेतकऱ्यांच्या जीवनात सुख, आनंद आणि सुरक्षीतता आणायची असेल तर कृषि क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाने मिशन समजुन काम करणे महत्वाचे आहे. कृषि विद्यापीठे करत असलेले काम हे अत्यंत महत्वाचे असून शेतकऱ्यांचे उत्पन्नात निश्चितच वाढ होईल. या प्रसंगी श्री. एकनाथ डवले, कृषि परिषदेचे महासंचालक श्री. महेंद्र वारभुवन यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. शरद गडाख यांनी केले. कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी प्रास्तविक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी केले.

### १३. महासंचालक यांनी भारतीय कृषि अनुसंधान परिषद–शेतकरी प्रथम प्रकल्पास भेट



दि. १४ मे, २०१९. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथील महासंचालक डी. महेंद्र वारभूवन यांची महात्मा फुले कृषि विद्यापीठातील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या अंतर्गत शेतकरी प्रथम प्रकल्पातर्फे चिंचविहिरे या गावात राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची पाहणी, एकात्मिक शेती प्रकल्प, राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांची पाहणी त्यांनी केली. त्याचबरोबर परिषदेचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, संशोधन संचालक डॉ. हरिहर कौसडीकर हे होते. यावेळी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शदर गडाख, कुलसचिव श्री. सोपानराव कासार आणि प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे हे यावेळी उपस्थित होते.

### १४. विभागस्तरीय खरीप हंगाम पुर्व अधिकारी प्रशिक्षणाचे आयोजन



मे २, २०१९. कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विभागासाठी विभागस्तरीय खरीप हंगाम पुर्व अधिकारी प्रशिक्षणाचे कृषि विद्यापीठात आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा तर प्रमुख पाहुणे कृषि आयुक्त श्री. सुहास दिवसे होते. या प्रसंगी संचालक

विस्तार व प्रशिक्षण श्री. विजयकुमार घावटे, संचालक निविष्ठा व गुणनियंत्रण श्री. विजयकुमार इंगळे, संचालक फलोत्पादन डॉ. पी. एन. पोकळे, संचालक आत्मा श्री. कैलास मोटे, विभागीय कृषि संहसंचालक, पुणे श्री. दिलीप झेंडे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. विलास नलगे उपस्थित होते.

## जून २०१९

### १५. कृषि विद्यापीठात दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न



दि. २०–२१ जुन, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापन करीता आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्रांतर्गत दि. २०–२१ जुन, २०१९ रोजी गावपातळीवरील पीक नियोजन या विषयी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी केंद्रीय कोरडवाहू कृषि अनुसंधान संस्था, हैद्राबादचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. के.ए. गोपीनाथ, कृषि हवामान शास्त्र विभाग प्रमुख डॉ. जे.डी. जाधव, भारतीय उष्णकटीबंधीय हवामान विज्ञान संस्था, पुणेचे माजी सल्लागार डॉ. जे.आर. कुलकर्णी, मुख्य शास्त्रज्ञ डॉ. के.के. डाखोर, मुख्य शास्त्रज्ञ डॉ. बी.व्ही. आसेवार, नाबार्ड बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक श्री. सचिन कांबळे, भारतीय कृषि उद्योग संस्थेचे डॉ. राजेश्री जोशी, श्री. सोमनाथ चौधरी, प्रकल्प समन्वयक डॉ. एस.डी. गोरंटीवार, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, कार्यशाळेचे आयोजन सचिव डॉ. आर.पी. आंधळे, डॉ. पी.एस. बोडके, डॉ. एम.सी. अहिरे, डॉ. बी.डी. भाकरे, डॉ. ए.ए. अत्रे उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मुख्य शास्त्रज्ञ डॉ. के.ए. गोपीनाथ, डॉ. बी.व्ही. आसेवार, श्री. सचिन कांबळे, डॉ. जे.डी. जाधव तसेच श्री. सोमनाथ चौधरी यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. एम.जी. शिंदे आणि आभार डॉ. बी.डी. भाकरे यांनी मानले.

### १६. खरीप २०१९ हंगामाची विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक



दि. १९ जून २०१९. सन २०१८–१९ वर्षांमध्ये कृषि विद्यापीठामध्ये झालेल्या संशोधनाचा प्रसार शेतकऱ्यांमध्ये करण्याकरिता राज्याच्या कृषि विभागाकडे हे संशोधन हस्तांतरित करण्यासाठी खरीप २०१९ हंगामाची विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समितीची बैठक राज्य पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे येथे पार पडली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. के.पी. विश्वनाथा हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते तर राज्याचे कृषि आयुक्त मा. श्री. सुहास दिवसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बैठकीकरिता महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील पुणे, कोल्हापूर व नाशिक या तीनही कृषि विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक, पश्चिम महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, सर्व पीक विशेषज्ञ, कृषि विज्ञान केंद्रांचे कार्यक्रम समन्वयक, विभागीय व जिल्हा विस्तार केंद्रांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. शरद गडाख, श्री सुहास दिवसे यांनी मार्गदर्शन केले. कुलगुरू मा. डॉ. के. पी. विश्वनाथा यांनी देखील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे शेतीमध्ये पशुधन घटकाच्या समावेश केल्याशिवाय शक्य नसल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. क्षीरसागर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. दत्तात्रय लाड यांनी केले.

### १७. तंत्रज्ञानाच्या प्रभावी प्रसाराकरीता माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या वापराविषयी प्रशिक्षणाचे आयोजन



दि. ११–१२ जुन, २०१९. जागतीक बँक अर्थ सहाय्यीत व राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाकरीता आधुनिक कृषि व विज्ञान तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन तंत्रज्ञानाच्या प्रभावी प्रसाराकरीता माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर या विषयी दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन डॉ. अशोक फरांदे यांनी केले. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. पी.ए. तुरबतमठ, हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनकरीता आधुनिक कृषि व विज्ञान तंत्रज्ञान केंद्राचे प्रकल्प समन्वयक डॉ. एस.डी. गोरंटीवार, कृषि विस्तार विभाग प्रमुख व प्रशिक्षणाचे आयोजन सचिव डॉ. एम.सी. अहिरे तसेच प्रशिक्षणाकरीता प्रमुख वक्ते म्हणुन कनिष्ठ वैज्ञानिक डॉ. श्रीधर पाटील, सहाय्यक प्राध्यापक डॉ. एम.बी. धादवड उपस्थित होते. यावेळी डॉ. अशोक फरांदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. एस.डी. गोरंटीवार यांनी विविध कार्यक्रमांची माहिती विषद केली. या दोन दिवसीय प्रशिक्षणाचे एकुण आठ सत्रांमध्ये डॉ. श्रीधर पाटील, डॉ. एम.डी. धादवड, श्री. भुषण कुलकर्णी व श्री. एकनाथ गोरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशिक्षण कार्यक्रम समन्वयक डॉ. शुभांगी घाडगे यांनी तर आभार प्रदर्शन कार्यक्रम समन्वयक डॉ. सेवक ढेंगे यांनी मानले.

### १८. कृषि विद्यापीठत आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन

दि. २१ जुन, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या पूर्व संधेला योगावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले




कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून योगसंशोधक व योगप्रचारक आणि नाशिक येथील आरोग्यधाम निसर्गोपचार व योग केंद्राचे संचालक डॉ. प्रविण देशपांडे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर संचालक संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, कृषि विस्तार विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे, वनस्पतीरोग शास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. टी.के. नरुटे, किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी.एस. पाटील, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहाण, सावित्रीबाई फुले माध्यमिक महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा. जितेंद्र मेटकर, क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते.

यावेळी डॉ. प्रविण देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षिय मार्गदर्शन कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत डॉ. शरद गडाख यांनी केले. आभार प्रा. डॉ. महाविरसिंग चौहान यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. दिलीप गायकवाड यांनी केले.

### १९. कृषि विद्यापीठात दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न



दि १४–१५ जुन, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतीक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प

व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन करीता आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्रांतर्गत हवामान अद्ययावत शेती विकासात हायपर स्पेक्ट्रल सेन्सर तंत्रज्ञानाचे महत्व या विषयी दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थ्ज्ञापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. एस.डी. गोरंटीवार, सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, प्रशिक्षण आयोजन यचिव डॉ. एस.ए. कदम, कार्यक्रम समन्वयक डॉ. सी.बी. पांडे, डॉ. जे. राजेश व सर्व संशोधन सहयोगी आदि उपस्थित होते. यावेळी डॉ. अशोक फरांदे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. दिलीप पवार व डॉ. एस.डी. गोरंटीवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तांत्रिक सत्रात प्राध्यापक डॉ. विजय भगत, सहाय्यक प्राध्यापक डॉ. अमोल विभूते, अजैविक ताण व्यवस्थापन संस्था, माळेगावचे शास्त्रज्ञ डॉ. भास्कर गायकवाड, आय.सी.ए.आर. चे सहाय्यक संचालक डॉ. एस.ए. चौधरी यांनी हायपर स्पेक्ट्रल सेन्सर तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले.प्रशिक्षणाचे सूचसंचालन डॉ. जे. राजेश यांनी केले तर आभार डॉ. एम.जी. शिंदे यांनी मानले.

## जुलै, २०१९

### २०. कृषि विद्यापीठात दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न



दि. ४–५ जुलै, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतीक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन करीता आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्रांतर्गत हवामान अद्ययावत शेती करीता जमिनीचे आरोग्य आणि जमिन वापराचे नियोजन या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठात करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे जवाहरलाल नेहरु कृषि विश्व विद्यालय, जबलपूर येथील माजी कुलगुरु डॉ. व्ही.एस. तोमर होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. या प्रसंगी व्यासपीठावर भारतीय कृषि अनुसंधान परिषरेच्या माती व पाणी व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक महानिदेशक डॉ. एस.के. चौधरी, संशोधन संचालक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. प्रकाश तुरबतमठ, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, जिल्हा कृषि अधिकारी श्री. विलास नलगे, पोकरा संस्थेचे मृदशास्त्रज्ञ श्री. भाऊसाहेब बऱ्हाटे, वाटर संस्थेचे डॉ. ए.जी. वाणी, इंजि. रणजीत जाधव, प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार उपस्थित होते. यावेळी डॉ. व्ही.एस. तोमर, कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे स्वागत डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले.

### २१. महात्मा फुले कृषि विद्यापीठात वनमहोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न



दि. ८ जुलै, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठात वनमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. याप्रसंगी राहुरीचे तहसीलदार श्री. फैसुद्दीन शेख, जिल्हा सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी श्री. देवखीळे, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन संचालक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. प्रकाश तुरबतमठ, कृषि महाविद्यालय, हळगावचे सहयोगी अधिष्ठाता

डॉ. विठ्ठलराव शेंडे, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता इंजि. मिलिंद ढोके उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, श्री. शेख व श्री. देवखीळे यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमानंतर विद्यापीठात आयोजित वृक्षलागवडीच्या कार्यक्रमात अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. राहुल द्विवेदी, जिल्ह्याचे उपवनसंरक्षक श्री. आदर्श रेड्डी, कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांच्या व मान्यवरांच्या शुभहस्ते वृक्षारोपन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. शरद गडाख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. आनंद सोळंके यांनी केले.

### २२. शेतकरी प्रथम प्रकल्पाचा प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



दि. ९ जुलै, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या शेतकरी प्रथम प्रकल्पातंर्गत विद्यापीठाच्या एकात्मिक शेती पध्दती प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावर गांडूळ खत आणि मूरघास तयार करण्याची पध्दती या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे फलोत्पादन संचालक श्री. प्रल्हाद पोकळे, एन.एच.एम. प्रकल्प संचालक डॉ. हसनाबदे, कृषि विद्या विभाग प्रमुख तथा प्रमुख शास्त्रण (बियाणे) डॉ. आनंद सोळंके, प्रकल्प अधिकारी श्रीमती उर्मीला राजपूत, श्रीमती राजश्री पवार, कृषि उद्योजक श्री. संदिप डेरे, शेतकरी प्रथम कार्यक्रमाचे प्रमुख समन्वयक आणि प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे, प्रमुख शास्त्रज्ञ, एकात्मिक शेती प्रकल्प डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख, श्री. प्रल्हाद पोकळे यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण वर्गाचे प्रास्ताविक करतांना डॉ. पंडित खर्डे यांनी चिंचविहिरे गावात राबविण्यात येत असलेल्या शेतकरी प्रथम प्रकल्पाबाबत माहिती देवून प्रशिक्षण वर्गाचे महत्व विषद केले. प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. पंकज मोटे व डॉ. सुनिल अडांगळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

### २३. चिंचविहिरे आणि कणगर गावात प्रक्षेत्र भेट व चर्चासत्र कार्यक्रम संपन्न



दि. १९ जुलै, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पातील चिंचविहिरे आणि कणगर गावांच्या प्रक्षेत्र भेट व शेतकरी चर्चासत्राच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन संचालक डॉ. शरद गडाख होते. यावेळी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ, डॉ. रविंद्र निमसे उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख, डॉ. यशवंत फुलपगारे यांनी मार्गदर्शन केले. या प्रक्षेत्र भेटी, कार्यक्रमाचे नियोजन आणि प्रास्ताविक प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

### २४. शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा



दि. २५ जुलै, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत नवी दिल्लीच्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा शेतकरी प्रथम प्रकल्पातील चिंचविहीरे व कणगर गावातील शेतकऱ्यांचा राहता व

नेवासा तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतावर अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले होते. यावेळी प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे व डॉ. अनिल दुरगुडे, डॉ. रविंद्र निमसे, डॉ. भगवान देशमुख व डॉ. सचिन सदाफळ हे प्रकल्पाचे समहमन्वयक सहभागी झाले होते. या अभ्यास दौऱ्याच्या सुरुवातीला मौजे कोल्हार येथील श्री. संजय राऊत यांच्या कमी खर्चातील गांडुळ खत प्रकल्पाला भेट दिली. कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर या ठिकाणी केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संभाजी नालकर यांनी शेतकऱ्यांचे स्वागत केले. यावेळी विस्तार शिक्षण विषय विशेषज्ञ डॉ. सुनिल बोरुडे व डॉ. विठ्ठल विखे यांनी अंडी उबवणी केंद्र तसेच परसबागेतील कुक्कुटपालन या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. मौजे खंडाळा या ठिकाणी श्री. चंद्रकांत मुंडे यांच्या बोअर जातीच्या शेळ्यांच्या प्रकल्पास भेट देवून शेळ्यांची निवड, चाऱ्याचे नियोजन, लसीकरण व इतर महत्वाच्या बाबींची शेतकऱ्यांनी माहिती घेतली. पुनतगाव, ता. नेवासा या ठिकाणी श्री. बापु पवार यांचा मुरघास प्रकल्प, देवगड येथील डॉ. भास्कर यांचा गांडुळ खत प्रकल्प आणि गाईच्या मुक्त गोठा पध्दतीस मान्यवरांनी भेटी दिल्या. या अभ्यास दौऱ्यांचे आयोजन प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रकल्पाचे वरिष्ठ संशोधन सहयोगी विजय शेडगे आणि सहाय्यक अमोल गायकवाड यांच्या सहकार्याने यशस्वीपणे करण्यात आले.

## २५. कृषि विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिसंवाद संपन्न



दि. २३ ते २५ जुलै, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाच्या आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्रांतर्गत हवामान अद्ययावत शेतीकरीता यंत्रमानव, ड्रोन व इंटरनेट ऑफ थिंग्स मधील नवकल्पना व शैक्षणीक रणनिती या शिर्षकाखाली तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन दोन दिवस पुणे व एक दिवस महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे करण्यात आले होते. या आंतरराष्ट्रीय परिसंवादाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीचे माजी उपसंचालक (अभियांत्रीकी) डॉ. गजेंद्र सिंग होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. यावेळी राष्ट्रीय कृषि व उच्च शिक्षण प्रकल्पाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. पी.के. घोष, डॉ. आर.सी. अगरवाल, राष्ट्रीय कृषि व उच्च शिक्षण प्रकल्प (२अ) चे राष्ट्रीय समन्वयक डॉ. प्रभात कुमार, पोक्राचे प्रकल्प संचालक श्री. व्ही.सी. रस्तोगी, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, राष्ट्रीय मत्स्यशिक्षण संस्था, मुंबईचे संचालक तथा कुलगुरु डॉ. गोपाल कृष्ण, जीओइन्फॉरमेटीक्स, एशियन तंत्रज्ञान संस्था बँकाँकचे संचालक डॉ. मंजुलकुमार हजारीका, भारतीय तेल संशोधन संस्था आंध्रप्रदेशचे संचालक डॉ. आर.के. माथुर, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, मृदा भौतीकशास्त्र विभागाचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. आर. एन. साहु, सिफा मुंबईचे संचालक डॉ. सय्यद इस्माईल, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. पी.ए. तुरबतमठ, कृषि महाविद्यालय पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. पी.एन. रसाळ, डॉ. अशिकृ अभि. व तंत्र. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. डी.डी. पवार, हवामन अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. एस.डी. गोरंटीवार, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, डॉ. जे.एस. पाचपुते, आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे कार्यक्रम समन्वयक डॉ. एस.एम. नलावडे, कार्यक्रम सहसमन्वयक डॉ. एस.ए. कदम उपस्थित होते.

यावेळी डॉ. गजेंद्र सिंग, डॉ. आर.सी. अगरवाल, डॉ. पी.के. घोष व डॉ. व्ही.सी. रस्तोगी यांनी मार्गदर्शन केले.याप्रसंगी डॉ. के. पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. मंगल पाटील व स्वागत कार्यक्रम समन्वयक डॉ. एस.एम. नलावडे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. एस.डी. गोरंटीवार यांनी केले तर आभार डॉ. प्रभात कुमार यांनी केले.

## २६. बुचकेवाडीत कृषि विद्यापीठातर्फे बीज प्रक्रिया प्रात्यक्षिकांचे आयोजन

दि. १६ जुलै, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाच्या आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्रांतर्गत बुचकेवाडीत (वैष्णवधाम) ता. जुन्नर, जि. पुणे येथे दि. १६ जुलै, २०१९ रोजी सोयाबिन व आंबा कोय यावर बीज प्रक्रिया प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी संशोधन सहयोगी डॉ. नंदलाल देशमुख यांनी



उपस्थित शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया कशी करावी याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. यावेळी त्यांनी पीक निहाय जैविक संवर्धक, जैविक बुरशीनाशके व जैविक किटकनाशके याचे महत्व पटवून दिले. यावेळी बुचकेवाडी येथील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीतील सर्व सदस्य व ग्रामस्थ, हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्पातील संशोधन सहयोगी डॉ. सुरज मिसाळ, श्री. सचिन शिंदे उपस्थित होते.

### २७. कृषि विद्यापीठात काटेकोर पाणी व्यवस्थापनाविषयी प्रशिक्षण संपन्न



दि. ३०-३१ जुलै, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाच्या आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्रांतर्गत दि. ३०-३१ जुलै, २०१९ रोजी काटेकोर पाणी व्यवस्थापन या विषयी दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन मृदा व जलसंधारन विभागातील सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन जैन इरीगेशन प्रा.लि. जळगावचे इंजि. दिलीप येवलेकर यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील सिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. एन.एन. फिरके होते. यावेळी सहा. प्राध्यापक डॉ. पी.जी. पोपळे, संशोधन सहयोगी इंजि. मंगल पाटील, डॉ. अरुण भगत उपस्थित होते. यावेळी इंजि. दिलीप येवलेकर, डॉ. अरुण भगत, इंजि. तुषार करांडे, डॉ. अरुण देशमुख, डॉ. रजनी साळुंके, इंजि. निखील दुग्गड व इंजि. दत्ता पवार यांनी मार्गदर्शन केले.

### २८. झिरो बजेट शेती संकल्पना राबविणे संदर्भात पुणे उद्यानविद्या महाविद्यालयात नियोजन बैठक संपन्न



दि. १३ जुलै, २०१९. शासनाने नव्याने अंगीकारलेल्या झिरो बजेट शेती धोरणाच्या स्वीकारार्ह्यतेच्या शक्यतेची पडताळणी व पुढील नियोजन ठरविण्याकरीता कृषि महाविद्यालय, पुणे च्या परिसरातील उद्यानविद्या महाविद्यालयामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या पुढाकाराने राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. के.पी. विश्वनाथा होते. सदरील बैठकीकरीता मा. डॉ. व्ही.एम. भाले, कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, मा. डॉ. ए.एस. ढवण, कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी व मा. डॉ. एस.डी. सावंत, कुलगुरू, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली या महाराष्ट्रातील इतर तीनही कृषि विद्यापीठांचे कुलगुरू, मा. डॉ. एम.सी. वार्ष्णेय, माजी कुलगुरू, आनंद कृषि विद्यापीठ, आनंद, गुजरात व कामधेनु विद्यापीठ, गांधीनगर, गुजरात, मा. प्रा. नाथाजी चौगुले, सदस्य, कार्यकारी परिषद, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, राज्यातील चारही कृषि विद्यापीठांचे सर्व संचालक, डॉ. प्रमोद रसाळ, सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, पुणे, डॉ. सुनील मासळकर, प्राचार्य, उद्यानविद्या महाविद्यालय, पुणे व राज्यभरातून आलेले निवडक प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक डॉ. शरद गडाख यांनी केले. बैठकीदरम्यान विदर्भातील प्रगतशील शेतकरी श्री. मधुकरराव सरप, श्री. दत्तात्रय दिवरे, श्री. राजेंद्र ताले, श्री. देविदास धोत्रे, मराठवाड्यातील प्रगतशील शेतकरी श्री. नरेश शिंदे, श्री. बालासाहेब हिंगे, श्री. प्रताप काळे, श्री. मोहन देशमुख, श्री. डी.एस. कुलकर्णी, श्री. लक्ष्मीकांत

जोशी, कोकणातील प्रगतशील शेतकरी श्री. वसंत गायकवाड, श्री. विनायक महाजन व पश्चिम महाराष्ट्रातील प्रगतशील शेतकरी श्री. सुरसिंग पवार, श्री. सुरेश सस्ते, सौ. स्वाती शिंगाडे व श्री. श्रीराम गाढवे यांनी स्वतःच्या शेतीमध्ये करत असलेल्या प्रयोगांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. सुभाषचंद्र शिंदे, प्राध्यापक, कृषि विस्तार, कृषि महाविद्यालय, पुणे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अशोक फरांदे, अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक, शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी केले.

## ऑगस्ट, २०१९

### २९. कृषि विद्यापीठात जलशक्ती जनजागृती मेळावा व रथ यात्रेचे उत्साहात उद्घाटन संपन्न



दि. ५ ऑगस्ट, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने जलशक्ती मंत्रालय पेयजल व स्वच्छता विभाग पुरस्कृत जलशक्ती अभियानातर्गत जलशक्ती जनजागृती मेळावा आणि रथ यात्रेचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठात संपन्न झाले. या कार्यक्रामच्या अध्यक्षस्थानी विस्तार शिक्षण संचालक तथा संशोधन संचालक डॉ. शरद गडाख होते. यावेळी अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. विलास नलगे, बाभळेश्वर येथील कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. संभाजी नालकर, दहीगावणे कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. कौशिक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रमुख प्रा. माधव देसाई, तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते.

यावेळी डॉ. शरद गडाख, श्री. विलास नलगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. माधव देसाई यांनी केले आणि आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले.

### ३०. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ७३ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



दि. १५ ऑगस्ट, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ७३ वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी संचालक विस्तार शिक्षण तथा संचालक संशोधन डॉ. शरद गडाख, डॉ.अ.शि.कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. प्रकाश तुरबतमठ, कुलसचिव श्री. सोपान कासार, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलींद ढोके उपस्थित होते. ध्वजारोहण प्रसंगी कुलगुरु म्हणाले, यावर्षी विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी पिकांचे आठ नविन वाण, एक अवजारे, ४७ पीक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशी आणि पाच जैविक व अजैविक ताण सहन करणारे स्त्रोत प्रसारित केले आहेत. शेतकरी, शास्त्रज्ञ व शासनाच्या भरीव योगदानामुळे आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपुर्णच नाही तर दुसऱ्या देशांनाही अन्नधान्य निर्यात करीत आहोत. याकरीता आपण शेतकऱ्यांचे आभार मानले पाहिजेत.

यावेळी कुलसचिव श्री. सोपान कासार यांनी उपस्थितांना तंबाखु मुक्तीची शपथ दिली. प्रा. सुनिल फुलसवंगे यांच्या मार्गदर्शनाखाली एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. याप्रसंगी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, अहिल्याबाई होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव आणि जिल्हा रूग्णालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५० हुन अधिक विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. कुलगुरुंच्या हस्ते यावेळी द्रवरुप सुक्ष्मअन्नद्रव्य प्रयोगशाळा, विद्यापीठ पेट्रोल पंपाशेजारील विक्री केंद्र, विद्यापीठ प्रक्षेत्रावरील पाईपलाईन, बांबू प्रकल्पाच्या कार्यालयाच्या इमारतीचे भुमीपुजन व गो संशोधन

प्रकल्पातील गांडूळ खत निर्मिती प्रकल्प इ. चे उद्घाटन करण्यात आले.

### ३१. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या उत्पादनांसाठी विक्री केंद्रे सुरु




दि. १५ ऑगस्ट, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या विक्री केंद्राचे उद्घाटन नुकतेच कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विद्यापीठाचे संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. प्रकाश तुरबतमठ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. आनंद सोळुंके, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते.

विविध पिकांच्या वाणांचे बियाणे, कलमे रोपे, जैविक खते, जैविक किडनाशके, प्रक्रीया पदार्थ आणि बेकरी उत्पादने, विद्यापीठ प्रकाशने, बांबु हस्तकला उत्पादने, कृषि यंत्रे व अवजारे इ. एकाच दालनात शेतकऱ्यांना मिळत आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठात हे विक्रीकेंद्र हायवे लगत विद्यापीठाच्या पेट्रोल पंपाजवळ सुरु करण्यात आले आहे. याच प्रमाणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि जळगाव या दहा जिल्ह्यातील २७ संशोधन केंद्रांवर विद्यापीठ उत्पादने विक्री केंद्रे सुरु करत आहोत. हा दहा जिल्ह्यात राबविण्यात येणारा पथदर्शी प्रकल्प शेतकऱ्यांसाठी निश्चीत वरदान ठरणार आहे.

### ३२. कृषि विदयापीठाचा हरभऱ्याचा फुले विक्रम हा वाण देशाच्या मध्य विभागासाठी प्रसारीत

दि. २७ ते २९ ऑगस्ट २०१९. बिरसा कृषि विद्यापीठ, रांची (झारखंड) येथे दि. २७ ते २९ ऑगस्ट २०१९ या कालावधीत राष्ट्रीय पातळीवरील वार्षिक हरभरा संशोधन आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीसाठी देशातील विविध राज्यातून



हरभरा संशोधक उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कडधान्य सुधार प्रकल्पाने विकसित केलेला देशी हरभऱ्याचा फुले विक्रम हा कंबाईन हार्वेस्टरने काढणी करता येणारा वाण देशाच्या मध्य विभागासाठी (महाराष्ट, मध्यप्रदेश आणि गुजरात) प्रसारीत करण्यात आला आहे. फुले विक्रम वाणाचे वैशिष्ट असे की हा वाण उंच वाढणारा असून यास जमिनीपासून एका फुटाच्या वर घाटे लागण्यास सुरुवात होते. यामुळे कंबाईन हार्वेस्टरने पिकाची काढणी कुठलेही नुकसान न होता व्यवस्थित होते. मध्यम आकाराच्या दाण्यांचा हा वाण मर रोगास प्रतिकारक्षम असून या वाणाची उत्पादनक्षमता ४०–४२ क्विंटल प्रति हेक्टर व सरासरी उत्पादन २२ क्विंटल प्रति हेक्टर मिळते. हा वाण यांत्रिक पध्दतीने काढता येत असल्याने पीक काढणीवरील खर्चात बचत होते तसेच या अधिक उत्पादनक्षमतेमुळे देशाचे व राज्याचे हरभरा उत्पादन वाढ होण्यास मदत होईल.

### ३३. कृषि विद्यापीठाच्या बेकरी युनिटद्वारे विविध बेकरी पदार्थांचे उत्पादन सुरु



दि. २७ ऑगस्ट, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे बेकरी युनिटच्या नविन यंत्रे व मशीनरीचे उद्घाटन कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांच्या हस्ते झाले. या बेकरी युनिटमध्ये

पौष्टिक, स्वच्छ, गुणात्मक आणि मानवी आरोग्यास पोषक तत्वांनी युक्त व अतिशय माफक दरात साधा ब्रेड, मिल्क ब्रेड, मिल्क स्वीट टोस्ट, स्वीट बनपाव, सुरती बटर, नानकटाई, नाचणी बिस्कीट, मिल्टींग मोमेन्टस इ. उत्पादने विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केली जात आहेत. यावेळी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा व डॉ. शरद गडाख यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सुधीर लांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

### ३४. कृषि विद्यापीठात आयओटी तंत्रज्ञान व आधुनिक तंत्रज्ञान वापराविषयी प्रशिक्षण संपन्न



दि. १९ ऑगस्ट, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाकरीता आयओटी तंत्रज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन कृषि विद्यापीठातील मृदा व जलसिंचन विभागातील सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्‌घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील मृदा व जलसिंचन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एस.बी. नांदगुडे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कृषि विद्यापीठातील कृषि तंत्र व शक्ती अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एस.एम. नलावडे, जलसिंचन व्यवस्थापन आंतरविद्या विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एम.एस. माने, संशोधन सहयोगी इजि. तेजश्री नवले, इंजि. योगेश दिघे, डॉ. अरुण भगत, डॉ. सेवक ढेंगे, डॉ. शुभांगी घाडगे, डॉ. गिरीष भणगे, इजि. मोहसीन तांबोळी, इंजि. कल्पेश बोरसे, इंजि. मंगल पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. एस.एम. नलावडे यांनी प्रास्ताविकात आयओटी तंत्रज्ञान व आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षणाची पार्श्वभुमी विषद केली. प्रशिक्षणाकरीता प्रमुख वक्ते म्हणुन क्वाल्डन तंत्रज्ञान प्रा.लि. चे संचालक इंजि. हरे कृष्णा सिंग यांनी आयओटी तंत्रज्ञानाची संकल्पना, हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाकरीता आयओटी तंत्रज्ञानाचा वापर, आयओटीमधील विविध सेन्सर इ. विषयी माहिती दिली.

### ३५. हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापना करीता डेटा लॉगर्स व सेंन्सर या विषयीचे प्रशिक्षण संपन्न



दि. २० ते २२ ऑगस्ट, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापना करीता डेटा लॉगर्स व सेंन्सर या विषयी तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील जलसिंचन व निचरा विभागातील सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्‌घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शेती अवजारे व शक्ती अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्पातील संशोधन सहयोगी इंजि. तेजश्री नवले, डॉ. गिरीष भणगे उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. सचिन नलावडे यांनी प्रशिक्षणाची पार्श्वभुमी विषद केली. यावेळी इंजि. तेजश्री नवले, डॉ. गिरीष भणगे, प्राज ईल्केट्रावर्जनचे इंजि. सुजाता जावळे व इंजि. प्रसाद जवळे यांनी डेटा लॉगर्स व सेन्सर्स संबंधी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

### ३६. हवामान अद्यावत शेती आणि प्रगत तंत्रज्ञान या विषयावर कृषि विद्यापीठात प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

दि. २६–३० ऑगस्ट, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, येथे कार्यरत असुन या प्रकल्पातंर्गत हवामान अद्यावत शेती व प्रगत तंत्रज्ञान या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन दि. २६–३० ऑगस्ट, २०१९ दरम्यान करण्यात



आले होते. याप्रसंगी कृषि हवामानशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जयवंत जाधव, को–ऑरडीनेटर, मॅनेज, हैद्राबाद श्री. केशव गुंजाळ, संगमनेरी शेळी प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. संजय मंडकमाले, एकात्मिक शेती प्रकल्पाचे प्रमुख कृषि विद्यावेत्ता डॉ. उल्हास सुर्वे, कृषि विज्ञान केंद्र, बारामती येथील प्रकल्प सहाय्यक श्री. संदिप बाबर उपस्थित होते.

या प्रशिक्षणात श्री. केशव गुंजाळ, श्री. संदिप बाबर, डॉ. संजय मंडकमाले व डॉ. जयवंत जाधव यांनी विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेच्या आयोजनासाठी डॉ. सुनिल गोरंटीवार, प्रमुख संशोधक यांनी मार्गदर्शन केले तसेच डॉ. रवी आंधळे, आयोजन सचिव यांनी कार्यशाळेचे नियोजन केले. डॉ. मुकुंद शिंदे, सह–प्रमुख संशोधन यांनी प्रशिक्षणार्थींना प्रकल्पाविषयी माहिती तसेच पाच दिवशीय प्रशिक्षणाच्या आयोजनाचे उद्दिष्ट व महत्व विषद केले. डॉ. सुनिल कदम, डॉ. प्रमोद पोपळे व इतर संशोधन सहयोगी उपस्थित होते. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन डॉ. वैभव मालुंजकर यांनी केले व कार्यक्रम समन्वयक डॉ. स्नेहल कानडे यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले.

### ३७. खासदार श्री. शरदचंद्रजी पवार यांची राहुरी कृषि विद्यापीठास भेट




दि. २९ ऑगस्ट, २०१९. मा. खासदार व माजी केंद्रिय कृषि मंत्री श्री. शरदचंद्रजी पवार यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे भेट दिली. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. सोपान कासार, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके आणि सर्व सहयोगी अधिष्ठाता उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात शेतकरी प्रथम प्रकल्पातील चिंचविहिरे येथील महिला शेतकरी श्रीमती सविता नालकर यांनी श्री. पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मृदशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी केले.

### ३८. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या एस.आर.एफ. परिक्षेत विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय यश

दि. ५ ऑगस्ट, २०१९. कृषि महाविद्यालय, पुणेच्या विद्यार्थ्यांनी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या एस.आर.एफ.–२०१९ परिक्षेत राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश मिळविले. श्री. महेश जाधव व श्री. सिध्दार्थ काळे या विद्यार्थ्यांनी कृषि किटकशास्त्र, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र या विषयात अनुक्रमे प्रथम क्रमांक पटकविला. श्री. महम्मद शामनाज जैवतंत्रज्ञान विषयात दुसरा तर श्री. पार्थ जाधव या विद्यार्थ्याने मृदशास्त्र विषयात ५५ वी रँक मिळविली. श्री. विवेक राऊत (कृषि विद्या), राजकुमार मिना (मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र) कवी भारती (कृषि अर्थशास्त्र), रमन्ना वंकटी (उद्यानविद्या), पवन नखाते (मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र), स्नेहल चौधरी (अनुवंशिकता व वनस्पती पैदास) यांनीही या परिक्षेत उल्लेखनीय कामगिरी केली.

### ३९. संरक्षीत लागवड : संधी व आव्हाने या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न




दि. २७ ऑगस्ट, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने संरक्षीत लागवड : संधी व आव्हाने या विषयावर एक

दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. या प्रसंगी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अशोक फरांदे यांनी स्वागत तर डॉ. शरद गडाख यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी प्रास्ताविक व कार्यशाळेच्या आयोजनासंबंधी माहिती दिली. डॉ. धनंदज नरोटे, डॉ. मुकेश शुक्ला, श्री. चेतन देधीया व इंजि. संदिप डेरे या तज्ञांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि. मंगल पाटील यांनी तर आभार सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे यांनी मानले.

## सप्टेंबर, २०१९

### ४०. कृषि विद्यापीठात शिक्षक दिन उत्साहात साजरा




दि. ५ सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक तथा संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. यशवंत फुलपगारे, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, हळगांव कृषि महाविद्यालयाचे नोडल ऑफिसर डॉ. विठ्ठलराव शेंडे, कृषि अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान आणि क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. यावेळी डॉ. सर्जेराव निमसे यांनी मार्गदर्शन केले.याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. शरद गडाख यांनी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. किशोर पानसरे आणि आभार डॉ. महावीरसिंग चौहान यांनी मानले.

### ४१. चिंचविहिरे येथे रब्बी ज्वारी बिजोत्पादन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



दि. ६ सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व महाबीज यांच्या संयुक्त विद्यमाने रब्बी ज्वारी बिजोत्पादन प्रशिक्षण कार्यक्रम चिंचविहिरे येथे संपन्न झाला. महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा शेतकरी प्रथम कार्यक्रम चिंचविहिरे व कणगर या गावात राबविला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत रब्बी ज्वारीच्या बिजोत्पादन पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक तथा संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांच्या सुचनेनुसार करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक व प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र डॉ. पंडित खर्डे होते. याप्रसंगी व्यासपीठावर ज्वारी किटकशास्त्रज्ञ डॉ. उत्तम कदम, ज्वारी पैदासकार डॉ. मनाजी शिंदे, प्रा. सुदाम निर्मळ, मंडल कृषि अधिकारी श्री. वाघमोडे, महाबीजचे क्षेत्र अधिकारी श्री. रज्जाक शेख, चिंचविहिरे गावचे उपसरपंच श्री. संतोष पवार, चिंचविहिरेचे कृषि सहाय्यक श्री. रायभान गायकवाड, श्री. विजय शिंदे, श्री. दगडु गिते व कणगरचे प्रगतशील शेतकरी श्री. भास्कर वरघुडे उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये डॉ. सुदाम निर्मळ, डॉ. मनाजी शिंदे, डॉ. उत्तम कदम व महाबीजचे क्षेत्र अधिकारी श्री. रज्जाक शेख यांनी विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

### ४२. कृषि महाविद्यालय, पुणे येथे दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न

दि. १८-१९ सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त हवामान पुरक शेती आणि स्मार्ट गाव दृष्टीकोन या विषयी



दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन कृषि महाविद्यालय, पुणे येथे करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्‌घाटन अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण डॉ. अशोक फरांदे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पुणे येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, फलोत्पादन महाविद्यालय, पुणे येथील सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासाळकर, कृषि हवामानशास्त्र, विभाग प्रमुख कृषि महाविद्यालय, पुणे येथील डॉ. जयवंत जाधव, हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाच्या सह प्रमुख संशोधक डॉ. जयश्री पाचपुते, प्रशिक्षण आयोजन सचिव डॉ. आर.पी. आंधळे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस.जी. कानडे, डॉ. एस.एस. मिसाळ, डॉ. पी.एन. दळवी, डॉ. एम.बी. खामकर उपस्थित होते. यावेळी डॉ. अशोक फरांदे यांनी मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रामध्ये डॉ. सचिन कांबळे, डॉ. संजय मोरे, डॉ. डी.एस. पंडित, डॉ. जयवंत जाधव, डॉ. सुनिल गोरंटीवार व डॉ. क्रिपन घोष यांनी विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.

### ४३. कृषि उद्योजकता विकासातून रोजगार व सक्षमीकरणाला प्रोत्साहन या विषयावरील प्रशिक्षण संपन्न



दि. १२–१३ सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, येथे कार्यरत असुन या प्रकल्पातंर्गत कृषि उद्योजकता विकासातून रोजगार व सक्षमीकरणाला प्रोत्साहन या विषयी दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्‌घाटन सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. यशवंत फुलपगारे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रशिक्षणाकरीता प्रमुख वक्ते म्हणुन नाशिकचे पोल्ट्री उत्पादक श्री. श्रीकृष्ण गांगुर्डे, बारामतीच्या कृषि उद्योजक सौ. स्वाती शिंगाडे, उद्यम इन्फो सो. प्रा.लि. औरंगाबादचे संचालक श्री. उल्हास भाले, कृषि अर्थशास्त्र विभागाचे डॉ. संजय सपकाळ, प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, सह समन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, प्रशिक्षण आयोजन सचिव डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते.प्रशिक्षणाच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. यशवंत फुलपगारे यांनी मार्गदर्शन केले. श्री. श्रीकृष्ण गांगुर्डे यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील कुक्कुटपालनाचे योगदान या विषयी मार्गदर्शन केले. सौ. स्वाती शिंगाडे, श्री. उल्हास भाले व डॉ. संजय सपकाळ यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. डॉ. मिलिंद अहिरे यांनी प्रास्ताविकात वक्त्यांचा परिचय करुन प्रशिक्षणाची पार्श्वभुमी विषद केली.

### ४४. परसबागेतील कुक्कुटपालन या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



दि. २० सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाद्वारे राबविण्यात येणारा भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा शेतकरी प्रथम कार्यक्रमांतर्गत परसबागेतील कुक्कुटपालन या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक प्रा. एम.एम. देसाई, प्रमुख पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. रविद्रनाथ निमसे, विषय विशेषज्ञ डॉ.

सुनिल अडांगळे, प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख, डॉ. सचिन सदाफळ, कृषि विभागाचे श्री. रायभान गायकवाड, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. भास्कर वरघुडे उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा थोडक्यात सादर केला. डॉ. सुनिल अडांगळे व डॉ. रविंद्र निमसे यांनी कुक्कुटपालनाविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

### ४५. कृषि विद्यापीठात दोन दिवसीय सल्लागार परिसंवाद संपन्न




दि. २३–२४ सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी व राष्ट्रीय उच्च कृषि शिक्षण प्रकल्पांतर्गत भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय कृषि संशोधन व्यवस्थापन संस्था, हैद्राबाद यांच्या सयुक्त विद्यमाने गुणवत्तापूर्ण कृषि शिक्षणाचे शैक्षणिक, औद्योगीक व शासनाशी असलेले संबंध या विषयावरील दोन दिवसीय सल्लागार परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन कृषि विभागाचे विस्तार व प्रशिक्षण संचालक डॉ. नारायण शिसोदिया हे होते. याप्रसंगी हैद्राबाद येथील प्रकल्प संचालक डॉ. व्ही.व्ही. सुमंतकुमार, नार्मच्या प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुर्या राठोड, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. यशवंत फुलपगारे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, विस्तार शिक्षण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते. यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे डॉ. नारायण शिसोदिया यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. या परिसंवादाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. डॉ. व्ही.व्ही. सुमंतकुमार यांनी सदरच्या परिसंवादाच्या आयोजन करण्या विषयीचे महत्व विषद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. सुर्या राठोड यांनी केले.

### ४६. पाणलोट क्षेत्रात कार्यक्षम जलसंपदा व्यवस्थापनासाठी पाण्याचा ताळेबंद या विषयावरील प्रशिक्षण संपन्न



दि. २०–२१ सप्टेंबर, २०१९. जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत असुन या प्रकल्पातंर्गत पाणलोट क्षेत्रात कार्यक्षम जलसंपदा व्यवस्थापनासाठी पाण्याचा ताळेबंद या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन कृषि विद्यापीठात करण्यात आले होते. याप्रसंगी मृदा व जलसंधारण विभाग प्रमुख डॉ. सचिनकुमार नांदगुडे, सह संयोजक डॉ. अतुल अत्रे, आयोजन सचिव डॉ. मुकुंद शिंदे, कार्यक्रम समन्वयक डॉ. वैभव मालुंजकर व डॉ. स्नेहल काकडे उपस्थित होते. यावेळी डॉ. मुकुंद शिंदे म्हणाले की, हवामान बदल आणि त्याचा जलसंपदेवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी पिकांच्या गरजेनुसार पाण्याचा काटेकोर वापर करुन उत्पादन कसे वाढवता येईल त्यासाठी नवनविन उपाययोजना व त्यांची योग्य अंमलबजावणीसाठी पाण्याचा योग्य ताळेबंद हे सर्वोत्तम तंत्रज्ञान आहे. या दोन दिवसीय प्रशिक्षणात डॉ. ईश्वर काळे, वरीष्ठ वैज्ञानीक, वॉटरशेड, ऑर्गनायझेशन ट्रस्ट, पुणे, डॉ. सचिन कांबळे, सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, डॉ. युगंधर मांडवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, युग्मन असोसिएट्स, पुणे व श्री. उमेश लगड, मॅनेंजींग ट्रस्टी, सेवा, अहमदनगर यांनी  विविध विषयांवर प्रशिक्षणार्थींना उत्फुर्तपणे मार्गदर्शन केले.

### ४७. कृषि विद्यापीठात आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणाच्या तयारीसाठी पूर्व प्रशिक्षण संपन्न



दि. २६ सप्टेंबर, २०१९. जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर आणि आचार्य असे एकुण २० विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणासाठी ऑक्टोबर–नोव्हेंबर, २०१९ एआयटी, बँकॉक, थायलंड येथे होणाऱ्या ड्रोनचे ॲप्लीकेशन आणि गुगल अर्थ इंजिन प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. या अनुषंगाने मुलभूत तंत्रज्ञानाच्या माहितीसाठी ड्रोन, कृत्रिम बुध्दीमत्ता आणि भौगोलीक प्रणाली या विषयी दोन आठवड्यांचे पुर्व प्रशिक्षणाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षणाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दिलीप पवार होते. याप्रसंगी अद्ययावत कृषि व जलव्यवस्थापन प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, शेती अवजारे व शक्ती अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. एस.एम. नलावडे, मृदा व जलसंधारण अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक डॉ. अतुल अत्रे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. पी.जी. पोपळे तसेच प्रशिक्षण आयोजक सचिव डॉ. एस.ए. कदम, कार्यक्रम समन्वयक इंजि. मंगल पाटील, इंजि. कल्पेश बोरसे आणि सर्व संशोधन सहयोगी उपस्थित होते. यावेळी डॉ. दिलीप पवार यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणा दरम्यान राष्ट्रीय कृषि व उच्च शिक्षण प्रकल्पाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. पी.के. घोष यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी डॉ. एस.एम. नलावडे यांनीही मार्गदर्शन केले.

### ४८. मुंबईतील राजभवन येथे महाराष्ट्राचे मा.राज्यपाल व कुलपतींना कुलगुरुंनी दिल्या शुभेच्छा



दि. ११ सप्टेंबर, २०१९. महाराष्ट्राचे नवनियुक्त माननीय राज्यपाल व कुलपती श्री. भगत सिंग कोश्यारी यांना मुंबईतील राजभवनात कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी विद्यापीठाच्या वतीने शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याबद्दल थोडक्यात माहिती दिली. शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीमध्ये असणारे विद्यापिठाचे योगदानाबद्दल सुद्धा त्यांनी यावेळी माहिती दिली. यावेळी कुलगुरुंनी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त काढलेल्या स्मरणीकेची प्रत मा. राज्यपालांना भेट दिली.

### ४९. पुरग्रस्तांना महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडून मदत



दि. ३० सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी कोल्हापुर व सांगली पुरग्रस्तांच्या मदतीसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या पगाराची रक्कम रु. ४०,४०,८८८.०० चा चेक महाराष्ट्राचे मुख्य सचिव श्री. अजोय मेहता यांना मंत्रालय, मुंबई येथे सुपुर्द केला.

### ५०. पुणे येथे राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

दि. १७ सप्टेंबर–७ ऑक्टोबर, २०१९. कृषि हवामानशास्त्र विभाग व कृषि महाविद्यालय, पुणे येथील कृषि हवामानाचे अद्ययावत



प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने व भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या आर्थिक सहकार्याने पीक सुक्ष्म हवामान शास्त्रातील अलीकडील प्रगती या विषयावर २१ दिवसांच्या राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उदघाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन गुजरात येथील गांधीनगरच्या कामधेनू पशुविज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एम.सी. वार्ष्णेय होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीत पुणे येथील आय.एम.डी. चे ॲग्रीमेट विभागाचे प्रमुख डॉ. क्रिपान घोष होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोपाचा कार्यक्रम कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता. डॉ. प्रमोद रसाळ, उद्यान विद्या महाविद्यालय पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासाळकर उपस्थित होते. पुणे कृषि महाविद्यालयातील हवामान शास्त्र विभाग प्रमुख डॉ. जयवंत जाधव व त्यांच्या सहकार्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

### ५१. राष्ट्रीय पातळीवर करडईच्या वाणास मान्यता

सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या सोलापुर येथील अखिल भारतीय समन्वीत करडई संशोधन प्रकल्पाने करडई पिकाचा वाण राष्ट्रीय पातळीवर प्रसारीत केला. एसएसएफ–१२–४० हा करडईचा वाण झोन–१ मधील महाराष्ट्र, कर्नाटक व तेलगंना या राज्यांसाठी जिरायत व बागायत अशा दोन्ही क्षेत्रासाठी प्रसारीत करण्यात आला. एसएसएफ–१२–४० हा वाण (१७१३ कि/हे.) हा उत्कृष्ट चेक ए–१ (१६९८ कि/हे.) यापेक्षा बियाणे व तेलउत्पादनात सरस आढळुन आला. त्याचप्रमाणे एसएसएफ–१३–७१ हा वाण सुद्धा तुलनात्मकरित्या ए–१ व पीबीएनएस–१२ या चेक पेक्षा ९.८४ % जास्त बियाणे व २९.२% तेलधारकता व जिरायत व बागायत क्षेत्रासाठी प्रसारीत करण्यात आला. हा वाण फुलकिडे व अल्टरनेरीया लिफ स्पॉट या रोगास माफक प्रमाणात सहनशील असल्यामुळे एसएसएफ–१३–७१ हा वाण ४ ते ६ सप्टेबर, २०१९ रोजी कानपुर येथे झालेल्या वार्षिक संशोधन आढावा बैठकीत झोन १ मधील महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलगंना या राज्यांसाठी जिरायत व बागायत अशा दोन्ही क्षेत्रासाठी प्रसारीत करण्यात आला.

### ५२. शेतकरी प्रथम प्रकल्पाद्वारे हरभरा बियाणे उत्पादन तंत्रज्ञानावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न




दि. २६ सप्टेबर, २०१९. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा शेतकरी प्रथम प्रकल्प व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने कणगर ता. राहुरी येथे हरभरा बियाणे उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विस्तार व संप्रेषन विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे हे होते. या प्रसंगी सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठलराव शेंडे, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी व शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे व इतर शास्त्रज्ञ उपस्थित होते. यावेळी डॉ. मिलिंद अहिरे व डॉ. विठ्ठलराव शेंडे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. खर्डे यांनी चिंचविहिरे व कणगर या गावात राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी डॉ. नंदकुमार कुटे, प्रा. एल.बी. म्हसे, डॉ. सी.एस. चौधरी व डॉ. एस.बी. लटके यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. विजय शेडगे यांनी तर आभार श्री. किरण मगर यांनी मानले. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर शेतकरी उपस्थित होते.

### ५३. पुणे येथे एकात्मिक पीक पद्धतीकरीता हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

दि. १८–१९ सप्टेबर, २०१९. हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन विभागा अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे एकात्मिक पीक पद्धतीकरीता हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन या



विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी केले. यावेळी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, उद्यान विद्या महाविद्यालय पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासाळकर उपस्थित होते. प्रकल्पाच्या सह समन्वयक व प्रशिक्षणाच्या आयोजक सचिव डॉ. जयश्री पाचपुते यांनी प्रास्ताविक केले. या दोन दिवसीय प्रशिक्षणात वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. तज्ञ म्हणुन श्रीमती वासंती पुरोहित, श्री. ज्ञानेश्वर बोडखे, डॉ. पंडित खर्डे, डॉ. संतोष सहाने, श्री. सोमनाथ चौधरी व डॉ. उल्हास सुर्वे यांनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन डॉ. पी.एन. दळवी यांनी तर आभार श्री. अक्षय लिंगायत यांनी मानले.

### ५४. उद्योग-शासन-शिक्षणतज्ञ-विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन



दि. २६-२७ सप्टेबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्प यांचे संयुक्त विद्यमाने गुणवत्ता, तांत्रिक व आर्थिक बांबीवरील नियंत्रीत लागवड आराखड्यासाठी उद्योग-शासन-शिक्षण तज्ञ-विद्यार्थी यांचा संवाद या दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन राहुरी कृषि विद्यापीठात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन कृषि संचालक, पुणे डॉ. प्रल्हाद पोकळे यांचे हस्ते झाले. यावेळी प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, सिंचन निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. नरेंद्र फिरके, डेरे ॲग्रो इंडस्ट्रिजचे इंजि. संदिप डेरे, ओव्हरसीज मुंबईचे श्री. चेतन देधीया, ॲग्री प्लास्ट नियंत्रीत लागवड प्रा.लि., बंगलोरचे संस्थापक व संचालक इंजि. राजीव रॉय यांनी चर्चेत सहभाग घेतला. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी या कार्यक्रमाचे महत्व विषद केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. एच.डी. जगताप यांनी तर आभार इंजि. सचिन मोरे यांनी मानले.

### ५५. विद्यार्थी-उद्योग संवाद कार्यक्रमाचे आयोजन



दि. ११ सप्टेबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्पाच्या वतीने काटेकोर शेतीमध्ये युअेव्ही च्या अनुप्रयोगाची भुमिका या विषयावर एक दिवसीय विद्यार्थी-उद्योग संवाद कार्यक्रमाचे आयोजन कृषि महाविद्यालय, पुणे येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले. यावेळी त्यांनी प्रकल्पाच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांविषयी माहिती दिली. शेती यंत्रे व उर्जा विभाग प्रमुख व या कार्यक्रमाचे आयोजक सचिव डॉ. सचिन नलावडे यांनी या कार्यक्रमाविषयी थोडक्यात माहिती दिली. डॉ. रमेश कृष्णमुर्ती, श्री. आदिल लिंगोलु, श्री. स्वानंद गुधाते यांनी प्रशिनार्थीना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. जी.बी. भणगे यांनी तर आभार डॉ. सचिन नलावडे यांनी मानले.

## ऑक्टोबर, २०१९

### ५६. कृषि विद्यापीठात राहुरी चॅप्टर अंतर्गत डॉ. सामी रेड्डी यांचे व्याख्यानाचे आयोजन



दि. ४ ऑक्टोबर, २०१९. भारतीय मृदशास्त्र संशोधन संस्था, राहुरी चॅप्टर यांचे वतीने दहाव्या डॉ. गुरुसिंग शेखोन स्मृती व्याख्यान-२०१९ मध्ये हैद्राबाद येथील क्रिडा संस्थेतील डॉ. सामी रेड्डी यांचे व्याख्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा होते. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. यशवंत फुलपगारे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, राहुरी चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. बापूसाहेब भाकरे, सेक्रेटरी डॉ. एन.जे. रणशुर, खजीनदार डॉ. श्रीगणेश शेळके उपस्थित होते. यावेळी डॉ. के. साम्मी रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. के.पी विश्वनाथा म्हणाले की, शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकांचे वाटप करुन त्यानुसार खते देणे गरजेचे आहे. शेतातील काडीकचरा न जाळता तो कंपोष्ट खताच्या रुपात जमिनीत मिसळल्यानंतर जमिनीतील कर्बाचे प्रमाण वाढवून जमिनीची सुपीकता वाढेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रीतु ठाकरे यांनी तर आभार डॉ. एन.जे. रणशुर यांनी मानले.

### ५७. श्री. राजाराम चौधरी व श्री. रविंद्र चव्हाण यांची कृषि वैज्ञानिक संमेलनासाठी निवड

दि. ५ ते ८ नोव्हेंबर, २०१९. नवी दिल्ली येथील विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, पृथ्वी विज्ञान मंत्रालय आणि विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ ते ८ नोव्हेंबर, २०१९ रोजी कोलकता येथे भारतीय आंतरराष्ट्रीय विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये दि. ६ नोव्हेंबर, २०१९ रोजी कृषि वैज्ञानिक संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कृषि वैज्ञानिक संमेलनामध्ये





महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण परिषदेचे सदस्य श्री. राजाराम चौधरी आणि शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. रविंद्र चव्हाण यांची मार्गदर्शक म्हणुन निवड करण्यात आलेली आहे.

यामध्ये महाराष्ट्र राज्यातून फूलशेतीसाठी तज्ञ म्हणून कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण परिषदेचे सदस्य श्री. राजाराम चौधरी आणि एकात्मिक शेती पध्दतीतील तज्ञ म्हणून शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. रविंद्र चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, संचालक विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख आणि अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### ५८. किसान आधार संमेलन-२०१९ चे उद्घाटन संपन्न



दि. २५ ऑक्टोबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि आत्मा, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे आयोजित किसान आधार संमेलनातील प्रदर्शन, पशुप्रदर्शन, पीक प्रात्यक्षिके यांचे उद्घाटन नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कोरडवाहू क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक दलवाई यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण तथा संचालक संशोधन डॉ. शरद गडाख यांनी केले.

यावेळी डॉ. अशोक दलवाई आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेती करण्याची कल्पना ही भारताने संपुर्ण जगाला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. उद्याच्या भविष्यासाठी शेतीकडे गांभिर्याने पाहण्याची गरज आहे. शेतीमधिल नैसर्गीक उर्जास्त्रोताचे पुनरुजीवन करुन शेती भविष्यात हजारो वर्ष चांगल्या स्थितीत राहू शकेल पर्यायाने मानवाचे जीवनमान उंचावेल.

यावेळी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक मा. श्री. विश्वजीत माने, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी कुलगरु डॉ. रविप्रकाश दाणी, उझबेकिस्तान येथील नमणगन अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्थेचे डॉ. रावश्यान इस्मायलो, कामधेनु विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य मा. श्री. प्रतापराव भोसले, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजी जगताप, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, कुलसचिव श्री. सोपान कासार, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता इंजि. मिलिंद ढोके उपस्थित होते. या प्रसंगी सौ सुनिता पाटील, श्री. नाथाजी चौगुले, उपस्थित होते.

यावेळी श्री. शिवाजीराव जगताप यांनी कृषि विभागाचा आढावा सादर केला. तसेच डॉ. रावश्यान इस्मायलो यांनी आपले मनोगत रशियन भाषेत व्यक्त केले त्याचा अनुवाद डॉ. रविप्रकाश दाणी यांनी केला. कृषि परिषदेचे महासंचालक श्री. विश्वजीत माने व कामधेनु विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य डॉ. प्रतापराव भोसले यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. याप्रसंगी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी अध्यक्षीय भाषण केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले कृषि विद्यापीठाची संशोधन कार्यावर बनविलेल्या चित्रफितीचे तसेच पशुप्रदर्शन आणि प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार डॉ. अशोक फरांदे यांनी मानले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी केले.

### ५९. कृषि विद्यापीठात किसान आधार संमेलनाच्या कार्यक्रमात तांत्रिक सत्र संपन्न

दि. २६ ऑक्टोबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये आयोजित किसान आधार संमेलनाच्या तांत्रिक सत्रात प्रमुख वक्ते म्हणुन सह्याद्री ॲग्रो फार्म्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विलास शिंदे उपस्थित होते. या तांत्रिक सत्राचा विषय शेतकरी उत्पादक कंपनी आणि फळे व भाजीपाला प्रक्रिया हा होता. या तांत्रिक सत्राच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी.



विश्वनाथा होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. एस.डी. सावंत, कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, विस्तार शिक्षण संचालक तथा संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, कांदा व लसुन संशोधन केंद्राचे संचालक डॉ. विजय महाजन, डॉ. व्ही.एम. मायंदे, माजी कुलगुरु डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, डॉ. एम.सी. वार्ष्णेय माजी कुलगुरु आनंद कृषि विद्यापीठ व कामधेनु विद्यापीठ, गुजरात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजीराव जगताप, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार उपस्थित होते.

यावेळी श्री. विलास शिंदे, प्युअर ऑरगॅनिक शेतकरी उत्पादक कंपनीच्या अध्यक्षा सौ. स्वाती शिंगाडे, डॉ. एस.डी. सावंत, डॉ. व्ही.एम. मायंदे व डॉ. एम.सी. वार्ष्णेय यांनी मार्गदर्शन केले. यावेळी या तांत्रिक सत्रासाठी शेतकरी, विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना तज्ञांनी उत्तरे दिली. या तांत्रिक सत्राच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले तर आभार डॉ. शरद गडाख यांनी मानले.

### ६०. कृषि विद्यापीठात जागतीक अन्न दिन साजरा




दि. १६ ऑक्टोबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागात जागतिक अन्नदिन साजरा

करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे होते. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता (प.म.) डॉ. यशवंत फुलपगारे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण उपस्थित होते. यावेळी डॉ. अशोक फरांदे, डॉ. यशवंत फुलपगारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. उत्तम चव्हाण यांनी जागतिक अन्नदिनाचे महत्व विषद केले.

### ६१. कृषि महाविद्यालय, पुणे येथे खरीप तंत्रज्ञान दिवसाचे आयोजन



दि. १५ ऑक्टोबर, २०१९. कृषि महाविद्यालय, पुणे येथे खरीप तांत्रिक दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन नालंदा विद्यापीठाचे कुलगुरु व परम महासंगणकाचे निर्माते डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते झाले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे कृषि आयुक्त श्री. सुहास दिवसे, कामधेनू विद्यापीठ, गांधीनगरचे कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. प्रतापराव भोसले, राहुरी कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य व फलोत्पादन संचालनालय, पुणेचे संचालक डॉ. के.व्ही. प्रसाद, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे विस्तार संचालक डॉ. व्ही. एस. शिर्के, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. दिलीप पवार, डॉ. सुनिल मासाळकर, सहयोगी संशोधन संचालक, गणेशखिंड डॉ. विनय सुपे, डॉ. शिवाजी गुरव उपस्थित होते. यावेळी डॉ. विजय भटकर, डॉ. के.पी. विश्वनाथा व श्री. भोसले यांनी मार्गदर्शन केले. डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाच्या संशोधन वाटचालीविषयी माहिती दिली. डॉ. प्रमोद रसाळ यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुभाषचंद्र शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सुर्यवंशी यांनी केले.

### ६२. कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि तंत्रज्ञान दिवस संपन्न



दि. ३१ ऑक्टोबर, २०१९. कृषि महाविद्यालय, धुळे येथे विभागीय विस्तार केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, धुळे व कृषि विभाग, आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि तंत्रज्ञान दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाने विद्यापीठाचे संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, कार्यकारी परिषद सदस्य डॉ. पंकज महाले, सहयोगी अधिष्ठाता डॉ. ए.एम. मुसमाडे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे श्री. विवेक सोनवणे, विभागीय विस्तार केंद्राचे विस्तार कृषि विद्यावेत्ता डॉ. मुरलीधर महाजन, कृषि विज्ञान केंद्र धुळेचे प्रकल्प समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. सी.डी. देवकर उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख, डॉ. अशोक फरांदे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मुसमाडे यांनी महाविद्यालयाच्या प्रकल्पाविषयी माहिती दिली. यावेळी कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जगदिश काथेपुरी यांनी तर आभार डॉ. मुरलीधर महाजन यांनी मानले.

### ६३. घातक कचरा व त्याची विल्हेवाट याचे गांभिर्य यावर व्याख्यानाचे आयोजन



दि. ११ ऑक्टोबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ,

राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन विभाग या प्रकल्पाच्या वतीने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे घातक कचरा व त्याची विल्हेवाट याचे गांभिर्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार उपस्थित होते. रांजणगाव एम.आय.डी.सी., पुणे येथील पर्यावरण उर्जा लि.चे मार्केटींगचे प्रमुख श्री. राकेश मिश्रा यांनी यावेळी घातक कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी योग्य उपाययोजनांविषयी मार्गदर्शन केले. डॉ. पवन कुलवाल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### ६४. नालंदा विद्यापीठ, बिहारचे कुलगुरु डॉ. विजय भटकर यांचे बरोबर बैठकीचे आयोजन



दि. १५ ऑक्टोबर, २०१९. कृषि महाविद्यालय, पुणे येथे शाश्वत शेतीसाठी कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर या संकल्पनेवर आधारीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बिहारच्या नालंदा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय भटकर होते. याप्रसंगी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, पुणे उद्यानविद्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासाळकर, प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. जयश्री पाचपुते व प्रकल्पाचे संशोधन सहयोगी या बैठकीसाठी उपस्थित होते. यावेळी डॉ. विजय भटकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की कृत्रिम बुध्दिमत्ता व मशनरीचे शिक्षण यामुळे कृषिच्या विद्यार्थ्यांना व शास्त्रज्ञांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी नक्कीच अधिक उंची गाठता येईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले. डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी आभार मानले.

### ६५. उझबेकीस्तान गणतंत्रच्या प्रतिनीधींची महात्मा फुले कृषि विद्यापीठास भेट



दि. २५–२७ ऑक्टोबर, २०१९. उझबेकीस्तान गणतंत्रच्या नमागण अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्थेच्या प्रतिनीधींनी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्पास भेट दिली. यावेळी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याबद्दल माहिती दिली. यावेळी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांनी शिक्षण व संशोधनातील उल्लेखनीय घटनांचे सादरीकरण केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी प्रकल्पाबद्दल माहिती दिली.

## नोव्हेंबर, २०१९

### ६६. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे ए.आय.टी., बॅकॉक, थायलंड येथे प्रशिक्षणासाठी प्रस्थान



दि. ९ नोव्हेंबर, २०१९. जागतिक बँक अर्थसहित, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान प्रकल्प नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सुरु करण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत महात्मा

फुले कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर व आचार्य पदवी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधुन प्रशांत घाडगे, मिनीनाथ अनारसे, ऋषिकेश कळमकळ, कु. अंकिता कांबळे, विजय राऊत, कु. कोमल चव्हाण, संदिप भुसारी, मयुरी जगदाळे, अजीत मगर, विलास घुले, हर्षवर्धन मार्कड, सचिन शिंदे, कृषपाल परिहार, पायल महादुले, अमृता राऊत, सोनाली उबाळे, पंकज घोडके, प्रदिप अंब्रे, कोमल गाडेकर, विद्या खांडेकर असे एकुण २० विद्यार्थ्यांची त्यांच्या आचार्य पदवीचे संशोधन विषयास अनुसरुन ए आय टी, बॅकॉक, थायलंड येथे दि. ११ नोव्हेंबर ते १० डिसेंबर, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली असून त्यांनी प्रशिक्षणासाठी थायलंड येथे प्रस्थान केले आहे. या प्रशिक्षणात विद्यार्थी मृदा स्वास्थ मोजणी, भौगोलिक माहिती प्रणाली, ड्रोन, गुगल अर्थ इंजिन, एकात्मिक जलस्त्रोत व्यवस्थापन, कृत्रिम बुध्दीमत्ता इ. विषयी माहिती या प्रशिक्षणाद्वारे मिळणार असून या माहितीचा उपयोग त्यांच्या कार्यरत असलेल्या कृषि संशोधन कार्यास तसेच भविष्यात शाश्वत कृषि विकासासाठी निश्चितच होईल. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यासोबत महात्मा फुले कृषि विद्यापीठातील मृदा व जलसंधारण विभागातील प्राध्यापक डॉ. अतुल अत्रे हे सुध्दा सहभागी होणार आहेत. पुणे कृषि महाविद्यालयात आयोजीत कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या प्रस्थानवेळी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले. यावेळी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. मंगल पाटील यांनी तर डॉ. रविंद्र आंधळे यांनी आभार मानले. या प्रसंगी कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल मासळकर, कृषि महाविद्यालय, पुणेचे विस्तार शिक्षण विभागाचे प्राध्यापक डॉ. सुभाषचंद्र शिंदे, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे, विद्यापीठाचे नियोजन अधिकारी डॉ. नांदगुडे, डॉ. अतुल अत्रे, अधिदान व लेखा अधिकारी श्री. सुर्यकांत शेजवळ आदी उपस्थित होते.

### ६७. डॉ. मिलिंद अहिरे यांची भारत सरकारच्या लिप प्रशिक्षण कार्यक्रमासाठी निवड

दि. ११ नोव्हेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे यांची भारत सरकारच्या लिप कार्यक्रमासाठी देशातील शास्त्रज्ञ आणि शिक्षण तज्ञातून निवड झाली आहे. ह्या लिप कार्यक्रमाचे प्रायोजक मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार असून आय.आय.टी., खरकपूर आणि कॅम्ब्रीज विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविला जात आहे. देशभरातून फक्त २८ शास्त्रज्ञ/प्राध्यापकांची भारत सरकारने निवड केली आहे. महाराष्ट्र राज्यातून महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि विस्तार आणि संवाद विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे यांची निवड करण्यात आली आहे.

हा लिप प्रशिक्षण कार्यक्रम भारत सरकारचा शिक्षण क्षेत्रातील महत्वकांक्षी कार्यक्रम आहे. या लिप प्रशिक्षण कार्यक्रमातून अद्ययावत ज्ञान असलेले शिक्षण तज्ञ घडविण्याचे कार्य होणार आहे. जेणेकरुन शिक्षण क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल घडवून आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम बनविणे शक्य होणार आहे. यामध्ये निवड झालेल्या प्राध्यापकांना दोन आठवडे आय.आय.टी., खरकपूर येथे तर एक आठवडा कॅम्ब्रीज विद्यापीठात प्रशिक्षण देण्यात आले आहे.

### ६८. बुध्दीमंथन कार्यशाळा संपन्न




दि. १३ नोव्हेंबर, २०१९. पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी विभागाच्या वतीने देशी गायी व म्हशी संवर्धन व सुधारणा या विषयावरील एक दिवसाची विचार मंथन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मेरट येथील केंद्रीय गोवंश अनुसंधान संस्थेचे संचालक डॉ. एन.व्ही. पाटील, कर्नाल येथील राष्ट्रीय पशु अनुवंशीय संशोधन ब्युरोचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. आर. के. पुंन्दीर, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि.) डॉ. श्रीमंत रणपिसे, विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, राष्ट्रीय डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाचे डॉ. पाटील, डॉ. उध्दव भोईटे, परभणी कृषि विद्यापीठाचे डॉ. लोंढे, डॉ. चव्हाण, दापोली कृषि विद्यापीठाचे डॉ. देसाई उपस्थित होते. यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. एन.व्ही. पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. यशवंत फुलपगारे यांनी केले. यावेळी संशोधन

संचालक डॉ. शरद गडाख यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. राहुल देसले यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. उध्दव भोईटे यांनी मानले.

### ६९. कृषि विद्यापीठात २१ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



दि. १४ नोव्हेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या उद्यानविद्या अंतर्गत प्रगत विद्वत प्रशिक्षण केंद्र (फळे) या केंद्रामार्फत फळपिकांवरील राष्ट्रीय समस्या व अडचणी या विषयावरील एकवीस दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. याप्रसंगी व्यासपीठावर संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, सहयोगी अधिष्ठाता (पम) डॉ. यशवंत फुलपगारे, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) तथा उद्यानविद्या विभाग प्रमुख व संचालक, प्रगत विद्वत प्रशिक्षण केंद्र (फळे) डॉ. श्रीमंत रणपिसे आणि कुलसचिव श्री. सोपान कासार उपस्थित होते. यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा मार्गदर्शन करतांना म्हणाले की देशातील फळपिकांच्या एकुण उत्पन्नांपैकी ४० टक्के उत्पादन हे पुरेशा काढणीपश्चात तंत्रज्ञानाच्या वापरा अभावी खराब होते. पर्यायाने शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर होते. हे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी फळपिकातील मुल्यवर्धन तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे. याप्रसंगी डॉ. अशोक फरांदे, डॉ. शरद गडाख व डॉ. श्रीमंत रणपिसे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुमती दिघे यांनी तर आभार डॉ. भगवान ढाकरे यांनी मानले.

### ७०. शेतकरी प्रथम प्रकल्पाचा प्रात्यक्षिक निविष्ठा वितरण कार्यक्रम संपन्न

दि. १४ नोव्हेंबर, २०१९. शेतकरी प्रथम–राष्ट्रीय कृषि विकास प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी मार्फत राहाता तालुक्यातील हसनापूर व हनुमंतगांव येथे शेतकऱ्यांच्या शेतावर



राबविण्यात येत असलेल्या प्रात्यक्षिक निविष्ठा वितरण विद्यापीठाचे संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सदर कार्यक्रमासाठी श्री. सुभाष करीर, प्रगतशील शेतकरी, हनुमंतगांव हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी श्री. जनार्दन घोगरे, प्रगतशील शेतकरी समीर हाजी अब्बास पटेल उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी मार्गदर्शन केले. प्रा. एम.एम. देसाई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व डॉ. एस.बी. अडांगळे यांनी आभार मानले.

### ७१. कर्नाल येथील शास्त्रज्ञाची पटेल यांच्या शेळी प्रकल्पास भेट



दि. १५ नोव्हेंबर, २०१९. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे मेरट येथील केंद्रीय गोवंश अनुसंधान संस्थेचे संचालक डॉ. एन.व्ही. पाटील, कर्नाल येथील राष्ट्रीय पशु अनुवंशीय संशोधन ब्युरोचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. आर.के. पुंन्दीर यांनी राहाता तालुक्यातील हसनापूर गावातील समीर व जमीर पटेल यांचे शेळी प्रकल्पास कुलगुरु डॉ. विश्वनाथा यांचे समवेत भेट दिली. याप्रसंगी संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत फुलपगारे, शेळी प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. संजय मंडकमाले, विषय विशेषज्ञ डॉ. सुनिल अडांगळे उपस्थित होते. यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. सदर भेटी प्रसंगी डॉ. शरद गडाख यांनी शेळी प्रकल्पाच्या आर्थिक उत्पन्न

वाढीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी कोल्हार येथील श्री. संजय राऊत यांच्या अर्थरिच गांडूळ खत प्रकल्पालाही कुलगुरु समवेत या सर्वांनी भेट दिली.

### ७२. व्यक्तिमत्व विकासाकरीता व्यवहारीक कौशल्य या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन संपन्न




दि. १८–१९ नोव्हेंबर, २०१९. भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या आर्थिक सहकार्याने महात्मा फुले कृषि विद्यापीठच्या विस्तार शिक्षण विभाग व गुजरात येथील आनंद कृषि विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिमत्व विकासाकरीता व्यवहारीक कौशल्य या विषयावरील दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे यांच्या हस्ते झाले. यावेळी आनंद विद्यापीठातील विस्तार शिक्षण संस्थेचे या कोर्सचे संचालक डॉ. महेश पटेल यांनी प्रशिक्षणाविषयी विस्तृत माहिती दिली. विस्तार शिक्षण विभागाचे प्राध्यापक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. कृषि महाविद्यालय, पुणे येथील विस्तार शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे यांनी प्रशिक्षणाचे महत्व विषद केले. डॉ. मनोहर धादवड यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. पंडित खर्डे यांनी आभार मानले.

### ७३. कृषि विद्यापीठात अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे मॉडेल प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

दि. १८ नोव्हेंबर, २०१९. भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या आर्थिक सहकार्याने महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागामार्फत आयोजीत फळे व भाजीपाला प्रक्रिया तंत्रज्ञान व त्यांचे मुल्यवर्धन या विषयावरील मॉडेल प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे होते. याप्रसंगी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे




प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. प्रमोद कोटेचा उपस्थित होते. यावेळी डॉ. यशवंत फुलपगारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गोकुळ वामन यांनी केले तर आभार डॉ. प्रमोद कोटेचा यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विस्तार शिक्षण विभागाचे प्राध्यापक डॉ. गोरक्ष ससाणे, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते.

### ७४. कृषि विद्यापीठात महात्मा जोतिबा फुले स्मृतीदिनानिमित्त कार्यक्रम संपन्न



दि. २२ नोव्हेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. प्रल्हाद गोंविदराव लुलेकर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे होते. याप्रसंगी संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, जीव अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कुलसचिव श्री. सोपान कासार, कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजीव नाईक, विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ.मिलिंद अहिरे, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बापुसाहेब भाकरे, विद्यार्थी कल्याण

अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहाण व क्रिडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. यावेळी डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अशोक फरांदे यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कुलसचिव श्री. सोपान कासार यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. शरद गडाख यांनी करुन दिली. सूत्रसंचालन श्री. सुरज कुलकर्णी यांनी तर आभार डॉ. महाविरसिंग चौहान यांनी मानले.

### ७५. मधमाशी पालन, हवामान बदल व शाश्वतता यावर प्रशिक्षणाचे आयोजन



दि. २२–२३ नोव्हेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे जागतिक बँक अर्थसहित, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान प्रकल्प नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्राच्या आर्थिक सहकार्याने मधमाशी पालन, हवामान बदल व शाश्वतता या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, श्री. बी.व्ही. अपुर्वा, कर्नाटक राज्यातील शेती तज्ञ श्री. पी. आर. बद्रीप्रसाद, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे, कृषि अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख व प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, कृषि किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी.एस. पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. सी.एस. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी कास्ट प्रकल्पाविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर अभार प्रकल्प सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे यांनी मानले.

### ७६. शेतीमधील फवारणीसाठी ड्रोनचा वापर यावर कार्यशाळेचे आयोजन



दि. २२ नोव्हेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक बँक अर्थसहित, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान प्रकल्प नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्र या प्रकल्पाच्या वतीने शेतीमधील फवारणीसाठी ड्रोनचा वापर या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यशाळेचे आयोजन सचिव डॉ. सचिन नलावडे यांनी कार्यशाळेबद्दल थोडक्यात माहिती दिली. या कार्यशाळेत श्री. अजीत खर्जुल व डॉ. एस.ए. कदम यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संशोधन सहयोगी डॉ. जी. बी. भणगे यांनी केले.

## डिसेंबर–२०१९

### ७७. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा चौतीसावा पदवीप्रदान समारंभ संपन्न




दि. ५ डिसेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या चौतीसाव्या पदवीप्रदान समारंभाच्या अध्यक्षस्थानी महामहिम राज्यपाल,

महाराष्ट्र राज्य आणि कुलपती, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी मा. श्री. भगत सिंह कोश्यारी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, कुलसचिव सोपान कासार, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलिप पवार याचबरोबर महाराष्ट्र कृषि शिक्षण आणि संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष श्री हरिभाऊ जावळे,विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य आ. श्री. प्रकाश गजभिये, श्री. तुषार पवार, श्री. नाथाजी चौगुले, सौ. सुनिता पाटील, डॉ. पंकजकुमार महाले, श्री दत्तात्रय पानसरे, सौ कीर्ती जमधाडे, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख आणि विद्या शाखेचे उपकुलसचिव श्री. पी.टी. सुर्यवंशी उपस्थित होते.

यावेळी मा. श्री. भगत सिंह कोश्यारी मार्गदर्शन करतांना म्हणाले की भारत हा कृषि प्रधान देश असून हा देश शेतकऱ्यांचा आणि कृषि पदवीधरांचा आहे. कृषि पदवीधरांनी शपथ घेतली पाहिजे की आम्ही शेती करु, शेती पुरक उद्योग उभारुन कृषि उद्योजक होऊ आणि रोजगार निर्मिती करु. देशासाठी असे काम करा की आपले उदाहरण इतर लोक देतील. कृषि पदवीधरांनी दृढ निश्चय, अनुशासन आणि प्रामाणिक कष्ट या त्रिसुत्रीचा अवलंब केला तर यश निश्चित मिळेल. यावेळी मा. श्री. भगत सिंह कोश्यारी यांच्या शुभहस्ते पदव्या प्रदान करण्यात आल्या. सन २०१८–१९ मध्ये बी.एस्स.सी (कृषि) पदवीत प्रथम आलेली कु. मोहीनी अशोक जगताप, बी.एस्स. सी (उद्यान विद्या) मध्ये प्रथम आलेली कु. गायत्री पांडुरंग चव्हाण, कृषि अभियांत्रिकीमध्ये प्रथम आलेला अभिजीत राजेंद्र जाधव यांना सुवर्णपदक व इतर यशस्वी विद्यार्थ्यांना पदके प्रदान करण्यात आली.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा यांनी विद्यापीठाचा कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाचा अहवाल सादर केला. सकाळच्या सत्रात महामहिम राज्यपालांनी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रातील प्रदर्शनाला भेट दिली. समारंभाला विद्यापीठाचे विद्या परिषदेचे सदस्य, माजी कुलगुरू डॉ किसनराव लवांडे, डॉ व्यंकट मायंदे,अप्पर पोलीस अधिक्षक श्री सागर पाटील,कृषि संचालक कैलास मोते, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री शिवाजीराव जगताप,नियंत्रक विजय कोते, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, कृषिभूषण श्री सुरसिंग पवार,मान्यवर, पत्रकार, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, प्रगतीशील शेतकरी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बापुसाहेब भाकरे आणि डॉ. आनंद सोळंके यांनी केले.

## ७८. कृषि विद्यापीठात राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन




दि. ६ डिसेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि विस्तार व प्रसारण विभाग आणि महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटी, अकोला यांचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय न पोहचलेल्या पर्यंत पोहचून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषि विस्तार या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे सभागृहात करण्यात आले आहे. यावेळी झालेल्या उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन केंद्र शासनाच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणाऱ्या कमिटीचे अध्यक्ष डॉ. अशोक दलवाई उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आर.आर. सिन्हा, बंगलोर कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. के. नारायण गौडा, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे अटारीचे संचालक डॉ. लाखन सिंग, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. एल.बी. कलंत्री, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, परिसंवादाचे आयोजन सचिव व कृषि विस्तार शिक्षण व प्रसारण विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. अशोक दलवाई मार्गदर्शन करतांना म्हणाले की १९२० साली भारताने कृषि विस्ताराची संकल्पना प्रत्यक्षात आणली. राज्यस्थान व उत्तर प्रदेश या दोन राज्यात राष्ट्रीय कम्युनिटी ब्लॉकद्वारे कृषि विस्ताराचे कामाला योग्य दिशा मिळून समाजाचा आर्थिक स्तर उंचावला. राष्ट्रीय कृषि तंत्रज्ञान प्रकल्प, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा यांच्या माध्यमातून संशोधनाचा विस्तार शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्याने त्यांचे उत्पन्न वाढून त्यांचे जीवनमान उंचावले. याप्रसंगी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, डॉ. लाखन सिंग, डॉ. आर.आर. सिन्हा व डॉ. के. नारायण गौडा यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीच्या वतीने डॉ. आर.आर. सिन्हा व कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. मराडी यांना यमुनाबाई सावंत पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे कुलसचिव श्री. सोपान कासार, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख तसेच माजी संचालक, विस्तार शिक्षण विभागातील प्राध्यापक, राष्ट्रीय परिसंवादासाठी देशभरातून आलेले २०० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. ए.बी. कलंत्री यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सुर्यवंशी यांनी तर आभार डॉ. गोरक्ष ससाणे यांनी मानले.

### ७९. कृषि विद्यापीठात राष्ट्रीय परिसंवादाचा समारोप संपन्न




दि. ७ डिसेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि विस्तार व प्रसारण विभाग आणि महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटी, अकोला यांचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय न पोहचलेल्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषि विस्तार या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या समारोप प्रसंगी झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन पोपटराव पवार उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. याप्रसंगी व्यासपीठावर केंद्र शासनाच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणाऱ्या कमिटीचे अध्यक्ष डॉ. अशोक दलवाई, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आर.आर. सिन्हा, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. एल.बी. कलंत्री, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, परिसंवादाचे आयोजन सचिव व कृषि विस्तार शिक्षण व प्रसारण विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे उपस्थित होते.

डॉ. अशोक दलवाई आपल्या मार्गदर्शनात म्हणाले, तंत्रज्ञान न पोहचलेल्या शेतकऱ्यांपर्यत तंत्रज्ञानाची माहिती पोहचविण्यासाठी माहिती–तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करणे गरजेचे आहे. वाणाची उत्पादन क्षमता आणि शेतकऱ्यांनी काढलेले उत्पादन यातील दरी कशी कमी करता येईल यासाठी प्रयत्न करणे, यासाठी प्रभावी विस्तार यंत्रणा असणे गरजेचे आहे. कृषि पदवीधरांनी जीथे असाल तेथे त्या गावात बदल घडवून आणावा. यावेळी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, श्री. पोपटराव पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सन २०१७ व २०१८ या वर्षांच्या सर्वोत्कृष्ट शास्त्रीय लेखासाठी अनुक्रमे डॉ. एस.व्ही. करंजे व डॉ. रेखा तिवारी यांना गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट लेख सादरीकरणामध्ये विद्यार्थी गटात पहिले, दुसरे व तीसरे पारितोषीक अनुक्रमे पी.यु. राठोड, डॉ. आनंद, संतोष पठाडे यांना तर उत्कृष्ट संशोधनावर आधारीत लेख सादरीकरणामध्ये शास्त्रज्ञ गटात पहिले, दुसरे व तीसरे पारितोषीक अनुक्रमे डॉ. पंडित खर्डे, डॉ. एस.जी. पुरी व डॉ. पी.एस. कापसे यांना मिळाले. उत्कृष्ठ पोस्टर सादरीकरणासाठी पहिले पारितोषीक आर.जी. नय्यर तर दुसरे पारितोषीक वीणा एस. जाधव यांना मिळाले. उत्कृष्ठ दृकश्राव्य साधनांचा वापर या गटात प्रथम पारितोषीक जी.पी. चव्हाण यांना तर दुसरे पारितोषीक साई श्री यांना मिळाले. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. ए.बी. कलंत्री यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. पंडित खर्डे यांनी मानले.

### ८०. भारत मौसम विज्ञान विभाग, नवी दिल्ली यांच्या बरोबर सामंजस्य करार संपन्न



दि. १० डिसेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि भारत मौसम विज्ञान विभाग, नवी दिल्ली यांच्यामध्ये पुढील पाच वर्षाकरीता ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्पाचा सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामुळे ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्पाअंतर्गत शेतकर्यांकरीता हवामान आधारीत कृषि सल्ला बनविण्याचे काम करण्यात येणार आहे.

सामंजस्य करारावर महात्मा फुले कृषि विद्यापिठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख व कृषि मौसम संभाग भारत मौसम

विज्ञान विभाग, नवी दिल्लीचे प्रमुख डॉ. के. के. सिंह यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी केली. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे अधिष्ठता डॉ. अशोक फरांदे, डॉ. आनंद सोळंके, डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. जयवंत जाधव व डॉ. रवी आंधळे उपस्थित होते.

### ८१. रिलायंन्स फाऊंडेशन बरोबर सामंजस्य करार



दि. १८ डिसेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि रिलायंन्स फाऊंडेशन यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठामधील आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, शिफारशी शेतकरी बांधवांपर्यंत पोहचविण्यासाठी या सामंजस्य करारामुळे मदत होणार आहे. सामंजस्य करारावर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख व रिलायंन्स फाऊंडेशनचे मुख्य वित्त अधिकारी श्री. सचिन मार्डीकर यांनी स्वाक्षरी केली.

विद्यापीठासोबत सामंजस्य करार केल्यामुळे विद्यापीठाचे तंत्रज्ञान प्रसारास मदत होणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यामध्ये घेण्यात येणाऱ्या ऑडिओ कॉन्फरंन्स, व्हीडिओ कॉन्फरंन्स, जिओ चॅट प्रोग्राम, युट्युब लाइव्ह प्रोग्राम, किड व रोग चिकित्सा कार्यक्रमामध्ये तज्ञ म्हणुन संबंधीत जिल्ह्यातील विषयतज्ञ, शास्त्रज्ञ, विभाग प्रमुख यांचे सहकार्य लाभणार आहे. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे, कोल्हापूर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. गजानन खोत, कुलसचिव श्री. सोपान कासार, नियंत्रक श्री. विजय कोते, डॉ. आनंद सोळंके, डॉ. तानाजी नरुटे, डॉ. बापुसाहेब भाकरे, डॉ. अशोक पिसाळ, रिलायंन्स फाऊंडेशनच्या माहिती सेवा विभागाचे महाराष्ट्र विभाग प्रमुख श्री. दिपक केकाण, माहिती सेवा विभागाचे मॅनेजर श्री. संदिप गुंजाटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. दिपक केकाण यांनी रिलायंन्स फाऊंडेशन–माहिती सेवा विषयी उपस्थितांना माहिती दिली. श्री. सचिन मार्डिकर यांनी रिलायंन्स फाऊंडेशन तर्फे कृषि, शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात राबविले जाणारे विविध उपक्रम या विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार श्री. संदिप गुंजाटे यांनी मानले.

### ८२. सुक्ष्म सिंचन पध्दतीच्या नियोजन व रचनेवर दोन दिवसीय कार्यशाळा



दि. २–३ डिसेंबर, २०१९. हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र अंतर्गत पुणे येथील राष्ट्रीय जल अकादमी येथे सुक्ष्म सिंचन पध्दतीच्या नियोजन व रचनेवर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन राष्ट्रीय जल अकादमीचे प्रमुख श्री. योगेश पैठणकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विद्यान व तंत्रज्ञान केंद्राचे प्रमुख समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, सहा. प्राध्यापक डॉ. पी.जी. पोपळे, संशोधन सहाय्यक डॉ. ए.डी. भगत उपस्थित होते.

## जानेवारी–२०२०

### ८३. कृषि विद्यापीठात आविष्कार स्पर्धेचे आयोजन



दि. १९ जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या पदव्युत्तर महाविद्यालयाने आयोजीत केलेल्या

आंतरमहाविद्यालयीन संशोधनावर आधारीत आविष्कार स्पर्धा सन २०१९–२० चे उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. राजीव नाईक, रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. तानाजी नरुटे, कृषि किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. चिदानंद पाटील, आंतर जलसिंचन व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. महानंद माने, स्पर्धेसाठी नियुक्त केलेले निरीक्षण अधिकारी डॉ. अतुल अत्रे, उप संशोधन संचालक डॉ. बाबासाहेब माळी, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहान, पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राहुल देसले, स्पर्धेचे संयोजक डॉ. प्रकाश लोखंडे, क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. यावेळी डॉ. यशवंत फुलपगारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. महाविरसिंग चौहान यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दिलीप गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. राहुल देसले यांनी मानले.

### ८४. शेतकरी प्रथम प्रकल्पाला मान्यवरांच्या भेटी



दि. ३ जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राबवत असलेल्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या विविध प्रात्यक्षिकांना मान्यवरांनी भेटी दिल्या. पुणे येथील अटारी केंद्राचे संचालक डॉ. लाखन सिंह, कानपूर येथील अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. आर.के. सिंह, बाभळेश्वर कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संभाजी नालकर तसेच गुजरात आणि महाराष्ट्र राज्यातील कृषि विज्ञान केंद्राचे तीस शास्त्रज्ञांनी प्रात्यक्षिकांना भेटी दिल्या. सर्वप्रथम शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत चिंचविहिरे आणि कणगर गावात राबवत असलेल्या पीक प्रात्यक्षिके आणि उपक्रमांची माहिती दिली.

या भेटी दरम्यान मान्यवरांनी श्री. अभिजीत गिते यांच्या तूर पिकाचा फुले राजेश्वरी वाणाचे प्रात्यक्षिक पाहिले. श्री. मच्छिंद्र शेटे यांच्या सहा एकर डाळिंब भगवा वाणाच्या प्लॉटला भेट दिली. यानंतर श्री. स्वामी समर्थ बचत गटाच्या मिनी डाळमिल उद्योगाची पाहणी केली. शेवटी श्री. दिलीप नालकर यांच्या एकात्मिक शेती पध्दतीच्या मॉडेलमध्ये रब्बी ज्वारी–फुले अनुराधा, तूर–फुले राजेश्वरी, चारा पिके, डाळिंब लागवड, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, परसबागेतील कुक्कुटपालन, मूर घास आणि गांडुळ खत या उपक्रमांना भेटी दिल्या. संचालक डॉ. लाखन सिंह यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर श्री. विजय शेडगे यांनी आभार मानले.

### ८५. कृषि विद्यापीठात भारतीय कृषि अभियंत्यांच्या ५४ व्या वार्षिक परिषदेची सुरुवात



दि. ७ जानेवारी, २०२०. विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि भारतीय कृषि अभियंता संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अभियंता संस्थेची ५४ वी वार्षिक परिषद व कृषितील कृत्रिम बुध्दिमत्ता आधारीत तंत्रज्ञान या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिसंवादाची सुरुवात पुणे येथे दिनांक ७ जानेवारी रोजी करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, आय.आय.टी. खरगपूरचे संचालक डॉ. व्ही.के. तिवारी, अमेरिका येथील जॉन डियरचे संचालक श्री. जॉन रिड, अमेरिका येथील कनेक्टिकट विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. इंद्रजीत चौबे, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अभियंता संस्थचे अध्यक्ष डॉ. इंद्रामनी मिश्रा, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, अध्यक्षा कृषि अभियंता संस्था मलेशीया श्रीमती रोशन बिंत्ती, कृषि अभियंता संस्था नायजेरीयाचे अध्यक्ष श्री. तहीये तहीनसे, कृषि अभियंता संस्था नेपाळचे अध्यक्ष देवराज निरुला, भारतीय कृषि अभियंता संस्थेचे सरचिटणीस मनोज खन्ना, डॉ.

अण्णासाहेब शिंदे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता व अभियंता परिषदेचे समन्वयक डॉ. दिलीप पवार, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख व आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार उपस्थित होते.

यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. व्ही.के. तिवारी म्हणाले की सन २०२४ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था पाच ट्रीलीयन ड्रालर एवढी वाढविण्यामध्ये भारतातील सर्व शिक्षण व मानव संशाधन संस्था उपयुक्त ठरणार आहेत. उद्घाटन दरम्यान डॉ. इंद्रमणी मिश्रा, डॉ. जॉन रीड, डॉ. इंद्रजीत चौबे, श्रीमती रोशन बींत्ती, श्री. ताईये व श्री. देवराज निरुला यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी नायजेरीया, मलेशिया व नेपाळ या देशांच्या कृषि अभियंता संस्थांचे भारतीय कृषि अभियंता संस्थेबरोबर सामजंस्य करार करण्यात आले. भारतीय कृषि अभियंता परिषदेचे समन्वयक डॉ. दिलीप पवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन डॉ. मुकुंद शिंदे यांनी केले.

### ८६. मागोवा-२०१९ कार्यक्रम उत्साहात संपन्न




दि. ११ जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठात मागोवा-२०१९ आणि छायाचित्र प्रदर्शन या कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे कृषि, माजी सैनिक कल्याण मंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे महसुल मंत्री मा. ना. श्री. बाळासाहेब थोरात उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा, कार्यकारी परिषदेचे सदस्य आ. श्री. प्रकाश गजभिये, आ. प्रा. लहुजी कानडे, महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे मा. श्री. विश्वजीत माने (भा.प्र.से.), महाराष्ट्र राज्याचे संचालक, कृषि प्रक्रिया व नियोजन, निविष्ठा, गुणवत्ता नियंत्रण, मा. श्री. विजय घावटे, अहमदनगर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री. प्रतापराव शेळके, बाळासाहेब आढाव, ज्ञानदेव वाफारे, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संचालक संशोधन व विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. सोपान कासार, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके उपस्थित होते.

यावेळी मा. ना. श्री. दादाजी भुसे मार्गदर्शन करतांना म्हणाले की सध्याची शेती निसर्गावर, पर्यावरणावर आवलंबून आहे. वातावरणातील बदलामुळे येणारे रोग, वेळेवर न येणारा पाऊस, गारपिट अशा आव्हाणात्मक परिस्थितीत पिकविलेल्या मालाला योग्य बाजारभाव न मिळणे अशा सर्व संकटातून आजचा शेतकरी जात आहे. अशाही परिस्थितीत काही शेतकरी विद्यापीठातील संशोधनाच्या मदतीने स्वतः संशोधन करुन वेगवेगळ्या पिकांच्या वाणांची निर्मिती करीत आहे. ही खुप विशेष अशी दखल घेण्याजोगी गोष्ट असून अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. बाळासाहेब थोरात, विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य आ. प्रकाश गजभिये यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या निमित्ताने विद्यापीठाचे लोकप्रिय प्रकाशन ङ्कृषिदर्शनी २०२०ङ् चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. या प्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाची कृषि मार्गदर्शिका-२०२०, महात्मा फुले कृषि विद्यापीठ उपलब्धी- २०१९, एम.पी.के.व्ही. ॲट ए ग्लान्स या प्रकाशनाचे आणि विद्यापीठाच्या वेबसाईटचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी केले. संचालक संशोधन डॉ. शरद गडाख यांनी संशोधनाचा आढावा व सन २०१९ चा विस्तार शिक्षणाचा आढावा सादर केला. अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे यांनी शिक्षणाचा आढावा, कुलसचिव श्री. सोपान कासार यांनी प्रशासनाचा आढावा सादर केला. सकाळच्या सत्रात महात्मा फुले कृषि विद्यापीठ व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ज्वारी सुधार प्रकल्प येथे रब्बी पिके तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावा, शिवार फेरी आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी माजी संचालक विस्तार शिक्षण डॉ. किरण कोकाटे, नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ. व्ही.व्ही. सदामते, कृषि परिषदेचे संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, सर्व सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. साताप्पा खरबडे, डॉ. यशवंत फुलपगारे, डॉ. गजानन खोत, डॉ. विठ्ठलराव शेंडे, अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजीराव जगताप उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद सोळंके यांनी तर आभार डॉ. शरद गडाख यांनी मानले.

## ८७. कृषि विद्यापीठात आंतरराष्ट्रीय कार्यशाळा संपन्न



दि. ११ व १२ जानेवारी, २०२०. जागतिक बँक अर्थसहाय्यित, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठात आधुनिक कृषि व विज्ञान तंत्रज्ञान व्यवस्थापन अंतर्गत हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पातंर्गत एक वर्षाचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास जागतिक बँक व भारतीय कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्ली येथुन मान्यता मिळाली आहे. याच अनुषंगाने पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी विविध विषयांचे अभ्यासक्रम तयार करण्याच्या हेतुने दि. ११ व १२ जानेवारी, २०२० रोजी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम विकास आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या शुभारंभाप्रसंगी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. यावेळी व्यासपीठावर कामधेनु विद्यापीठ गुजरात चे माजी कुलगुरु डॉ. एम. सी. वार्ष्णेय, भारतीय कृषिउदयोग व्यवसाय संघटनेचे सल्लागार डॉ. विश्वनाथ सदामते, माजी विस्तार शिक्षण उपसंचालक, भारतीय कृषि अनुसंधान परिषद नवी दिल्ली व माजी विस्तार संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी कृषि विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. किरण कोकाटे, वाशिंगटन स्टेट विद्यापीठाचे प्राध्यापक, डॉ. डेविड ब्राऊन, शिक्षण संचालक, डॉ. अशोक फरांदे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार व मृदा व रसायन शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. बापुसाहेब भाकरे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी व्यासपीठावर उपस्थित असलेल्या पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक करुन आंतरराष्ट्रीय कार्यशाळेची पार्श्वभुमी विषद केली. यावेळी डॉ. एम.सी. वार्ष्णेय, डॉ. विश्वनाथ सदामते, डॉ. किरण कोकाटे व डॉ. डेविड ब्राऊन यांनी मार्गदर्शन केले.

## ८८. कृषि विद्यापीठात निम्नस्तर कृषि शिक्षण क्रीडा स्पर्धा २०१९–२० संपन्न




दि. १७ जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी कार्यक्षेत्रांतर्गत विद्यापीठ स्तरीय दोन दिवसीय निम्नस्तर कृषि शिक्षण क्रीडा स्पर्धा २०१९–२० च्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे होते. याप्रसंगी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, स्पर्धेचे आयोजक निम्नस्तर कृषि शिक्षणचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष डॉ. राजीव नाईक, जलसिंचन आंतरविद्याशाखेच विभाग प्रमुख डॉ. महानंद माने, सांखिकी विभागाचे प्रमुख डॉ. कलेढोणकर, विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. सुभाषचंद्र शिंदे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहाण, क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. यावेळी डॉ. यशवंत फुलपगारे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. श्रीमंत रणपिसे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. दिलीप पवार व श्री. विजय कोते यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा बाचकर यांनी तर डॉ. जयप्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

## ८९. शेतकरी प्रथम प्रकल्पातंर्गत डाळिंब उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

दि. २० जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाचा डाळिंब उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन कणगर या गावामध्ये करण्यात



आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक व प्रभारी अधिकारी प्रसारण केंद्र डॉ. पंडित खर्डे होते. याप्रसंगी व्यासपीठावर कोरडवाहू प्रकल्पाचे किटकशास्त्रज्ञ डॉ. अशोक वाळुंज, उद्यानविद्या विभागाचे सहाय्यक प्रा. मंजाबापू गावडे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक प्रा. माधव देसाई, कणगर गावचे प्रगतशील शेतकरी श्री. भास्कर वरघुडे व चिंचविहिरे गावचे प्रगतशील शेतकरी श्री. दगडू गिते उपस्थित होते. सदरच्या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रा. मंजाबापू गावडे व किटकशास्त्रज्ञ डॉ. अशोक वाळुंज यांनी डाळिंब पिकाविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन सदाफळ यांनी तर आभार प्रदर्शन विजय शेडगे यांनी मानले.

### ९०. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ७१ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



दि. २६ जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे ७१ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. के.पी. विश्वनाथा म्हणाले की २६ जानेवारी, १९५० साली खऱ्या अर्थाने आपला देश प्रजासत्ताक झाला. आज आपण ७१ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. संशोधनात विद्यापीठाने आत्तापर्यंत विविध पिकांचे २६३ वाण, ३६ अवजारे आणि १५१८ शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केल्या आहेत. कृषि तंत्रज्ञानाच्या प्रभावी विस्तारासाठी कृषि विज्ञान केंद्रे, विभागीय व जिल्हा विस्तार केंद्रे परिश्रमपुर्वक शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्याचा प्रयत्न करत आहेत.

या कार्यक्रमास अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे, कुलसचिव श्री. सोपान कासार, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, हळगाव कृषि महाविद्यालयाचे नोडल ऑफिसर डॉ. विठ्ठलराव शेंडे, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुरक्षा अधिकारी गोरक्ष शेटे यांनी केले तर प्रा. सुनिल फुलसावंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी संचलन करुन मानवंदना दिली.

### ९१. आंतरराष्ट्रीय वैज्ञानीक–विद्यार्थी संवाद कार्यक्रम संपन्न



दि. ११ जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्रांतर्गत राहुरी कृषि विद्यापीठ येथे ड्रोन, यंत्रमानव, कृत्रिम बुध्दी व शेती अवजारे या विषयी आंतरराष्ट्रीय वैज्ञानीक–विद्यार्थी संवादाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या संवादाचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे, पुत्रा विद्यापीठ, मलेशियाचे डॉ. शिवा बालासुंदरम,

मिसिसिपी स्टेट विद्यापीठ, यु.एस.ए.चे डॉ. जी.सी. बोरा, एशियन तंत्रज्ञान संस्था, बँकॉकचे डॉ. मंजुळकुमार हजारिका, वॉशिंग्टन स्टेट विद्यापीठ, यु.एस.ए.चे डॉ. शिंदुजा शंकरन, डॉ. लव खोत, प्रा. डेव्हीड ब्राऊन व हवामान आधारीत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार उपस्थित होते. यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. शिवा के. बालसुंदरम, डॉ. जी.सी. बोरा, डॉ. मंजुळकुमार हजारिका, डॉ. शिंदुजा शंकरन, डॉ. लव खोत, प्रा. डेव्हीड ब्राऊन यांनी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले.

### ९२. पाणलोट क्षेत्रातील जलसंसाधन व्यवस्थापनावर व्याख्यानाचे आयोजन



दि. ४ जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्रांतर्गत विद्यार्थी व पाध्यपकांसाठी पाणलोट क्षेत्रातील जल संसाधन व्यवस्थापनावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणुन पुणे येथील राष्ट्रीय जल आकादमीचे प्रमुख आणि चिफ इंजिनीयर श्री. योगेश पैठणकर होते. याप्रसंगी कास्ट कासमचे प्रमुख समन्वयक डॉ. एस.डी. गोरंटीवार, सह समन्वयक डॉ. एम. जी. शिंदे उपस्थित होते. या व्याख्यानाला प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फेब्रुवारी–२०२०

### ९३. कृषि विद्यापीठात हवामान अद्ययावत शेती या विषयी एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

दि. ७ फेब्रुवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठात हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्प, आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, राहुरी अतंर्गत हवामान अद्ययावत शेती



या विषयी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर वाल्मीचे संचालक डॉ. राजेंद्र पोद्दार, प्रमुख कृषि विद्यावेता पोकरा मुंबईचे श्री. विजय कोळेकर, महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अर्थशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. दादाभऊ यादव, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण, हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. रवि आंधळे उपस्थित होते. यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा, डॉ. राजेंद्र पोद्दार यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाचे उद्देश विषद करुन पाणी व्यवस्थापन या विषयी अधिक माहिती दिली. श्री. विजय कोळेकर यांनी पोकरा प्रकल्पाची माहिती विषद केली. याप्रसंगी प्रकल्प समन्वयक डॉ. आर.पी आंधळे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

### ९४. काटेकोर पाणी व्यवस्थापनः दृष्टीकोन व संधी या विषयी एक दिवसीय सल्लागार कार्यशाळा संपन्न



दि. १२ फेब्रुवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि

विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र सुरु करण्यात आले असून या प्रकल्पांतर्गत काटेकोर पाणी व्यवस्थापन दृष्टीकोन व संधी या विषयी एक दिवसीय सल्लागार कार्यशाळेचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी पोकरा मुंबईचे प्रमुख कृषि विद्यावेत्ता श्री. विजय कोळेकर, कृषि विभाग, महाराष्ट्र राज्याचे कृषि उद्योजक तज्ञ श्री. रफिक नाईकवाडी, कृषिभूषण शेतकरी डॉ. दत्तात्रय वने, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता तथा लायसिमीटर प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. व्ही.एम. खोडके, डॉ. पंजाबराव कृषि विद्यापीठातील जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख तथा लायसिमीटर प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. एस.बी. वडतकर, महात्मा फुले कृषि विद्यापीठातील लायसिमीटर प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. ए.ए. अत्रे, प्रकल्प समन्वयक डॉ. एस.डी. गोरंटीवार, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, वसंतराव मराठवाडा नाईक कृषि विद्यापीठातील जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. एच.डब्लु. आवरी, सहयोगी प्राध्यापक डॉ. एम.एम. देशमुख, डॉ. आर.एस. ठोकळ, डॉ. व्ही.के. इंगळे, डॉ. एस.बी. नांदगुडे, डॉ. ए.अन. मानकर, डॉ. एस.डी. दहीवळकर, डॉ. व्ही.एन. बारई, डॉ. बी.के. गावित, इंजि. संदिप ढेरे आदि कार्यशाळेला उपस्थित होते.

### ९५. कृषि क्षेत्रात ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न




दि. १३ फेब्रुवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यित, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी येथे हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत कृषि क्षेत्रात ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर या विषयी एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन केंद्राच्या सभागृहात करण्यात आले होते. याप्रसंगी असाप ॲग्रीटेक नाशिकचे श्री. अजीत खर्जुल, प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, प्रशिक्षण आयोजक सचिव डॉ. सचिन नलावडे, कार्यक्रम समन्वयक इंजि. योगेश दिघे उपस्थित होते. यावेळी डॉ. एम. जी. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्री. अजीत खर्जुल व इंजि. योगेश दिघे यांनी ड्रोन तंत्रज्ञानाबद्दल मार्गदर्शन केले.

### ९६. सोलापूरच्या मुळेगाव फार्म येथे कृषि यांत्रिकी दिवस साजरा




दि. १४ फेब्रुवारी, २०२०. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत अखिल भारतीय समन्वीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर, कृषि विभाग व आत्मा, सोलापूर आणि कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ आणि सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि यांत्रिकीकरण दिवस आणि सुधारीत कृषि अवजारांचे प्रदर्शण व प्रात्यक्षिके विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूरच्या मुळेगाव फार्म येथे नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. या कार्यक्रमास डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील माजी कुलगुरु डॉ. व्यंकटराव मायंदे हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. या प्रसंगी व्यासपीठावर संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सोलापूर श्री. बसवराज बिराजदार, माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रकाश तुरबठमत, डॉ. अजितकुमार देशपांडे, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बापुसाहेब भाकरे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शेंडे, डॉ. विजय अमृतसागर, कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक प्रा. तुळशीदास बास्टेवाड, कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वनाथ शिंदे, मोहोळ व सोलापूर येथील कृषि विज्ञान केंद्रांचे प्रकल्प समन्वयक डॉ. तानाजी वळकुंडे आणि डॉ. लालासाहेब तांबडे उपस्थित होते.

यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. व्यंकटराव मायंदे, डॉ. शरद गडाख, डॉ. दिलीप पवार व डॉ. प्रकाश तुरबतमठ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### ९७. कृषि विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी




दि. १९ फेब्रुवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठात श्री. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रसिध्द इतिहास संशोधक प्रा. प्रदिप कदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा होते. या प्रसंगी व्यासपीठावर संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालकडॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, हळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शेंडे, कुलसचिव श्री. सोपान कासार, देहुगावचे सरपंच श्री. स्वप्निल काळोखे, क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते. यावेळी प्रा. प्रदिप कदम यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात स्वागत कुलसचिव श्री. सोपान कासार यांनी केले. डॉ. अशोक फरांदे यांनी प्रास्ताविक तर प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. शरद गडाख यांनी करुन दिली.

### ९८. कृषि विद्यापीठात औषधी व सुगंधी वनस्पती या विषयी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन




दि. २० फेब्रुवारी, २०२०. औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, वनस्पती शास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि सुपारी व मसाला विकास निदेशालय, कालिकत (केरळ) यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रामाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन नेव्ही टेक्नो प्रा. लि., पुणेचे संचालक डॉ. जीवन मुरकुटे, पेट्रीकोर इलिक्झॅरीस प्रा.लि., साताऱ्याचे संचालक श्री. ऋषिकेश शिंदे उपस्थित होते. यावेळी वनस्पती शास्त्र विभागातील डॉ. शरद पाध्य, निफाड येथील गहू विशेषज्ञ डॉ. सुरेश दोडके, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी प्रा. प्रसन्न सुराणा उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे श्री. ऋषिकेश शिंदे, डॉ. जीवन मुरकुटे, डॉ. सुरेश दोडके, डॉ. विक्रम कड व डॉ. मनोज माळी यांनी औषधी व सुगंधी वनस्ततींच्या लागवडी संदर्भात मार्गदर्शन केले.

### ९९. कृषि विद्यापीठाच्या पुणतांबा येथील कृषि तंत्र विद्यालयात हरभरा शिवारफेरी व चर्चासत्र संपन्न



दि. २१ फेब्रुवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि तंत्र विद्यालय, पुणतांबा व प्रमुख शास्त्रज्ञ, कडधान्य सुधार प्रकल्प यांचे संयुक्त विद्यमाने एक दिवसीय हरभरा शिवारफेरी व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन पुणतांबा ग्रामपंचायतीचे सरपंच डॉ. धनंजय धनवटे होते. याप्रसंगी व्यासपीठावर कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे, कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश गायकवाड, किटकशास्त्रज्ञ डॉ. चांगदेव वायाळ उपस्थित होते. यावेळी डॉ. नंदकुमार कुटे, डॉ. चांगदेव वायाळ व डॉ. कैलास कांबळे यांनी हरभरा संबंधी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जयप्रकाश गायकवाड यांनी केले.

### १००. कृषि विद्यापीठात सिंचन पाणी व्यवस्थापन : आंतरराष्ट्रीय दृष्टीक्षेप विषयावरील व्याख्यानाचे आयोजन



दि. १४ फेब्रुवारी, २०२०. जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सिंचन पाणी व्यवस्थापन : आंतरराष्ट्रीय दृष्टीक्षेप या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते.

या प्रसंगी व्याख्याते म्हणून आंतरराष्ट्रीय जलसिंचन व निचरा आयोगाचे उपाध्यक्ष तथा आंध्र प्रदेशातील आचार्य एन.जी. रंगा कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. के. येल्ला रेड्डी लाभले होते. यावेळी व्यासपीठावर प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, जल सिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख  डॉ. नरेंद्र फिरके, एकात्मिक जल व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. महानंद माने, प्रा. बी.के. गावित, डॉ. डी.डी. खेडकर, डॉ. दुर्गा रेड्डी उपस्थित होते. यावेळी डॉ. के. येल्ला रेड्डी यांनी नैसर्गिक संसाधनांमधील आव्हाने व संधी या विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले.

### १०१. कृषि विद्यापीठात मेघदूत मोबाईल ॲप विकसीत

दि. २६ फेब्रुवारी, २०२०. भारतीय हवामान विभाग, नवी दिल्ली आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या सहकार्यातून शेतकऱ्यांकरीता मेघदूत हे मोबाईल ॲप विकसीत करण्यात आले आहे. या मेघदूत ॲपमध्ये हवामानाचा अंदाज, मागील हवामान व हवामान आधारीत पिकनिहाय कृषि सल्ला यांची माहिती शेतकऱ्यांना थेट त्यांच्या मोबाईलवर उपलब्ध होते. या ॲपच्या




माध्यमातून मागील १० दिवसांचे हवामान व पुढील ५ दिवसांच्या हवामानाचा अंदाज आणि हवामान अंदाजानुसार कृषि सल्ला अपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक नियोजन करण्यास मोलाची मदत होणार आहे. तरी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मेघदूत या मोबाईल ॲपचा वापर करण्याचे आवाहन ग्रामिण कृषि मौसम सेवा, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याद्वारे करण्यात आले आहे. त्याकरीता गुगल प्ले स्टोअरमधुन मेघदूत मोबाईल ॲप डाऊनलोड करता येऊ शकेल.

### १०२. शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत कृषि अधिकाऱ्यांचा प्रशिक्षण वर्ग संपन्न



दि. १९ फेब्रुवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या वतीने दुग्ध व कुक्कुट उत्पादन आणि पुर्व हंगामी ऊस अधिक भाजीपाला आंतरपिके तंत्रज्ञान या विषयावरील कृषि अधिकारी, कर्मचारी यांच्याकरीता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन माहिती तंत्रज्ञान केंद्राच्या सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर उप विभागीय कृषि अधिकारी, कर्जत येथील श्री.

आर.के. गायकवाड व श्रीरामपूर येथील श्री. संजय काचोळे, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे समन्वयक प्रा. माधव देसाई, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे सह समन्वयक डॉ. सुनिल अडांगळे, तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाच्या तांत्रिक सत्रात डॉ. आनंद सोळंके, डॉ. भरत रासकर, डॉ. कल्पना दहातोंडे, डॉ. दत्तात्रय पाचारणे व डॉ. सुनिल अडांगळे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. माधव देसाई यांनी केले.

### १०३. कृषि विद्यापीठात जागतिक कडधान्य दिन साजरा



दि. १० फेब्रुवारी, २०२०. कृषि विभाग महाराष्ट्र शासन आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कडधान्य दिन कृषि विद्यापीठातील कडधान्य सुधार प्रकल्पात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि उपसंचालक श्री. विलास नलगे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिल पाध्ये, तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे, तंत्र अधिकारी सौ. सपकाळ, सहयोगी प्राध्यापक डॉ. कैलास कांबळे, कडधान्य शास्त्रज्ञ प्रा. लक्ष्मण म्हसे, डॉ. विजय जाधव, डॉ. सचिन सदाफळ उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख, श्री विलास नलगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अनिल पाध्ये, प्रा. लक्ष्मण म्हसे, डॉ. कैलास कांबळे, डॉ. विजय जाधव यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. रायभान गायकवाड यांनी केले तर आभार श्री. महेंद्र ठोकळे यांनी मानले. या कार्यक्रमास शेतकरी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १०४. कृषि विद्यापीठात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

दि. ७ फेब्रुवारी २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठात हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्प, आधुनिक कृषि



विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, राहुरी अतंर्गत हवमान अद्ययावत शेती या विषयी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी वाल्मीचे संचालक डॉ. राजेंद्र पोद्दार, प्रमुख कृषि विद्यावेता पोकरा मुंबईचे श्री. विजय कोळेकर, महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अर्थशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. दादाभऊ यादव, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण, हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, कार्यक्रमाचे सहसमन्वयक डॉ. रवि आंधळे उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी पाणी व्यवस्थापन या विषयी अधिक माहिती दिली. पोकराचे श्री. विजय कोळेकर यांनी पोकरा प्रकल्पाची इतंभूत माहिती विषद केली. याप्रसंगी डॉ. आर.पी आंधळे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन कार्यशाळेची पार्श्वभूमी विषद केली. या प्रसंगी कार्यक्रम समन्वयक डॉ. रवि आंधळे यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

### १०५. बुचकेवाडी येथील प्रक्षेत्रावर राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांची शिवारफेरी



दि. २० फेब्रुवारी २०२०. जागतिक बँक अर्थसहाय्यीत,

राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्र सुरु करण्यात आले असून या प्रकल्पांतर्गत बुचकेवाडी येथे एक दिवसीय शिवारफेरी व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा परिषद सदस्य सौ. आशाताई बुचके होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर धुळे येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, तालुका पंचायत समिती जुन्नर येथील कृषि अधिकारी श्री. विजय खेडकर, श्री. प्रमोद बनकर, इनोव्हेशनचे संचालक श्री. चक्रधर बोरकुटे, लुपिनचे श्री. जोंधळे, बुचकेवाडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री. सुरेश गायकवाड उपस्थित होते. यावेळी डॉ. मिलिंद अहिरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आयोजीत चर्चासत्रात सौ. आशाताई बुचके यांनी स्वागत केले. याप्रसंगी डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी शिवार फेरी व चर्चासत्राची पार्श्वभुमी विषद करुन उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

### १०६. क्षारपड जमिनीचे व्यवस्थापन या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



दि. २४ फेब्रुवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतीक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवि दिल्ली पुरस्कृत येथे हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र सुरु करण्यात आले असून या प्रकल्पांतर्गत दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी सच्छिद्र पाईप निचरा पध्दतीद्वारे क्षारपड जमिनीचे व्यवस्थापन या विषयी प्रशिक्षणाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अणासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार होते. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणुन केंद्रिय क्षारपड मृदा संशोधन संस्था, कर्नालचे कार्यक्रम समन्वयक डॉ. एम.जे. कलेढोणकर उपस्थित होते. याप्रसंगी हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. नरेंद्र फिरके, कृषि संशोधन केंद्र, डिग्रज येथील सहा. प्राध्यापक डॉ. एस.डी. राठोड उपस्थित होते. यावेळी डॉ. कलेढोणकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी स्वागत तसेच प्रशिक्षणाची पार्श्वभुमी विषद करुन प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या विविध कामांची माहिती दिली. डॉ. एस.डी. राठोड यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

## मार्च–२०२०

### १०७. शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत दुग्ध व कुक्कुट उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण वर्ग संपन्न



दि. ११ मार्च, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या वतीने दुग्ध व कुक्कुट उत्पादन तंत्रज्ञान या विषयावरील दूध उत्पादकांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन माहिती तंत्रज्ञान केंद्राच्या सभागृहात करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. यावेळी व्यासपीठावर शेतकरी प्रथम प्रकल्पाचे समन्वयक प्रा. माधव देसाई, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे सह समन्वयक डॉ. सुनिल अडांगळे, प्रा. ए.व्ही. अत्तार उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या तांत्रिक सत्रात डॉ. सुनिल अडांगळे, डॉ. विष्णू नरवडे यांनी मार्गदर्शन केले.

### १०८. कृषि विद्यापीठात कृषि विज्ञान केंद्रांची कृती कार्यशाळा संपन्न

दि. ९ मार्च, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्था, विभाग–८, पुणे यांच्या संयुक्त




विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १७ कृषि विज्ञान केंद्रांची एक दिवसीय कृती कार्यशाळेच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक संशोधन तथा विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी व्यासपीठावर सहयोगी अधिष्ठाता (प.म.) डॉ. यशवंत फुलपगारे, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दादाभाऊ यादव, हळगाव कृषि महाविद्यालयाचे नोडल ऑफिसर डॉ. विठ्ठल शेंडे उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की तंत्रज्ञान विस्तार करण्यासाठी हे फार महत्वाचे व्यासपीठ असून कृषि विद्यापीठाच्या विकसीत तंत्रज्ञानाची पडताळणी करुन शेतकऱ्यांच्या शेतावर तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक घेणे हे कृषि विज्ञान केंद्राचे महत्वाचे कार्य आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे यांनी प्रास्ताविक करुन सर्वांचे स्वागत केले. डॉ. भगवान देशमुख यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. डॉ. गोकुळ वामन यांनी आभार मानले.

### १०९. अखिल भारतीय कृषि विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धेत कृषि विद्यापीठाच्या संघाला उपविजेतेपद



दि. ३ मार्च, २०२०. तिरुपती येथील श्री व्यंकटेश्वरा पशुवैद्यकीय विद्यापीठात नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय कृषि विद्यापीठांच्या क्रीडा स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या संघाने विविध क्रीडा प्रकारात उल्लेखनीय अशी कामगिरी केली. यामध्ये मुलींच्या संघाने टेबल टेनीस व खो–खो यामध्ये अनुक्रमे कांस्य व सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच मुलांच्या संघाने बास्केटबॉल, हॉलीबॉल व कबड्डीमध्ये अनुक्रमे रौप्य, सुवर्ण पदक व कांस्य पदक मिळविले. मैदानी खेळांच्या स्पर्धेत कु. शिल्पा सांगळे हिने ४०० मिटर धावण्याच्या व लांब उडी प्रकारात सुवर्ण पदक मिळविले. कु. शिवानी नाईक हिने १०० मिटर व २०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत अनुक्रमे रौप्य व कांस्य पदक मिळविले. यशराज सावंत या विद्यार्थ्याने ४०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत कास्य पदक मिळविले. ४द१०० मिटर रिले स्पर्धेत मुलींच्या संघाने रौप्यपदक मिळविले. विद्यापीठाच्या संघाबरोबर प्रा. पुष्पशिल शेळके, डॉ. अभिजीत नलावडे व प्रा. राम बोरसे हजर होते. संघाला विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महाविरसिंग चौहान व क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठ संघाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे यांनी अभिनंदन केले.

### ११०. मानोरी येथे शिवार फेरी व चर्चासत्र कार्यक्रम संपन्न



दि. १२ मार्च, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या वतीने मानोरी, ता. राहुरी येथे दुग्ध व कुक्कुट उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शिवार फेरी आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख होते. यावेळी व्यासपीठावर पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे समन्वयक प्रा. माधव देसाई, कृषिभुषण डॉ. दत्तात्रय वने, पत्रकार श्री. राजेंद्र वाडेकर, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे सह समन्वयक डॉ. सुनिल अडांगळे, सरपंच श्री. अब्बासभाई शेख, राहुरी कारखाण्याचे संचालक श्री. उत्तमराव आढाव, डॉ. सचिन सदाफळ प्रा. ए.व्ही. अत्तार उपस्थित होते. यावेळी डॉ. शरद गडाख, डॉ. यशवंत फुलपगारे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रगतशील शेतकरी कृषिभुषण डॉ.

दत्तात्रय वने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत श्री. बाबासाहेब आढाव व प्रास्ताविक प्रा. माधव देसाई यांनी केले.

### १११. राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत घेतलेल्या प्रात्यक्षिकांना कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांची भेट



दि. १७ मार्च, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राद्वारे राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत राहता तालुक्यातील मौजे हसनापूर व हनुमंतगाव येथे घेतलेल्या प्रात्येक्षिकांना कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी भेट देवून पाहाणी केली. यावेळी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक प्रा. माधव देसाई, प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे, डॉ. सचिन सदाफळ, प्रा. ए. व्ही. अत्तार, श्री. सुनिल राजमाने, हनुमंतगाव येथील प्रगतशील शेतकरी श्री. मच्छिंद्र घोलप, हसनापूर येथील शेतकरी श्री. समीर पटेल इ. उपस्थित होते.

### ११२. भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या नवनिर्वाचित शास्त्रज्ञांसाठी राहुरी कृषि विद्यापीठामार्फत प्रशिक्षण संपन्न



दि. १६ मार्च, २०२०. भारतीय कृषि संशोधन परिषद, नवी दिल्ली अंतर्गत राष्ट्रीय कृषि संशोधन व्यवस्थापन अकादमी, हैद्राबाद येथील प्रशिक्षणार्थी कृषि शास्त्रज्ञांच्या गटाने २१ दिवस, दि. २५ फेब्रुवारी ते १६ मार्च, २०२० पर्यंत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणासाठी सहा राज्यातील व विभिन्न विभागाचे कृषि शास्त्रज्ञ राजेश उत्तरेश्वर मोदी, दत्तात्रय अर्जुन अनारसे, मंजुनाथा के, चंदन महाराणा, स्नेहा अधिकारी, शगफ कौकब, प्रियंका अंजोय आणि विनिता रामटेके यांना हैद्राबाद येथून पाठविण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी कृषि विद्यापीठांतर्गत भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पातील राहुरी तालुक्यातील चिंचविहिरे या गावाचा सखोल अभ्यास करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा आणि संचालक विस्तार शिक्षण व संशोधन डॉ. शरद गडाख यांनी त्यांना मार्गदर्शन केले व भविष्यातील कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. स्थानिक समन्वयक व प्रभारी अधिकारी, प्रसारण डॉ. पंडित खर्डे आणि सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख यांचे या प्रशिक्षणादरम्यान शास्त्रज्ञांना मार्गदर्शन लाभले.

### ११३. कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन




दि. १३ मार्च, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, धुळे, शेतकरी प्रथम राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या शेतकरी मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन विद्यापीठाचे संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख उपस्थित होते. यावेळी धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यशवंत फुलपगारे, गहू विशेषज्ञ डॉ. सुरेश दोडके, कृषि विद्यावेत्ता डॉ. मुरलीधर महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. एस.पी. सोनवणे, डॉ. रविंद्र भदाणे, श्री. वैभव सुर्यवंशी, श्री. श्रीराम पाटील, ॲड. प्रकाश पाटील उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. शरद गडाख म्हणाले की ग्रामिण भागातील युवकांनी विज्ञानाचा उपयोग करुन आधुनिक पध्दतीची शेती करावी. कृषि विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी फायद्याचे ठरु शकते. यावेळी डॉ. मुरलीधर

महाजन यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जगदिश काथेपुरी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. धनराज चौधरी यांनी केले.

### ११४. एरोपोनिक्स या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



दि. १७ मार्च, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान तंत्रज्ञान केंद्रांतर्गत विद्यार्थी व प्राध्यपकांसाठी एरोपोनिक्स या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख उपस्थित होते. प्रमुख व्याख्याते म्हणुन कोइम्बतूर येथील बिझनेस इनक्युबेटर आणि टी.बी.आय इनक्युबेटीचे इंजि. के. प्रभु सन्कार उपस्थित होते. याप्रसंगी  कास्ट कासमचे प्रमुख समन्वयक डॉ. एस.डी. गोरंटीवार, सह समन्वयक डॉ. एम. जी. शिंदे, डॉ. व्ही.पी कड उपस्थित होते. या व्याख्यानाला प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ११५. कुलगुरु आणि अधिष्ठाता यांची अमेरीका येथील वाशिग्टन विद्यापीठाला भेट




दि. ६-१४ मार्च, २०२०. मा. कुलगुरू, डॉ. के.पी. विश्वनाथा आणि डॉ. ए. एल. फरांदे, अधिष्ठाता (कृषि) यांनी मार्च ०६-१४, २०२० दरम्यान वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी (डब्ल्यूएसयू), पुलमन, यूएसए येथे वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी (डब्ल्यूएसयू) आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्यातील सामंजस्य करार (एमओयू) स्वाक्षरी करणे आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीच्या प्राध्यापकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या एक्सचेंज प्रोग्रामविषयी चर्चा करण्यासाठी तसेच हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तत्रंज्ञान केंद्र, या प्रकल्पांतर्गत डब्ल्यूएसयू, यूएसए सह सहयोगात्मक आणि सँडविच प्रोग्रामच्या संधींचा शोध घेण्यासाठी अमेरीका येथील वाशिग्टन विद्यापीठाला भेट दिली.

## ६. पारितोषिके/पुरस्कार

### १. कुलगुरु डॉ. विश्वनाथा कर्नलपदाने सन्मानित



दि. २२ मे, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांना केंद्र सरकारच्या संरक्षण विभागातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने प्रतिष्ठेचे समजले जाणारे मानद कर्नलपद प्रदान करण्यात आले. विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात अतिरिक्त महासंचालक, मेजर जनरल गजेंद्र प्रसाद, युद्धसेवा मेडल, विशिष्ट सेवा मेडल, अतिरिक्त महासंचालक, महाराष्ट्र, राष्ट्रीय छात्र सेना यांचे हस्ते कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांना बॅटन व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. तसेच मा. कुलगुरु यांना कर्नलपदाची विधीवत वस्त्रे परिधान करण्यात आली. या विद्यापीठातील कुलगुरुंना सलग चार वेळा अशा प्रकारची पदवी देऊन गौरविण्यात आले. आजपर्यंत कृषि विद्यापीठाच्या सहकार्याने राष्ट्रीय छात्र सेनेची जिल्हास्तरीय १० शिबीरे व १ राष्ट्रीय एकात्मता शिबीर घेण्यात आली आहेत.

याप्रसंगी औरंगाबाद विभागाचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर एस.एस. मोहिते, अहमदनगर १७ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल जीवन झेंडे, विद्यापीठाचे संचालक शिक्षण डॉ. अशोक फरांदे, संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव सोपान कासार, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. प्रकाश तुरबतमठ, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. राजेंद्र केंघे यांनी सुत्रसंचालन केले. कुलसचिव सोपान कासार यांनी आभार मानले. डॉ. अवधुत वाळुंज यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या उत्कृष्ट संचालनाबरोबरच छात्रसेनेच्या हम सब भारतीय है या गीताला उपस्थितांनी दाद दिली.

### २. कुलगुरू डॉ. के.पी. विश्वनाथा प्रा. एस. कन्नईयन स्मृती पुरस्काराने सन्मानित



दि. २५ सप्टेंबर, २०१९. राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा यांना पाँडेचेरी विद्यापीठात नॅशनल अॅकेडमी ऑफ बायोलॉजीकल सायन्सेसतर्फे त्यांनी केलेल्या शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यातील योगदानासाठी प्रा. एस. कन्नईयन स्मृती पुरस्कार–२०१८ देऊन गौरविण्यात आले आहे. पाँडेचेरी विद्यापीठात आयोजित अकराव्या एन.ए.बी.एस. च्या राष्ट्रीय परिषदेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारामध्ये स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्रकाचा समावेश आहे. पाँडेचेरी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. गुरमीत सिंग, चेन्नई येथील मद्रास विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. पी. दुराईस्वामी, प्रा. डॉ. पी.पी. माथुर यांच्या उपस्थितीत समन्वयक, आंतरराष्ट्रीय जैव विविधता तथा पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरण, केंद्रशासन, नवी दिल्लीचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. आर.आर. हंचीनल यांच्या हस्ते कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### ३. कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



दि. २०–२२ ऑक्टोबर, २०१९. राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा यांना आस्था फौन्डेशनच्या वतीने दिल्या जाणारा जीवन गौरव पुरस्कार हैद्राबाद

येथे झालेल्या ग्रीसास–२०१९ या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या कार्यक्रमात देण्यात आला. पुरस्कारामध्ये स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्रकाचा समावेश आहे. आस्था फौन्डेशनच्या कार्यकारी कमिटीने कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांनी रोप पैदास विषयात दिलेल्या सर्वोच्च योगदानाबद्दल ग्रीसास–२०१९ या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या कार्यक्रमात देण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात आस्था फौन्डेशनचे अध्यक्ष डॉ. एस.पी. सिंग व सामान्य सचिव एस. रानी यांच्या हस्ते कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांना देण्यात आला.

### ४. कुलगुरू डॉ.के.पी. विश्वनाथा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित




दि. ६–७ डिसेंबर, २०१९. राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथा यांना महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीच्या वतीने कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांना त्यांनी केलेल्या शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यातील योगदानासाठी जीवन गौरव पुरस्कार–२०१९ देऊन गौरविण्यात आले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि विस्तार व प्रसारण विभाग आणि महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटी, अकोला यांचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय न पोहचलेल्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषि विस्तार या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले होते. त्यावेळी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारामध्ये स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्रकाचा समावेश आहे. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कोरडवाहू क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक दलवाई, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आर.आर. सिन्हा, बंगलोर कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. के. नारायण गौडा, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे अटारीचे संचालक डॉ. लाखन सिंग, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. एल.बी. कलंत्री यांच्या उपस्थितीत कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### ५. डॉ. मिलिंद अहिरे यांना उत्कृष्ट कृषि विस्तार शास्त्रज्ञ म्हणुन पुरस्कार प्रदान




दि. ६–७ डिसेंबर, २०१९. राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण विभाग प्रमुख आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषदेसाठी विद्यापीठाचे समन्वयक अधिकारी डॉ. मिलिंद अहिरे यांना महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीच्या वतीने राष्ट्रीय परिसंवादात उत्कृष्ट कृषि विस्तार शास्त्रज्ञ म्हणुन गौरविण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात नुकतास संपन्न झालेल्या कृषि विस्तार आणि प्रसारण विभागाच्या राष्ट्रीय परिसंवादामध्ये विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. डॉ. मिलिंद अहिरे यांनी केलेल्या शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यातील योगदानासाठी उत्कृष्ट कृषि विस्तार शास्त्रज्ञ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पुरस्कारामध्ये स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्रकाचा समावेश आहे. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कोरडवाहू क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक दलवाई, महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष श्री. पोपटराव पवार, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आर.आर. सिन्हा, बंगलोर कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. के. नारायण गौडा, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे अटारीचे संचालक डॉ. लाखन सिंग, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. एल.बी. कलंत्री यांच्या उपस्थितीत डॉ. मिलिंद अहिरे यांना उत्कृष्ट कृषि विस्तार शास्त्रज्ञ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### ६. डॉ. बापुसाहेब भाकरे यांची कौंसिलरपदी निवड

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. बापुसाहेब दशरथ भाकरे यांची इंडियन सोसायटी ऑफ सॉईल सायन्स, नवी दिल्लीच्या कौंसिलरपदी भारतातील ३० उमेदवारांमधून प्रथम क्रमांकाने निवड झाली आहे.



याबाबत अधिकृत घोषणा बनारस हिंदु विश्वविद्यालय, वाराणसी, उत्तर प्रदेश येथे झालेल्या वार्षिक कार्यशाळेमध्ये करण्यात आली. इंडियन सोसायटी ऑफ सॉईल सायन्स ही भारतातील मृदविज्ञान विषयातील अग्रगण्य संस्था असून त्यांच्या मार्फत इंडियन जर्नल ऑफ सॉईल सायन्स हे त्रैमासिक सुध्दा चालविले जाते. ज्यामध्ये मृदविज्ञान विषयातील संशोधनावर आधारीत लेख प्रसिध्द होतात. या सोसायटीचे भारतात एकूण ५३ विभाग आहेत. भारतातून सर्वाधिक मताधिक्याने निवडून येणारे डॉ. बापुसाहेब दशरद भाकरे हे महाराष्ट्रातील पहिले व्यक्ती ठरले आहे. डॉ. बापुसाहेब भाकरे यांची इंडियन सोसायटी ऑफ सॉईल सायन्स, नवी दिल्लीच्या कौंसिलरपदी निवड झाल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन संचालक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख तसेच विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### ७. डॉ. पंडित खर्डे यांना उत्कृष्ट संशोधन लेख सादरीकरणामध्ये प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान




दि. ६-७ डिसेंबर, २०१९. राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे यांना कृषि विस्तार शिक्षणाच्या राष्ट्रीय परिसंवादात कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा आणि आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष श्री. पोपटराव पवार यांचे हस्ते उत्कृष्ट संशोधन लेख सादरीकरणाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि विस्तार व प्रसारण विभाग आणि महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटी, अकोला यांचे संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय न पोहचलेल्या शेतकऱ्यांपर्यंत पाहचून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषि विस्तार या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. समारोप समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारामध्ये स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्रकाचा समावेश आहे. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कोरडवाहू क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक दलवाई, कुलगुरु डॉ. के.पी. विश्वनाथा, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आर.आर. सिन्हा, महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष श्री. पोपटराव पवार, संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, महाराष्ट्र विस्तार शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष कॅप्टन डॉ. एल.बी. कलंत्री आणि विस्तार शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे यांच्या उपस्थितीत डॉ. पंडित खर्डे यांना उत्कृष्ट संशोधन लेख सादरीकरणाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### ८. शेतकरी प्रथम प्रकल्पातील महिला शेतकरी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत



दि. १ सप्टेंबर, २०१९. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राबवत असलेल्या नवी दिल्लीच्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाच्या सहभागी महिला शेतकरी सौ. सविता वैभव नालकर यांना भारतीय कृषि अनुसंधान परिषद-राष्ट्रीय कृषि अनुसंधान प्रबंध अकॅडमी (नार्म), राजेंद्रनगर, हैद्राबाद यांच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. राष्ट्रीय कृषि अनुसंधान प्रबंध अकॅडमी (नार्म), हैद्राबाद या संस्थेच्या ४४ व्या स्थापना दिवस दिनांक १ सप्टेंबर, २०१९ रोजी साजरा करण्यात आला. याचे औचित्य साधून नार्म संस्थेतर्फे शेतीमध्ये नविन उपक्रम राबवून शेती फायदेशीर करणाऱ्या शेतकऱ्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये मौजे चिंचविहिरे, ता. राहुरी, जि. अहमदनगर येथील महिला शेतकरी सौ. सविता वैभव नालकर यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

पुरस्काराचे वितरण नवी दिल्ली, महासंचालक भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे डॉ. त्रिलोचन मोहपात्रा यांच्या हस्ते हैद्राबाद या ठिकाणी प्रदान करण्यात आला. या प्रसंगी नार्म संस्थेचे संचालक डॉ.

सी.एच. श्रीनिवासराव, सहसंचालक, डॉ. एस.के. सोम, डॉ. भारत सोनटक्की, डॉ. वेंकटेश व भारत सरकारचे पद्मश्री पुरस्कार विजेते शेतकरी श्री. वाय. व्यंकटेश्वर राव उपस्थित होते.

### ९. कृषि विद्यापीठाच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाला पुरस्कार



दि. ३ जानेवारी, २०२०. महात्मा फुले कृषि विद्यापीठ राबवत असलेल्या नवी दिल्लीस्थित भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाला वार्षिक आढावा बैठकीत पुरस्कार प्राप्त झाला आहे. प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी या बैठकीत सादर केलेल्या अहवालासाठी सर्वोत्कृष्ट सादरीकरण पुरस्काराने गौरविण्यात आले. कृषि विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे आयोजीत या वार्षिक आढावा बैठकीसाठी गुजरात आणि महाराष्ट्र राज्यातील राहुरी, जुनागड आणि नवसारी येथील शेतकरी प्रथम प्रकल्पांचे सादरीकरण झाले. पुणे अटारी केंद्राचे संचालक डॉ. लाखनसिंह आणि कानपुर येथील अर्थशास्त्राचे निवृत्त विभाग प्रमुख डॉ. आर.के. सिंह यांचे शुभहस्ते प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ, श्री. विजय शेडगे आणि श्री. किरण मगर यांनी पुरस्काराचे प्रशस्तीपत्र स्विकारले. यावेळी बाभळेश्वर कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संभाजी नालकर, गुजरात आणि महाराष्ट्र राज्यातील कृषि विज्ञान केंद्रांचे शास्त्रज्ञ उपस्थित होते.

### १०. बियाणे तंत्रज्ञान संशोधन केंद्राचा उत्कृष्ट केंद्र पुरस्कार



दि. ७–९ एप्रिल, २०१९. हरियाणा, हिस्सार येथील सी.सी. एस. हरियाणा कृषि विद्यापीठ येथे अखिल भारतीय समन्वयीत संशोधन प्रकल्पा अंतर्गत राष्ट्रीय बियाणे प्रकल्पाचे वार्षिक बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बियाणे तंत्रज्ञान संशोधन केंद्राला उत्कृष्ठ केंद्र म्हणुन पुरस्कार देण्यात आला. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. त्रिलोचन महापात्रा यांच्या हस्ते हा पुरस्कार बियाणे संशोधन अधिकारी डॉ. व्हि.आर. शेलार, कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. ए.व्ही. सोळंके, डॉ. सी.बी. साळुंखे यांनी स्वीकारला.

### ११. पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रास उत्कृष्ट केंद्र पुरस्कार



दि. १४ ते १६ ऑक्टोबर, २०१९. ऊस संशोधनातील कामगिरीसाठी सन २०१८–१९ या वर्षाचा उत्कृष्ठ केंद्र पुरस्कार महात्मा फुले कृषि विद्यापीठातंर्गत कार्यरत असलेल्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव या केंद्रास मिळाला आहे. धारवाड कर्नाटका येथे झालेल्या ऊस पिकाच्या वार्षिक गृप बैठकीमध्ये मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर यांना भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील व्यापारी पिके विभागाचे सहा. महासंचालक डॉ. आर.के. सिंग व लखनौ येथील ऊस संचालक व प्रकल्प समन्वक डॉ. ए.डी. पाठक यांच्या हस्ते देण्यात आला.

# ७. मनुष्यबळ

## ७.१ कार्यकारी अधिकारी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा. कुलपती | श्री. विद्यासागर राव | ३० ऑगस्ट, २०१४ ते ४ सप्टेंबर २०१९ |
| | | श्री. भगत सिंह कोश्यारी | ०५ सप्टेंबर २०१९ ते आजपर्यंत |
| २ | मा. प्रतिकुलपती | श्री. चंद्रकांत दादा पाटील | १ मे, २०१८ ते ऑक्टोंबर २०१९ |
| | | श्री. दादाजी भुसे | ३० डिसेंबर २०१९ ते आजपर्यंत |
| ३ | मा. कुलगुरु | डॉ. के.पी. विश्वनाथा | ३१ डिसेंबर, २०१५ ते आजपर्यंत |

## ७.२ कार्यकारी परिषद सदस्य, मफुकृवि, राहुरी (दि. १ एप्रिल, २०१९ ते ३१ मार्च, २०२०)

| अ.क्र. | संवर्ग | मा. सदस्यांचे नाव | पत्ता | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पदसिध्द अध्यक्ष | डॉ. के. पी. विश्वनाथा, मा. कुलगुरु | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | - |
| २ | पदसिध्द सदस्य | कृषि आयुक्त, महाराष्ट्र शासन, पुणे यांचेकडुन नामनिर्देशित कृषि संचालक (नि.व.गु.नि.) | कृषि आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे | - |
| ३ | पदसिध्द सदस्य | पशुसंवर्धन आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचेकडून नामनिर्देशित प्रादेशिक पशुसंवर्धन सहसंचालक | जनावरांचा दवाखाना, अशोक स्तंभाजवळ, नाशिक | - |
| ४ | पदसिध्द सदस्य | फलोत्पादन संचालक, | महाराष्ट्र राज्य अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयाजवळ, नरवीर तानाजी मार्ग, शिवाजीनगर, पुणे | - |
| ५ | पदसिध्द सदस्य | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) | जुना मुंबई-आग्रा मार्ग, त्र्यंबक नाका, आदिवासी विकास भवन समोर, नाशिक | - |
| ६ | मा. कुलगुरू यांच्याकडून नामनिर्देशित सदस्य | संचालक संशोधन | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | दि. ०१/०९/२०१७ ते ३१/०८/२०१९ |
| | | | | दि. २४/०९/२०१९ ते २३/०९/२०२१ |
| ७ | मा. कुलगुरू यांच्याकडून नामनिर्देशित सदस्य | अधिष्ठाता (कृषि) | महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | दि. ०१/०९/२०१७ ते ३१/०८/२०१९ |
| | | | | दि. २४/०९/२०१९ ते २३/०९/२०२१ |
| ८ | पदसिध्द सदस्य | दुग्धव्यवसाय विकास आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचेकडून नामनिर्देशित प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी | नाशिक विभाग, शासकीय दुध योजना आवार, त्र्यंबक रोड, नाशिक | - |
| ९ | पदसिध्द सदस्य | मत्सव्यवसाय आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचेकडून नामनिर्देशित प्रादेशिक उपआयुक्त, मत्स्यव्यवसाय | जुनी शासकीय अश्विन बॅरेक क्र.१३, महसुल आयुक्त कार्यालयाजवळ, नाशिक रोड, नाशिक | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
